CMYK



सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

धाराशिव | बुधवार, १८ फेब्रुवारी २०२६ | वर्ष ३ रे अंक ३४९ | पाने १२+८ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



संघाचा कोणताही कार्यक्रम असो, तो स्वयंसेवकांशी व जनतेशी जवळीक प्रस्थापित करण्यासाठीच आपण करीत आहोत, त्यातून समाजाचे व आपले स्नेहबंधन सुदृढ होणार आहे, लोकांचे आपण विश्वासपात्र ठरणार आहोत, ही जाणीव नित्य जागृत असावयास हवी.

**- एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

# एव्हरेस्टपर्यंत उडणारे हेलिकॉप्टर बनवणार

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घोषणा

### फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षांसोबत एच-१२एच हेलिकॉप्टर असेंब्लीचे उद्घाटन

◆ **मुंबई, १७ फेब्रुवारी**

फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ मंगळवारी भारत दौऱ्यावर आले असून, त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यावेळी दोन्ही नेत्यांनी टाटा-एअरबसच्या एच-१२५ हेलिकॉप्टर असेंब्ली लाईनचे आभासी स्वरूपात उद्घाटन केले. या ऐतिहासिक भेटीत दोन्ही देशांनी आपल्या संबंधांना विशेष जागतिक धोरणात्मक भागीदारी स्तरावर नेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. यावेळी २१ विविध करारांवर स्वाक्षरी करण्यात आल्या. यात हॅमर क्षेपणास्त्राचाही समावेश आहे.

मुंबईच्या लोकभवनात आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेत बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, फ्रान्स हा भारताचा सर्वांत जुना आणि विश्वासार्ह धोरणात्मक भागीदार आहे. राष्ट्राध्यक्ष मॅक्राँ यांच्यासोबत आम्ही या भागीदारीला अभूतपूर्व ऊर्जा दिली आहे. संरक्षण, स्वच्छ ऊर्जा, अंतराळ, एआय, जैवतंत्रज्ञान आणि महत्त्वपूर्ण खनिज क्षेत्रात सहकार्य अधिक मजबूत केले जाईल.

भारत आणि फ्रान्स मिळून अशा हेलिकॉप्टरची निर्मिती करतील, जे माऊंट एव्हरेस्टासारख्या अतिउंच शिखरापर्यंत भरारी घेऊ शकेल. नरेंद्र मोदी यांनी फ्रान्सला भारताचा विशेष भागीदार संबोधले.

मॅक्राँ यांनी सांगितले की, सबमरीन, एच-१२५ हेलिकॉप्टर आणि एरोनॉटिक्स क्षेत्रात भारत-फ्रान्स सहकार्य अधिक दृढ होईल. तंत्रज्ञान देवाणघेवाण आणि संयुक्त उत्पादनावर आमचा भर असेल. ◀(तभा वृत्तसेवा)



**भारत-फ्रान्स भागीदारीला नवे बळ**

### दहशतवादाविरोधात ठाम भूमिका

दोन्ही नेत्यांनी २००८ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी मोदी यांनी स्पष्ट केले की, युक्रेन असो, पश्चिम आशिया असो किंवा भारत-प्रशांत आम्ही शांततेच्या प्रयत्नांना पाठिंबा देतो. दहशतवादाचे उच्चाटन ही आमची सामायिक वचनबद्धता आहे. ■

### व्यापार आणि नव्या युगाची सुरुवात

युरोपियन युनियनसोबतच्या मुक्त व्यापार कराराचे स्वागत करत मॅक्राँ म्हणाले, भारत आणि युरोपमधील करारामुळे द्विपक्षीय व्यापाराला नवी चालना मिळेल. मोदी यांनी २०२६ हे वर्ष भारत-युरोप संबंधांसाठी टर्निंग पॉइंट ठरणार असल्याचे सांगितले. भारत-फ्रान्स इनोव्हेशन वर्षाच्या निमित्ताने उद्योग, संशोधन आणि सांस्कृतिक देवाणघेवाण वाढवण्यावर भर देण्यात येणार आहे. ■

### सामरिक भागीदारीला नवी दिशा

फ्रान्स हा भारताचा युरोपमधील प्रमुख धोरणात्मक भागीदार मानला जातो. संरक्षण, अंतराळ, हवामान बदल, ऊर्जा सुरक्षा आणि तंत्रज्ञान क्षेत्रात दोन्ही देशांची भागीदारी सातत्याने वाढत आहे. मॅक्राँ यांच्या या दौऱ्यामुळे भारत-फ्रान्स संबंधांना नवे बळ मिळाले असून, संरक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील मोठ्या करारांमुळे भारताची जागतिक ताकद आणखी वाढण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. ■

### स्वातंत्र्यवीरांची आठवण

इमॅन्युएल मॅक्राँ यांचे मुंबईत स्वागत करताना मला आनंद होत आहे. त्यांनी एआय समिटसाठी मला फ्रान्समध्ये बोलवले होते. फ्रान्सचे सर्वात मोठे पोर्ट ज्यातून स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी उडी घेतली, त्या समुद्राजवळील हे शहर आहे. मला त्यांना अभिवादन करण्याचे सौभाग्य गतवर्षी मिळाले होते, अशा शब्दांत पंतप्रधान मोदींनी स्वातंत्र्यवीर सावरकरांची आठवण करून दिली. ■

# हवामान बदलासाठी महाराष्ट्र सज्ज

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

### ‘मुंबई क्लायमेट वीक’चे उद्घाटन

◆ **मुंबई, १७ फेब्रुवारी**

हवामान बदलाच्या वाढत्या संकटाला उत्तर देण्यासाठी महाराष्ट्र कृती कार्यक्रमाचे नेतृत्व करण्यास सज्ज असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. हवामान कृती ही केवळ पर्यावरणीय जबाबदारी नसून, भविष्यातील आर्थिक स्पर्धात्मकतेची किल्ली आहे, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते देशातील पहिल्या ‘मुंबई क्लायमेट वीक’चे उद्घाटन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

राज्यात २०३० पर्यंत हरित ऊर्जेचा वाटा ५० टक्के पेक्षा अधिक करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. स्वच्छ हायड्रोजन, इलेक्ट्रिक मोबिलिटी, जैवइंधन आणि शाश्वत पायाभूत सुविधांवर भर दिला जात आहे. मुंबई महानगर क्षेत्रातील प्रकल्पांमध्ये शाश्वतता आणि आपत्ती प्रतिकारक्षमता समाविष्ट केली जात असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.



अतिवृष्टी, पूरस्थिती, उष्णतेच्या लाटा आणि वायू प्रदूषण यामुळे मुंबईसारख्या किनारी शहरावर मोठा ताण आहे. ग्रामीण भागात अवकाळी पाऊस आणि दुष्काळामुळे शेतीला फटका बसत आहे. हवामान बदल हा प्रशासनासमोरील गंभीर प्रश्न बनला आहे.

केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी महाराष्ट्राच्या कामगिरीचे कौतुक करीत राज्याला पीएम कुसुम योजनेअंतर्गत आणखी एक लाख सौर पंप मंजूर करण्याची घोषणा केली. सौर आणि पवन ऊर्जेचा विस्तार वेगाने होत असल्याचे त्यांनी सांगितले.


**हवामान कृती म्हणजे गुंतवणूक व रोजगाराची संधी**

फडणवीस यांनी सांगितले की, हवामान कृतीकडे महाराष्ट्र गुंतवणूक, नवकल्पना आणि रोजगारनिर्मितीची मोठी संधी म्हणून पाहतो. जागतिक भांडवल शाश्वत बाजारपेठांकडे वळत असून, मुंबई जागतिक हवामान वित्त केंद्र बनू शकते. ◀(तभा वृत्तसेवा)

## महत्त्वाचे

### शेअर बाजार दुसऱ्या दिवशीही तेजीत

**मुंबई** : शेअर बाजार सलग दुसऱ्या दिवशी म्हणजे मंगळवारी तेजीत बंद झाला. बँक, आयटी आणि कॅपिटल गुड्स शेअर्समध्ये वाढ झाल्याने निर्देशांक वधारला. निर्देशांक १७३.८१ अंकांनी वाढून ८३,४५०.९६ वर बंद झाला. दिवसभरात निर्देशांक ८३,५९८ च्या उच्चांकी आणि ८२,९८७.४३ च्या नीचांकी पातळीवर होता.



निफ्टी ४२.६५ अंकांनी वाढून २५,७२५.४० वर बंद झाला. निर्देशांकामधील घटकांमध्ये आयटीसी, भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड, लार्सन अँड टुब्रो, इन्फोसिस, एशियन पेंट्स, टायटन, अदानी पोर्ट्स, एचसीएल टेक्नॉलॉजीज, सन फार्मास्युटिकल्स, मारुती सुझुकी इंडिया, इंडिगो, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि टेक महिंद्रा या कंपन्यांचे शेअर्स प्रामुख्याने वधारले. दुसरीकडे, एटरनल, टाटा स्टील, ट्रेंट, रिलायन्स इंडस्ट्रीज, महिंद्रा अँड महिंद्रा, बजाज फिनसर्व्ह, ॲक्सिस बँक, भारती एअरटेल, कोटक महिंद्रा बँक आणि हिंदुस्तान युनिलिव्हर यांचे शेअर्स तोट्यात गेले. मध्य सत्रातील व्यवहारांमध्ये युरोपीय बाजारपेठा जास्त व्यवहार करत आहेत. ■

# हर्षवर्धन सपकाळ यांची दिलगिरी; वक्तव्याचा विपर्यास झाल्याचा दावा

## छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना टिपू सुलतानशी

◆ **मुंबई, १७ फेब्रुवारी**

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना टिपू सुलतानशी केल्यानंतर सर्वस्तरावरून टीकेची झोड उठली. त्यामुळे सपकाळांना दिलगिरी व्यक्त करावी लागली आहे. आपल्या वक्तव्याचा विपर्यास झाल्याचा दावा करीत, कोणाचाही भावना दुखावण्याचा आपला हेतू नव्हता, असे सपकाळ म्हणाले.

मालेगाव महापालिकेत उपमहापौरांच्या दालनात टिपू सुलतानची प्रतिमा लावल्यानंतर सदर घटनेवर प्रतिक्रिया देताना हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना टिपू सुलतानशी केली होती. त्यांच्या या वक्तव्यानंतर राजकीय वाद निर्माण झाला. तमाम हिंदूंची कत्तल करणाऱ्याची तुलना आमच्या महाराजांशी करताना लाज वाटत नाही का, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सपकाळांना सुनावले. तातडीने माफी मागावी, अशी मागणी देखील त्यांनी केली होती.



वाद वाढल्यानंतर सपकाळ यांनी फेसबुकवर स्पष्टीकरण दिले. माझ्या वक्तव्याचा जाणीवपूर्वक विपर्यास करण्यात आला. कोणाच्याही भावना दुखावण्याचा माझा हेतू नव्हता. माझ्या विधानामुळे शिवप्रेमी बांधवांच्या भावना दुखावल्या असतील, तर मी मनःपूर्वक दिलगिरी व्यक्त करतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

मात्र, हे करताना राजकीय स्वार्थ साधण्याची संधी त्यांनी सोडली नाही. भाजपाकडून खोडसाळपणा करण्यात आल्याचा आरोप त्यांनी ही दिलगिरी व्यक्त करताना केला. सपकाळ यांनी आपल्या पोस्टमध्ये संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील काही ओळी उद्धृत करत आपली भूमिका मांडली. ◀(तभा वृत्तसेवा)

## चांदी झाली स्वस्त, १.८० लाख रुपये प्रति किलो

◆ **नवी दिल्ली, १७ फेब्रुवारी**

सोने आणि चांदीच्या किमतीत घसरण सुरूच आहे आणि हे मौल्यवान धातू दररोज स्वस्त होत आहेत. सोमवारी मोठ्या घसरणीनंतर, मंगळवारी चांदीच्या किमतीत घसरण झाली.

मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर चांदी उघडताच, दुसरी मौल्यवान धातू, सोने देखील घसरली. आता, चांदी त्याच्या उच्च पातळीपासून १.८० लाख रुपयांपेक्षा जास्त स्वस्त आहे, तर सोने ३८ हजार रुपयांपेक्षा जास्त स्वस्त झाले आहे. मंगळवारी, आठवड्याच्या दुसऱ्या व्यवहार दिवशी, एमसीएक्सवर चांदीचे दर उघडताच घसरले. चांदीचा भाव सोमवारी २,३९,८९१ रुपये प्रति किलोवर बंद झाला, परंतु मंगळवारी बजार उघडताच ती २,३५,२०६ रुपयांवर आली. परिणामी, एक किलो चांदीची किंमत ४,६८५ रुपयांनी घसरली. ◀(वृत्तसंस्था)

# सिंदी रेल्वेजवळ ‘जीटी एक्सप्रेस’च्या डब्याला आग

## प्रवाशांच्या सतर्कतेमुळे जीवितहानी टळली

◆ **वर्धा/सिंदी रेल्वे, १७ फेब्रुवारी**

नागपूर-सेवाग्राम रेल्वे मार्गावर तुळजापूर दहेगाव स्टेशननजीक हेलोडी परिसरात नवी दिल्ली-चेन्नई (जीटी) एक्सप्रेसच्या मागील पार्सल बोगीला आग लागली. ही बाब लगतच्या महिला व दिव्यांग बोगीतील प्रवाशांच्या लक्षात येताच तत्काळ उपाययोजना करण्यात आल्याने जीवितहानी टळली. या आगीत पार्सल बोगीतील सर्व साहित्य जळून खाक झाले. ही घटना मंगळवारी सकाळी ११.४५ च्या सुमारास घडली.

सिंदी (रेल्वे) ते तुळजापूर स्थानकादरम्यान नवी दिल्ली-चेन्नई एक्सप्रेस (ग्रॅण्ड ट्रंक एक्सप्रेस) कोच क्रमांक २१५९६९/सी) या रेल्वे गाडीला सिंदी रेल्वे ते तुळजापूर दहेगाव स्टेशनपासून दोन किलोमीटर अंतरावर पोल नंबर ७८४/१९ व ७८४/१७ दरम्यान शेवटच्या बोगीमधून अचानक धूर आणि आगीच्या ज्वाळा दिसू लागल्या. दिव्यांग बोगीमध्ये १० प्रवासी होते. आग लागल्याचे लक्षात येताच प्रवाशांनी तातडीने साखळी ओढून गाडी थांबविली. रेल्वे गार्ड डी. आर. मीना यांनी तातडीने पाहणी केली आणि आग लागल्याची खात्री पटताच चालकाशी संपर्क साधला. धोका वाढू नये म्हणून प्रभावित बोगी इतर डब्यांपासून वेगळी करून रेल्वे गाडी सुरक्षित अंतरावर नेण्यात आली.

या घटनेची माहिती मिळताच, दहेगावचे (गोसावी) पोलिस उपनिरीक्षक यशवंत कदम पथकासह घटनास्थळी पोहोचले. सिंदी रेल्वे व सेलू पोलिसही मदतीला धावले. पोलिसांनी प्रवाशांना सुखरूप बाहेर काढून सुरक्षित ठिकाणी हलविले. आगीची माहिती मिळताच सिंदी, सेलू आणि हिंगणघाट येथील अग्निशमन दलास पाचारण करण्यात आले. सिंदी येथील अग्निशमन दलाने प्रथम पोहोचून रेल्वे कर्मचाऱ्यांच्या मदतीने तासाभरात आगीवर नियंत्रण मिळविले. ◀(तभा वृत्तसेवा)



जळत असलेला जीटी एक्सप्रेसचा डबा

### नागपूर-सेवाग्राम वाहतूक प्रभावित

रेल्वे प्रशासनाकडून आगीचे नेमके कारण शोधण्याचे काम सुरू असून या घटनेमुळे नागपूर-सेवाग्राम मार्गावरील रेल्वे वाहतूक प्रभावित झाली होती. दुपारी १.३० नंतर वाहतूक सुरू झाली. नागपूर लोहमार्ग पोलिस तसेच रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन वस्तुस्थिती जाणून घेतली. पोलिस अधीक्षक सौरभ अग्रवाल यांनीही तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. ■

## लाच प्रकरणाची पोलिस उपायुक्तांमार्फत चौकशी

**मुंबई** : मंत्रालयातील अन्न व औषध प्रशासन विभागात १२ फेब्रुवारी रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) धाड टाकत विभागातील लिपिक राजेंद्र ढेरंगे याला ३५ हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ अटक केली होती. या घटनेमुळे मंत्री नरहरी झिरवळ यांच्या कार्यालयात मोठी खळबळ उडाली. या पृष्ठभूमीवर झिरवळ यांनी विभागांतर्गत चौकशीचा आदेश दिला असून, ही चौकशी पोलिस उपायुक्तांमार्फत केली जाणार असल्याचे झिरवळ यांनी सांगितले. दरम्यान, झिरवाळ यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेऊन संपूर्ण घडामोडींची माहिती दिली. उपमुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना दिल्याचे झिरवाळ यांनी सांगितले. पोलिस उपायुक्त आणि सहआयुक्त दक्षता करणार चौकशी झिरवाळ यांनी या प्रकरणाशी आपला कोणताही संबंध नसल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट केले.

## पंजाबमध्ये शाळांना बॉम्बची धमकी, पेपर रद्द

**मोहाली** : पंजाबमधील मोहाली येथील ज्ञान ज्योती शाळेला बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाली. ही धमकी ई-मेलद्वारे देण्यात आली आहे. या धमकीनंतर शाळा प्रशासनाने सर्व मुलांना घरी पाठवण्यात आले.पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर पथक घटनास्थळी पोहोचले. मागील बुधवारी मोहालीतील १६ शाळांना बॉम्बने उडवण्याची धमकी देण्यात आली होती. यानंतर सर्व शाळा रिकामी करण्यात आल्या होत्या. आजच्या धमकीनंतरही पालकांमध्ये भीतीचे वातावरण होते. मंगळवारी सीबीएसई बोर्ड परीक्षेचा गणिताच पहिला पेपर होता. पोलिसांनी परीक्षा केंद्र म्हणून नियुक्त केलेल्या शाळांची त्वरित तपासणी करावी आणि परीक्षा घेतल्या जातील.

# काश्मीर, ईशान्य भारत २०२९ पर्यंत दहशतवादमुक्त

- अमित शाह यांनी निश्चित केले लक्ष्य
- माओवाद्यांना दिली अखेरची संधी

**नवी दिल्ली, १७ फेब्रुवारी-**

जम्मू-काश्मीर आणि ईशान्य भारत २०२९ पर्यंत दहशतवाद व बंडखोरमुक्त होणार आहे. दोन्ही प्रदेशांत शांतता निर्माण करण्याला सरकारचे प्राधान्य आहे. माओवाद्यांसाठी आम्ही आधीच ३१ मार्चची तारीख निश्चित केली आहे. त्यांच्याकडे आत्मसमर्पण करण्यासाठी महिनाभराचा अवधी असल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी स्पष्ट केले.

दिल्ली पोलिसांच्या ७९ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. शाह म्हणाले, ३१ मार्च २०२६ पर्यंत देशाला माओवादीमुक्त करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे आणि त्या दिशेने प्रगती सुरू आहे. २०१४ पूर्वी जम्मू-काश्मीर, ईशान्य भारत आणि माओवादी प्रभावित भागांमध्ये अंतर्गत सुरक्षेची गंभीर आव्हाने होती. मात्र, आता सुमारे ८० टक्के समस्या नियंत्रणात आल्या आहे. जम्मू काश्मीरमधील कलम ३७० रद्द केल्यानंतर सुरक्षेची स्थिती सुधारत आहे. ईशान्य भारतात सुमारे २० शांतता करार करण्यात आले आणि आतापर्यंत दहा हजारांपेक्षा जास्त युवक शस्त्रे सोडून मुख्य प्रवाहात आले.



आत्मसमर्पण करणाऱ्यांसाठी सरकारने अनेक योजना आणल्या, त्यातून त्यांना स्वावलंबी बनविण्यात येत आहे. काश्मीर आणि ईशान्य भारतातून दहशतवाद आणि बंडखोरांचा कायमचा नायनाट करण्यासाठी २०२९ पर्यंतचे लक्ष्य निश्चित केले आहे.

सेफ सिटी प्रकल्प व एआय कॅमेरे दिल्ली पोलिसांसाठी ‘सेफ सिटी’ प्रकल्पांतर्गत दहा हजार कॅमेऱ्यांचे जाळे उभारले जात आहे. यापैकी सुमारे २,१०० एआय सक्षम कॅमेरे लवकरच कार्यान्वित होतील. याशिवाय शहरात आधीच बसवलेले १५ हजार कॅमेरे सार्वजनिक सुरक्षेला अधिक बळ देतील. पोलिसांच्या स्पेशल सेलचे एकात्मिक मुख्यालय दहशतवादविरोधी कारवायांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे शाह यांनी सांगितले. लाल किल्ल्याजवळील बॉम्बस्फोटासारख्या गुंतागुंतीच्या प्रकरणांचा यशस्वी तपास केल्याबद्दल त्यांनी दिल्ली पोलिसांचे कौतुक केले.

# जगात भारत हाच विश्वासार्ह भागीदार

## जयशंकर यांचे प्रतिपादन

◆ **मुंबई, १७ फेब्रुवारी**

जागतिक स्तरावरील अस्थिरता, मागणी-पुरवठा साखळीतील व्यत्यय आणि अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी आलेल्या मर्यादा पाहता जगाचा भारतावर विश्वास वाढला आहे. गुंतवणूकदार आणि व्यापारासाठी भारत हाच विश्वासार्ह भागीदार असल्याचे अलिकडील झालेल्या करारातून समोर आल्याचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर म्हणाले.

मुंबईत आयोजित जागतिक आर्थिक सहकार्य परिषदेत सहभागी होण्यासाठी जयशंकर आले होते, यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. आजच्या अनिश्चित जगात भारत आपली ताकद वाढवत आहे, जोखीम कमी करत आहे आणि व्यापार वाढवत आहे. ◀(वृत्तसंस्था)

# विमान अपघाताची सीबीआय चौकशी करा

## सुनेत्रा पवार यांची फडणवीसांकडे मागणी

◆ **मुंबई, १७ फेब्रुवारी**

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री यांच्या विमान अपघाताची स्वतंत्रपणे सीबीआय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांच्या पत्नी आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मंगळवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन केली, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिली.

अजित पवार यांच्या विमान अपघाताची चौकशी सीबीआयमार्फत केली जावई, अशी मागणी करण्यासाठी आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली, अशी माहिती सुनील तटकरे यांनी दिली. मी स्वतः त्यानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, ज्येष्ठ मंत्री हसन मुश्रीफ आणि पार्थ पवार अशा सर्वांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. अजित पवार यांचा अपघाती मृत्यू झाला त्याबाबत आम्ही मुख्यमंत्र्यांना एक निवेदन दिले आहे. ◀(वृत्तसंस्था)

# एआयचा वापर मानवी विकासासाठी असावा

## पंतप्रधान मोदींची वृत्तसंस्थेच्या मुलाखतीतून स्पष्टोक्ती



◆ **नवी दिल्ली, १७ फेब्रुवारी**

नव तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात् एआयचा वापर मानवी विकासासाठी व्हायला हवा ही भारताची भूमिका आहे. तंत्रज्ञान मानवतेची सेवा करण्यासाठी अस्तित्वात आहे, ती मानवाची जागा घेण्यासाठी नाही अशी भूमिका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडली.

इंडिया एआय इम्पॅक्ट परिषद-२०२६ च्या आयोजनाच्या पृष्ठभूमीवर वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत मोदी म्हणाले, भविष्यात एआयचे महत्त्व पाहता, पायाभूत सुविधा, धोरणात्मक संस्था आणि कौशल्य आधारित शिक्षणावर भर दिला जात आहे. जागतिक विकासासाठी या तंत्रज्ञानाचा वापर व्हायला हवा ही भारताची भूमिका आहे. एआय क्रांतीचा लाभ सर्व घटकापर्यंत पोहोचावा यासाठी भारत प्रयत्नशील आहे. आम्ही केवळ प्रतिभेचे संगोपन करत नाही, तर एआय क्रांतीमध्ये सहभागी होण्यापासून ते त्याला आकार देण्यासाठी आवश्यक ती पावले उचलत आहे. आमच्या आयटी क्षेत्राने केवळ सेवा वितरणातच नव्हे, तर एआय उत्पादने, प्लॅटफॉर्म तयार करण्यातही आघाडीवर राहायला हवे. आम्ही एआयला एक फोर्स-मल्टीप्लायर अर्थात् मर्यादित संसाधनात अधिक परिणाम देणारे म्हणून पाहतो. भारत केवळ एआयच्या वापरातच नव्हे, तर निर्मितीमध्येही जागतिक स्तरावर अग्रस्थानी राहावे ही सरकारची भूमिका आहे.

**भारतीय भाषेवर आधारित एआय हवे**

भारताच्या एआय मॉडेलची जगभरात मागणी व्हावी आणि परदेशी नव्हे, तर भारतीय भाषांमध्ये त्याचा वापर करता यावा यावर स्वदेशी कंपन्यांनी भर द्यायला हवा. यातून रोजगारनिर्मिला चालना मिळेल. स्वावलंबी भारताच्या निर्मितीसाठी एआय महत्त्वाची भूमिका बजावेल यावर आमचा विश्वास आहे. एआय वापरात भारत जबाबदार देश असेल, त्याचा दुरुपयोग होणार नाही याची काळजी घेणे सरकारची जबाबदारी असल्याचे मोदी म्हणाले. ◀(वृत्तसंस्था)

### कामाचे स्वरूप बदलणार, रोजगाराच्याही संधी

एआयचे केंद्र म्हणून समोर येण्यासाठी भारताकडे प्रतिभा, उद्योजक आणि संसाधने उपलब्ध आहे. ग्राहक नव्हे तर उत्पादननिर्मितीचे केंद्र व्हावे यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. प्रतिभावान तरुणांना संधी मिळावी यासाठी सरकार वचनबद्ध आहे. एआय मानवी क्षमता वाढवू शकते, परंतु निर्णय घेण्याची अंतिम जबाबदारी नेहमीच मानवांवर राहिली पाहिजे. तंत्रज्ञानामुळे काम जात नाही, तर त्याचे स्वरूप बदलते, त्यामुळे नवीन प्रकारचे रोजगार उपलब्ध होणार आहे. जेव्हा नवीन तंत्रज्ञान येते, त्यामुळे नवीन संधी निर्माण होतात आणि एआयच्या युगातही हेच होणार आहे. ■

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### गौड-कलाल समाजाच्या वधू-वर परिचय मेळाव्यात २५० अधिकांचा सहभाग

**अक्कलकोट, दि. १७ फेब्रुवारी-**

सांस्कृतिक वारशाचे जतन आणि समाजबांधवांचे संघटन असा दुहेरी संगम नुकताच तुळजापूर येथे पाहायला मिळाला. निमित्त होते, गौड-कलाल समाजाच्या भव्य स्नेहसंमेलन आणि उपवधू-वर परिचय मेळाव्याचे. या सोहळ्याला सोलापूर, पुणे, धाराशिव आणि लातूर या जिल्ह्यांतील समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नारायण गौड, श्रीनिवास बोडगे, तिरुपती बुरुगवार गौड, दत्तात्रय बुर्रा गौड, कैलास गौड कालापल्लीवार, चेतन बोडगे, राजू गोडसेलवार, श्रीनिवास गुल्लापल्ली, चेतन बोडगे, प्रकाश बोडगे, चद्रकांत बोडगे, यल्लादास लचमापुरे, अंज्याया पल्ली, श्रीनिवास गौड, संजीव सुगरे, व्यंकटेश बब्बूर, महेश आंबट, प्रताप पल्ली, व्यंकटेश मरेपल्ली, व्यंकटेश लचमापुरे, रवी चिंचोल, शैलेश मरपेल्ली, वेणु गोपाल मरपेल्ली उपस्थित होते. या मेळाव्याला प्रमुख पाहुणे म्हणून कर्नाटकचे विधानपरिषद सदस्य जगदेव गुत्तेदार, उद्योजक राजा भाऊ गुल्लापल्ली, प्रविण बुरुगवार, सुरज बुरुगवार, धारूरचे उद्योजक तथा माजी नगरसेवक संजीत कोमटवार, नगरसेवक सतीश गुत्तेदार, विजय लचमापुरे आजीबाबू भंडारी संतोष सुगरे ,शिवाजी गुत्तेदार, चंद्रकांत तेलंग, परमेश्वर तेलंग, विजय तेलंग, पत्रकार नागेश कलाल, सुदर्शन तेलंग सायना सारोळे, शहानू तेलंग पुंडलिक तेलंग, सुरेश घाटे कृष्णा हनगल, राजू कोकण्डा पंडित सुगरे, कृष्णा सुगरे, दत्तू तेलंग उपस्थित होते. या वधू-वर परिचय मेळाव्यात विवाहयोग्य मुला-मुलींच्या कुटुंबांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यात १९२ उपवर (मुले) आणि ५७ उपवधू (मुली) अशी २४९ जणांची नोंदणी झाली. सद्यस्थितीत या सर्व माहितीचे आणि बायोडाटाचे फोटोसह संगणकीकरण करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. पुढील ४ ते ५ दिवसांत हे काम पूर्ण करून, संपूर्ण पीडीएफ यादी संपर्क व्यक्तींमार्फत समाजबांधवांना डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून दिली जाणार आहे.

### २३ फेब्रुवारी रोजी तेरामैल येथे परिट बाधवांतर्फे भव्य सत्कार समारंभ व तुलाभार कार्यक्रम

**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी -**

राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या १५१ व्या जयंती निमित्त भारतीय सुराज्य संस्था (समर्थ गणपतराव महाराज आश्रम) तेरामैल बसवनगर मंद्रुप फाटा विजापूर रोड येथे सोमवार दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी वेदान्त वारीधि शिवाव्दैत तत्वभूषण वेदान्त आचार्य श्री.ब्र. श्री. डॉ. शिवानंद स्वामीजी (श्री जडेसिध्द शिवयोगीश्वर मठ दावणगिरी) यांचा भव्य सत्कार समारंभ व तुलाभार कार्यक्रम समस्त शहर व द. सोलापूर परिट बाधवांच्यावतीने आयोजित करण्यात आल्याचे माहिती श्री बलभिम वारे व श्री. मनोहर काटकर सर यांनी दिली. यावेळी ह.भ.प. श्री. सुधाकर महाराज इंगळे (राष्ट्रीय अध्यक्ष, अखिल भाविक वारकारी मंडळ) यांच्या शुभहस्ते हा सत्कार समारंभ व तुलाभार कार्यक्रम होणार आहे. यावेळी श्री. संतोष पाटील हे प्रमुख उपस्थिती म्हणून राहणार आहेत. या कार्यक्रमाचे रूपरेषा पुढीलपमाणे :- सकाळी १० ते १०.३० वा. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पुजन, सकाळी ११ वा. सत्कार समारंभ, सकाळी ११.३० वा. तुलाभार कार्यक्रम, दुपारी १२ ते १.३० यावेळी मान्यवर महात्मांचे मराठी व कानडी प्रवचन, दुपारी १.३० ते व २ वा समारोपिय भाषण व आरती दुपारी २ वा. महाप्रसादानंतर कार्यक्रमाची सांगता होणार आहे. तसेच यावेळी मा.श्री.मनिष (भैय्या) देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत ९ ते २ यावेळेत भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी बहुसंख्य समाज बांधवांनी उपस्थित राहण्याचे असे आवाहन संयोजकांच्यावतीने करण्यात आला आहे.





### शहर विकासासाठी सर्व घटकांना सोबत घेऊन काम करू : महापौर कोंड्याल

**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व घटकांना सोबत घेऊन काम करू. महानगरपालिकेच्या माध्यमातून आरोग्य, पायाभूत सुविधा व नागरिकांच्या मूलभूत गरजांवर विशेष भर देण्यात येईल, अशी ग्वाही नूतन महापौर विनायक कोंड्याल यांनी दिली. श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयाच्यावतीने नूतन महापौर तथा रुग्णालयाचे संचालक विनायक कोंड्याल यांच्या महापौरपदी निवडीबद्दल त्यांचा गौरवपूर्ण सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना महापौर कोंड्याल बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते श्री महर्षी मार्कंडेय महामुनी यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर रुग्णालयाचे चेअरमन डॉ. माणिक गुर्रम यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्रेसिडेंट सत्यनारायण बोल्ली व चेअरमन डॉ. माणिक गुर्रम यांच्या हस्ते विनायक कोंड्याल यांचा सत्कार करण्यात आला. तसेच मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालय कर्मचारी पतसंस्था, इरप्पण्णा बोल्ली ब्लड बँक तसेच डॉक्टरवर्ग यांच्यातर्फेही सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सुरेश फलमारी, अशोक आडम, डॉ. विजयकुमार आरकाल, श्रीनिवास क्यातम, श्रीनिवास कमटम, लक्ष्मीनारायण कुचन, पार्वतय्या श्रीराम, डॉ. लता पाटील, डॉ. सुधाकर गुंडेली, डॉ. अंधारे, डॉ. सुहास पुजारी, डॉ. सांभारभं आदी उपस्थित होते.व्हाईस चेअरमन रमेश विडप यांनी आभार मानले.

# मंगळवेढ्यातून अल्पवयीन मुलीस फुस लावून पळविले

**विवाहिता दोन मुलाबाळासह बेपत्ता**

**ग्रामीण भागातून कॉलेज तरुणी बेपत्ता**

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १७ फेब्रवारी-**

मंगळवेढा शहर परिसरातून एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीस फुस लावून पळवून नेण्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी मंगळवेढा पोलीसात अज्ञात व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील फिर्यादीची १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी राहत्या घरातून १५ फेब्रुवारी रोजी दुपारी ३.३० वाजण्याच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने कशाच्या तरी कारणावरुन फुस लावून फिर्यादीचे कायदेशीर रखवालीतून पळवून नेण्याचा प्रकार घडला असून याचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक विजय पिसे हे करीत आहेत.

मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागातून एक २१ वर्षीय कॉलेज तरुणी बेपत्ता झाली असून तिच्या पालकांनी याबाबत पोलीसात तक्रार दिली आहे. दरम्यान पोलीस कसून त्या तरुणीचा शोध घेत आहेत. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागातील २१ वर्षीय तरुणी १५ रोजी रात्री १.३० वाजता राहते घरातून लघुशंका करणेसाठी घरातून बाहेर गेली ती अद्यापपर्यंत परत आली नाही, तिचा सर्वत्र गावात व नातेवाईकाकडे शोध घेतला मात्र ती मिळून आली नसल्याचे दिलेल्या तक्रारीमध्ये म्हटले आहे. याचा अधिक तपास बोराळे बीटचे पोलीस हवालदार योगेश नवले (९९२२४१९४१८) हे करीत असून कोणाच्या निदर्शनास आल्यास त्यांनी वरील नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. तिचे वर्णन-रंग गोरा,अंगाने सडपातळ,चेहरा गोल,उंची पाच फुट,अंगात नाईट ड्रेस,पँट शर्ट,शिक्षण बी.कॉम प्रथम वर्ष शिकत आहे.




शहर परिसरातून ३५ वर्षीय विवाहिता आपल्या दोन मुलाबाळासह बेपत्ता झाली असल्याची तक्रार तीच्या पतीने पोलिसात केली असून पोलिस त्या विवाहितेचा कसून शोध घेत आहेत. पोलिस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,मंगळवेढा शहर परिसरातील ३५ वर्षीय विवाहिता आपल्या पाच वर्षीय व चार वर्षीय दोन अपत्यासह १२ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.०० ते ११.३० च्या दरम्यान राहते घरातून कोणास काही न सांगता निघून गेली आहे. विवाहितेचा कुटुंबियांनी मंगळवेढा परिसरात नातेवाईकांकडे कसून शोध घेतला मात्र ती मिळून आली नाही. तिचे वय ३५ वर्षे,अंगाने सडपातळ,रंग गोरा,चेहरा गोल,उंची ५ फुट, अंगात नेसणेस पंजाबी ड्रेस अशा वर्णनाची स्त्री कोणाच्या निदर्शनास आल्यास त्यांनी मंगळवेढा पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## बार्शीत अल्पवयीन मुलीचा पाठलाग व धमकी प्रकरण; दोघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ फेब्रुवारी-**

अल्पवयीन मुलीचा मागील एक वर्षापासून पाठलाग करुन लग्नासाठी दबाव टाकणे तसेच कुटुंबीयांना धमकी दिल्याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात दोनजणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी महिलेने दि. १५ फेब्रुवारी रोजी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, त्या आपल्या कुटुंबासह बार्शी शहरात वास्तव्यास आहेत. त्यांची १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी हिचा एक मुलगा हा मागील एक वर्षापासून वारंवार पाठलाग करीत होता. तसेच तू मला आवडतेस, माझ्याशी लग्न कर; अन्यथा तुझ्या भावाचे हातपाय तोडीन अशी धमकी देत असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. दि. १३ फेब्रुवारी रोजी दुपारी संबंधित आरोपी व मुलगी हे एका रिक्षा स्टॉप परिसरात एकत्र उभे असल्याचे फिर्यादीच्या मुलाने पाहिले. त्यानंतर मुलीला विश्वासात घेऊन विचारणा केली असता वरील प्रकार समोर आला. घडलेल्या प्रकाराबाबत जाब विचारण्यासाठी फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांनी आरोपीच्या घरी भेट दिली असता, आरोपी क्र.१ व त्याचा भाऊ आरोपी क्र.२ यांनी शिवीगाळ करुन तुम्हाला आम्ही बघून घेतो अशी धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.

मुलीच्या सन्मानाचा प्रश्न असल्याने तात्काळ तक्रार नोंदविण्यात आली नव्हती. मात्र कुटुंबीयांनी चर्चा करुन दि. १५ फेब्रुवारी रोजी पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल केली. सदर प्रकरणी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३ अंतर्गत कलम ७८, ३५१(२), ३५१(३), ३५२, ३(५) तसेच बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम २०१२ प्रमाणे, कलम १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास बार्शी शहर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक प्रदीप झालटे करत आहेत. अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टीने नागरिकांनी अशा प्रकारच्या घटना त्वरित पोलिसांच्या निदर्शनास आणाव्यात, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## जिल्ह्यातील आंतरजातीय ३० जोडप्यांच्या संयुक्त खात्यावर प्रत्येकी ५० हजार रुपये जमा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाकडून केंद्र शासनाच्या आंतरजातीय विवाह प्रोत्साहन अनुदानास पात्र ठरलेल्या जिल्ह्यातील ३० जोडप्यांच्या संयुक्त खात्यावर प्रत्येकी ५० हजार रुपये जमा करण्यात आले आहेत.

या योजनेसाठी मध्यंतरी शासनाकडून १५ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. या योजनेसाठी पात्र ५६ लाभार्थ्यांची प्रस्ताव जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाकडे प्राप्त झाले होते. यातील ३० प्रस्ताव परिपूर्ण होते. तर २६ प्रस्तावांना त्रुटी लागली आहे. त्रुटीपुर्ततेनंतर अनुदानाचे वाटप करण्यात येणार आहे. केंद्र व राज्य शासनाच्या वतीने आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना शासनाच्या समाज कल्याण विभागाकडून ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान दिले जाते. यामध्ये जोडप्यापैकी वधू किंवा वर ही अनुसूचित जाती जमातीतील असावी अशी अट आहे. अनुदानासाठी समाज कल्याण विभागाकडे अशा जोडप्यांनी रीतसर प्रस्ताव सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**पात्र जोडप्यांनी तात्काळ प्रस्ताव सादर करावेत : कोहिणकर**

आंतर जातीय विवाह केलेल्या ज्या जोडप्यांनी अद्याप पर्यंत सोलापूर जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाकडे अनुदानासाठी प्रस्ताव सादर केले नाहीत. अशा जोडप्यांनी तात्काळ परिपूर्ण प्रस्ताव सादर करावेत. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या सूचनेनुसार त्या आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना अनुदान देण्यात येणार आहे. तशा सूचना जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाला देण्यात आल्या आहेत. असे स्पष्टीकरण जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांनी दिले.

## समृध्द गाव; गाव व समाजाचा विकासाला गती देणारे अभियान : भुजबळ

**नरोटेवाडी गावच्या कामाची तपासणी व कौतुकाची थाप**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी -**

सोलापूर - गावचा व समाजाचा विकास केवळ इच्छाशक्तीने नाही तर एकीचे बळावर होतो. नरोटेवाडी गावातील नागरिकांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाअंतर्गत केलेले काम पाहता या छोट्या गावाने विकासात्मक बदलाची मोठी भरारी घेतल्याचे कौतुक सोलापूर जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांनी सांगितले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अभियानाअंतर्गत कामकाजाची तपासणी करण्यासाठी त्यांनी नरोटेवाडी गावातील कामकाजाची पाहणी व तपासणी केली. यावेळी जिल्हा परिषद सदस्य चेताली मुळे,




पंचायत समिती सदस्य सुनील भोसले, सरपंच उमेश भगत, उपसरपंच महेंद्र खटके, ग्रामपंचायत अधिकारी सुवर्णा घोडके उपस्थित होते. यावेळी नूतन सदस्यांचा सत्कार ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आला. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी भुजबळ यांनी अभियानाअंतर्गत असलेल्या घटकांनुसार कागदपत्र व कामाची पाहणी केली. हे अभियान गावच्या विकासाला गती देणारे असून मी जिंकणारच या ध्येयाने सर्वांनी एकत्रित काम करा असे आवाहन करून शासनाच्या महिला स्नेही अभियानाम ध्येही सहभाग घेण्याचे आवाहन केले. यावेळी गावातील पदाधिकारी, नागरिक, शाळा-अंगणवाडी शिक्षक, सेविका उपस्थित होते.

## जबरी मारहाण, लुटल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेबुवारी-**

जबरी मारहाण करून सोन्याची चैन व पैसे लुटल्याच्या आरोपातून दोन आरोपींची निर्दोष मुक्तता झाली आहे.

यातील फिर्यादी हे बाळे येथे दिवाळी बाजार करणेकरिता गेले असता दोन्ही आरोपींनी विचारले की, ''तु कुठे आहेस? त्यावर मी बाळे येथे बाजाराकरिता आलो आहे.'' त्यावर सुशिल मला म्हणाला की, ''तुझे पैसे कुमार देणार आहे तु पोण्याचे वस्तीजवळ ये त्यावर मी त्या ठिकाणी गेलो असता तेथे कोणी नव्हते'' त्यानंतर फोन केला असता त्यांनी शकुंतला विहारला यायला सांगितल्याने सायंकाळी ०७ वाजता त्या ठिकाणी गेलो. कुमार दोरकर व सुशिल शिंदे हे दोघे उभे होते. गाडीवरून त्यांच्यासमोर उतरताच त्यातील सुशिल शिंदे याने मला लाकडी काठीने मारायला सुरूवात केली. खाली पाडून कुमार दोरकर याने जबरदस्तीने माझे गळ्यातील सोन्याची २ तोळयाची चैन, अंदाजे ७००० हजार रूपये काढून घेतले व पुन्हा लाथा बुक्याने मारहाण केली.



सदर खटल्याची सुनावणी ए. एस. जाधव यांच्या न्यायालयात पार पडली. सदर सुनावणीच्या वेळेत यातील आरोपीच्या वकीलांनी साक्षीदारांच्या विसंगती मे. कोर्टाच्या निदर्शनास आणून दिल्या व आरोपीच्या वकीलानी केलेला युक्तीवाद ग्राहय धरून यातील आरोपी कुमार चंद्रकांत दोरकर, सुशिल जालिंदर शिंदे दोघे रा. खेड, ता. उत्तर सोलापूर यांची सदर गुन्हयातून सबळ पुराव्यांअभावी निर्दोष मुक्तता केली. सदर खटल्यामध्ये सरकार पक्षाच्यावतीने ॲड. कोरे यांनी तर आरोपीच्या वतीने ॲड. रविराज दिनकर सरवदे, ॲड. रोहिणी भंडारे व ॲड. पुजा रविराज सरवदे, यांनी काम पाहिले.

## सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर पाच सराईत गुन्हेगार तीन महिन्यांसाठी तडीपार

**एसपी अतुल कुलकर्णी यांचा मोठा दणका**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १७ फेब्रुवारी-**

पंढरपूर तालुक्यातील आगामी सण, उत्सव आणि यात्रांच्या अनुषंगाने गुन्हे करणारे पाच जणांना सोलापूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सोलापूर ग्रामीण, सोलापूर शहर आणि संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातून तीन महिन्याकरिता तडीपार करण्याचे आदेश ६ फेब्रुवारी २०२६ रोजी निर्गमित केले आहेत.

दरम्यान सोमनाथ सलगर वय २४ वर्ष ,लक्ष्मण शिंदे वय २६ वर्ष, कृष्णा लेंगरे वय २२ वर्ष, जयदीप कांबळे २० वर्ष, कृष्णा घुटुकडे वय २५ वर्ष आणि विशाल मेटकरी वय २४ वर्ष (सर्व भटुंबरे शेगाव दुमाला ता. पंढरपूर) या पाच तडीपार इसमांना पंढरपूर तालुका पोलिसांनी ताब्यामध्ये घेऊन सोलापूर जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यातील पुणे या जिल्ह्यातील इंदापूर पोलीस ठाणे पुणे ग्रामीण या पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये नेऊन सोडून तडीपारची आदेशाची प्रत प्रत्येक आरोपीला बजावून तडीपारीची कारवाई केलेली आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे, पोलीस निरीक्षक संजय जगताप नेमणूक एलसीबी सोलापूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी. वाय. मुजावर, पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले, विक्रम वडणे एपीआय विभावरी रेळेकर, उपनिरीक्षक दत्तात्रय तोंडले, पोलीस हवालदार इसाक सय्यद चंद्रकांत घंटे, बालाजी कदम, मंगेश रोकडे , एएसआय आबा शेंडगे सरगर, पोलीस हवालदार गावडे, सागर गवळी, व स्थानिक गुन्हे शाखा पो.हे.कॉ.अनिस शेख यांनी केली आहे.

## तामलवाडी प्रवासी संघटनेकडून एसटी महामंडळाला दिले गावांच्या नावाचे बोर्ड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील प्रवासी संघटना अध्यक्ष शिवाजी पाटील यांनी एसटी महामंडळाच्या काही गाड्यांना गावांच्या नावाचे बोर्ड दिल्याने पाटील यांचे एसटी महामंडळ आणि स्थानिक गावकऱ्यांकडून कौतुक होत आहे.

गेल्या वर्षांपासून पाटील यांनी राज्यातील एसटी महामंडळांच्या काही विभाग नियंत्रकांशी भेटून, परिवहन मंत्र्यांना भेटून, काही ठिकाणी पत्रव्यवहार करून तामलवाडी पंचक्रोशीतील नागरिकांसाठी तामलवाडी थांबा मिळवून दिला आहे. यामुळे या भागातील नागरिकांची आणि विशेषत: शालेय विद्यार्थ्यांची मोठी सोय झाली आहे. इतकेच नव्हेतर नवीन गाडीचा तामलवाडी थांबा मिळाल्यावर त्या वाहक चालकांचा शिवाजी पाटील हे स्व:खर्चातून त्यांचा बुके, शाल घालून सत्कारही करतात. काही वाहक-चालक तामलवाडी थांबा नाकारत असल्यास लागलीच त्यांच्या अधिकाऱ्यांना भेटून त्या गाडीचा थांबा पाटील हे पूर्ववत करून घेतात.




कारण या पंचक्रोशीतील असणारी हजारो प्रवासी संख्या आणि यामुळे वाढणारे एसटीचे उत्पन्न याचेही महत्व ते एसटी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देतात; यामुळे या ठिकाणचा थांबा अधिकारीही पूर्ववत करतात. नोकरदार मंडळी आणि शालेय विद्यार्थ्यांना वेळेत गाड्या मिळाव्यात, यासाठी पाटील हे स्वत:चा काम धंदा सोडून रोजच सकाळी ३ ते ४ तास ताम लवाडी थांब्यावर थांबतात; हेही त्यांचे विशेषच आहे. एकंदरीत, या प्रवासी संघटना अध्यक्षांमुळे तामलवाडी आणि पंचक्रोशीसाठी कायमस्वरूपी सर्वच एसटी बसेसचा थांबा मिळाला आणि एसटीच्याही उत्पन्नात भरीव वाढ झाली.

**आपल्याला सामाजिक कामाची आवड**

मी यापूर्वी बँक ऑफ महाराष्ट्र शाखा तामलवाडी येथे विनामुल्य नागरिकांची सेवा करीत होतो आणि आजही काही वेळ करतो आहेच. यानंतर शालेय विद्यार्थ्यांचे चालक-वाहकांच्या मनमानीमुळे होणारे नुकसान माझ्या निदर्शनास आल्याने आता या कामात जास्त वेळ घालवित आहे. यातून मला एक रूपयाचाही फायदा होत नाही मात्र राज्यातील सर्वच विभाग नियंत्रकांशी संवाद साधून आणि या गावातील मोठी प्रवासी संख्या निदर्शनास आणून थांबा मिळविला व सर्वांची सोय केली. याच सामाजिक कामातून मला समाधान मिळतो आणि हे व्रत आपण अखंडित चालवित राहू अशीही ग्वाही प्रवाशी संघटना अध्यक्ष शिवाजी पाटील यांनी दै. 'तरूण भारत'शी बोलताना आज (दि. १७) दिली.



### कवी मुबारक, नल्लामंदू व करजगी यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

स्पंदन साहित्य मंडळ पुणे आयेजित बहुभाषिक साहित्य संमेलन ज्येष्ठ कवी बा ह मगदूम यांच्या अध्यक्षतेखाली व प्राचार्य इ. जा. तंबोळी, ज्येष्ठ ब्यंगचित्रकार खलील खान, अय्यूब अहमद, अनिसा शेख, स्वागताध्यक्षा महमूदा शेख, इंतेखाब फराश , अनिस कुट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या वेळी ''टिफीन बॉक्स '' फालीम शेख ही दोन पुस्तकें प्रकाशन करण्यात आली. त्यानंतर विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेल्य ज्येष्ठ कवी मुबारक शेख, उर्दू-मराठीचे ज्येष्ठ साहित्यिक अय्यूब अहमद नल्लामंदू, निवृत प्राध्यपक बी एच करजगी, प्रा. युसूफ शेख यांना ''फखरेमिल्लत'' जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचलन बशीर काजी यांनी केले. गौस पाशा शेख यांनी आभार मानले. यावेळी मुस्लीम कबीर, जाफर बांगी, शेख, शकील जाफरी आर्दींनी पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे अभिनंदन केले



आम्ही सध्या दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची चर्चा थांबवली आहे. आता तेच याबाबत चर्चा करीत आहेत. एका गोष्टीचे आश्चर्य वाटते की, ते आमदारांना बैठकीला बोलवतात, एका रांगेत बसवून सांगतात की, विलीनीकरणाबाबत बोलू नका.
**रोहित पवार**, आमदार


# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

बुधवार, १८ फेब्रुवारी २०२६





नरहरी झिरवाळ यांनी सगळे उभे केले. आयुष्यभर काम केले आहे. कष्टातून ते वरती आले आहेत. ते काही मॅनेजमेंट कोटा वाले नाहीत, स्वतः शून्यातून उभे राहिले आहेत. यामुळे नक्की काय घडले, हे जाणून घेणे गरजेचे आहे.
**सुप्रिया सुळे**, खासदार



एस्टोनियाचे अध्यक्ष अलार करिस सध्या भारत दौऱ्यावर असून, मंगळवारी दिल्ली येथे त्यांनी युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्यासोबत चर्चा केली

## मणिपूरमध्ये चार बंडखोरांना अटक

◆ **इम्फाळ, १७ फेब्रुवारी**

मणिपूरमध्ये विविध प्रतिबंधित संघटनांशी संबंधित असलेल्या एका महिलेसह चार बंडखोरांना सुरक्षा दलांनी अटक केली आहे, असे पोलिसांनी मंगळवारी सांगितले. म्यानमारच्या आंतरराष्ट्रीय सीमेजवळील तेंग्नौपाल जिल्ह्यातील जगनोई भागात रविवारी बंदी घातलेल्या कांगलेई यावोल कन्ना लुप (केवायकेएल) संघटनेशी संबंधित दोन बंडखोरांना अटक करण्यात आली, असे पोलिसांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

सोमवारी इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील सावोम्बुंग भागात बंदी घातलेल्या कांगलेईपाक कम्युनिस्ट पार्टी (नोयोन) संघटनेच्या एका सक्रिय कार्यकर्त्याला अटक करण्यात आली. सोमवारी ताओथोंग खुनौ येथे बंडखोराला अटक केली. ■

# पाकिस्तानात पुन्हा आत्मघाती बॉम्बस्फोट, २५ ठार

**खैबर पख्तुनख्वा प्रांतातील घटना**

- **मशिदीजवळ हल्लेखोराने स्वतःला उडवले**
- **लष्कराचे नऊ सैनिक ठार, ४० लोक जखमी, टीटीपीवर संशय**

◆ **इस्लामाबाद, १७ फेब्रुवारी**

बलुचिस्तान लिबरेशन आर्मी अर्थात् बीएलए आणि पाकिस्तानी लष्करात बलुचिस्तान आणि खैबर पख्तुनख्वा प्रांतात सुरू असलेला संघर्ष शिगेला पोहोचला असताना मंगळवारी सकाळी बाजौर जिल्ह्यातील मामोंड तहसीलमधील मलंगी भागातील मशिदीजवळ आत्मघाती बॉम्बस्फोट झाला. या घटनेत २५ लोक जागीच ठार झाले, तर ४० पेक्षा अधिक जखमी आहे. ठार झालेल्यांत पाकिस्तानी लष्कराच्या नऊ सैनिकांचा समावेश आहे.

ज्या ठिकाणी स्फोट झाला, तेथून लष्करी तळ दोनशे फुटांवर होता. सुरक्षा दलाने बॉम्बस्फोटासाठी दहशतवादी संघटना तहरिक-ए-ताबिबान पाकिस्तान अर्थात् टीटीपीवर संशय व्यक्त केला. पाकिस्तानच्या अशांत खैबर पख्तुनख्वा प्रांतातील मलंगी भागातील मशिदीजवळ नमाजासाठी लोक जमले होते. यात पाकिस्तानी लष्कराच्या जवानांचा समावेश होता. गर्दीत प्रवेश करून एका हल्लेखोराने आत्मघाती स्फोट घडवून आणला.

स्फोट होताच एकच धावपळ उडाली. बचाव पथक आणि घटनेपासून काही अंतरावर असलेल्या लष्करी तळावरील सुरक्षा दलाचे कर्मचारी मदतीसाठी आले. जखमींना तातडीने बाजौर येथील रुग्णालयात हलविण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पाकिस्तानी लष्करातील नऊ सैनिकांसह एकूण २५ जणांना मृत घोषित केले, तर ४० जखमींवर उपचार सुरू असल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. या भागात सुरक्षा वाढविण्यात आली असून, बॉम्बस्फोट प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. हा स्फोट दहशतवादी संघटना टीटीपीने घडवून आणल्याचा संशय आहे.

दरम्यान, महिनाभरापूर्वी राजधानी इस्लामाबादमधील एका मशिदीत आत्मघाती स्फोट झाला होता. ◀(वृत्तसंस्था)



### लष्करी तळाचे नुकसान, मशिदीचे छत कोसळले

स्फोटाची तीव्रता इतकी भीषण होती की, अनेक मृतदेहांच्या चिंधड्या उडाल्या. त्यांची ओळख पटवणे कठीण आहे. दुसरीकडे घटनेपासून काही अंतरावर असलेल्या पाकिस्तानी लष्करी तळाचे मोठे नुकसान झाले. शिवाय मशिदीचे छतदेखील स्फोटामुळे कोसळले. तपास अधिकाऱ्याने सांगितले, हल्लेखोराचा उद्देश लष्करी तळ उडविण्याचा होता, मात्र काही सैनिक नमाजासाठी आल्याने त्याने ऐनवेळी योजनेत बदल केल्याची प्राथमिक माहिती आहे. ■

### शोधमोहिमेत चार दहशतवाद्यांचा खात्मा

बॉम्बस्फोटाच्या घटनेनंतर सुरक्षा दलाने या भागात शोधमोहीम राबवली. यावेळी झालेल्या चकमकीत टीटीपीचे चार सदस्य ठार झाले, तर काही घनदाट जंगलात पसार होण्यात यशस्वी झाले. दरम्यान, सोमवारी पख्तुनख्वा प्रांतातील बन्नू शहरातील दुसऱ्या हल्ल्यात, मिर्यान पोलिस ठाण्याजवळ रिक्षात ठेवलेल्या बॉम्बचा स्फोट झाला, ज्यामध्ये दोन जण ठार झाले आणि १७ जखमी आहे. यापूर्वी इस्लामाबादमध्ये झालेल्या स्फोटाची जबाबदारी इस्लामिक स्टेटने घेतली होती. याप्रकरणात सहा जणांना अटक करण्यात आली. ■

## महाविद्यालयात झालेल्या हाणामारीत विद्यार्थी ठार

◆ **लातूर, १७ फेब्रुवारी**

महाराष्ट्रातील लातूर शहरातील एका महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या दोन गटांमध्ये झालेल्या हाणामारी झाली. यात एका विद्यार्थ्याने चाकूने वार केल्याने दुसऱ्याचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणात तीन जण गंभीर जखमी झाले आहेत, असे पोलिसांनी सांगितले.

सोमवारी संध्याकाळी औसा रोडवरील महाविद्यालयाच्या परिसरात ही घटना घडली आणि त्यानंतर चार विद्यार्थ्यांना अटक करण्यात आली. वैयक्तिक वादातून महाविद्यालयात तृतीय वर्षाला शिकणाऱ्या पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या दोन गटांमध्ये हाणामारी झाली. विक्रम नारायण पांचाळ असे चाकूहल्ल्यात ठार झालेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे. ◀(वृत्तसंस्था)

# मतदार यादीवर आक्षेप असल्यास आयोगाकडे तक्रार करा

**प. बंगाल एसआयआरवर सुप्रीम कोर्टाने याचिकाकर्त्याला सुनावले**

◆ **नवी दिल्ली, १७ फेब्रुवारी**

पश्चिम बंगालमधील मतदार याद्यांची पुनरीक्षण प्रक्रिया अर्थात् एसआयआर प्रकरणी आम्ही हस्तक्षेप करणार नाही, मतदार याद्यांवर तुम्हाला आक्षेप असल्यास निवडणूक आयोगाकडे तक्रार करावी, अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी याचिकाकर्त्याला सुनावले.

एसआयआर प्रक्रियेनंतर जाहीर केलेल्या मतदार याद्यांवर आक्षेप घेत याचिकाकर्त्याने हस्तक्षेप करण्याची मागणी याचिकेतून केली होती. सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. विपुल पंचोली यांच्या न्यायासनाने यावर सुनावणी घेतली. न्यायासनाने कलम ३२ अंतर्गत याचिकाकर्त्याच्या अधिकारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत म्हटले की, तुम्हाला वाटते की आम्ही कलम ३२ अंतर्गत दाखल केलेल्या याचिकेवर विचार करावा आणि तुमचे वडील, तुमची आई आणि तुमचा भाऊ कोण आहेत हे ठरवावे. आम्ही यापूर्वीच स्पष्ट केले की, एसआयआर प्रक्रियेत हस्तक्षेप करणार नाही. तुम्हाला आक्षेप असल्यास निवडणूक आयोगाकडे तक्रार करा. मतदारयादीतील नावात विसंगती असल्यास आयोगाकडे संबंधित पुराव्याचे दस्तावेज सादर करावे, नातेसंबंधाची ओळख करण्याची जबाबदारी न्यायालयाची नाही. मोहम्मद जिमफरहाद नवाज यांनी ही याचिका दाखल केली. आयोगाकडून संविधानाचे कलम १४ आणि ३२४ चे उल्लंघन केले जात असल्याचा आरोप केला होता. ◀(वृत्तसंस्था)

# दिल्लीत लवकरच ‘एआय’ वाहतूक प्रणाली

**वाहतूक पोलिसांचा उपक्रम**

**काम होणार सुलभ**

◆ **दिल्ली, १७ फेब्रुवारी**

भारतात मोठ्या प्रमाणावर कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर केला जात आहे. लवकरच दिल्ली पोलिस त्यांच्या वाहतूक प्रणालीमध्ये मोठा बदल करणार आहे. दिल्ली वाहतूक पोलिस एआय आधारित एकात्मिक वाहतूक व्यवस्थापन प्रणाली लागू करण्याचा विचार करीत आहे. यात स्मार्ट ट्रॅफिक लाईट्स,



ऑटोमॅटिक नंबर प्लेट रेकग्निशन कॅमेरे आणि ऑटोमेटेड चालान समाविष्ट असतील. याचा अर्थ असा की, ही प्रणाली वाहतूक पोलिसांचे काम बऱ्याच प्रमाणात सुलभ करेल आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना आता सहजासहजी पळून जाता येणार नाही.

दिल्लीमध्ये एआय पॉवर्ड इंटिग्रेटेड ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टिम स्थापित केली जाणार आहे. ही प्रणाली स्मार्ट ॲडॉप्टिव्ह ट्रॅफिक सिग्नलचा वापर करेल. एएनपीआर कॅमेऱ्यांचा वापर करून ट्रॅफिक उल्लंघन शोधली जातील. शिवाय ते रिअल टाईममध्ये ट्रॅफिक प्रवाहाचे नियमन करण्यासही मदत करेल. ही प्रणाली ट्रॅफिक कर्मचाऱ्यांचे मॅन्युअल काम कमी करेल. अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, भविष्यासाठी स्केलेबल आणि तंत्रज्ञानावर आधारित वाहतूक परिसंस्था तयार करणे हे उद्दिष्ट आहे. याच्या माध्यमातून वाहतुकीत सुधारणा होईल. ◀(वृत्तसंस्था)

# राजस्थानात फटाका कारखान्यात स्फोट; सात ठार

**पीडितांच्या कुटुंबीयांना तीन लाखांची मदत**

◆ **जयपूर, १७ फेब्रुवारी**

राजस्थानच्या खैरथल तिजारा जिल्ह्यातील भिवाडी शहरात सोमवारी बेकायदेशीर फटाके बनविणाऱ्या एका कारखान्यात स्फोट झाला. या स्फोटात सात जण ठार तर दोघे गंभीर जखमी झाले. ही घटना खुशखेरा-करोली औद्योगिक क्षेत्रात घडली.

मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी या घटनेवर दु:ख व्यक्त करीत मृतकांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी तीन लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. ते ‘एक्स’वरील पोस्टमध्ये म्हणाले, या दु:खद घटनेत राज्य सरकार शोकाकुल कुटुंबीयांच्या पाठीशी आहे.

ही जागा कपड्याच्या कारखान्याच्या नावावर भाड्याने देण्यात आली होती, असे पोलिसांनी सांगितले. परंतु, येथे बेकायदेशीरपणे फटाके तयार केले जात होते. या घटनेची माहिती मिळताच तातडीने बचाव कार्य सुरू करण्यात आले. भजनलाल शर्मा यांनी जिल्हा प्रशासनाला तातडीने बचाव कार्य सुरू करण्याचा निर्देश देत वनमंत्री संजय शर्मा यांना अलवरला पोहोचण्यास सांगितले. शर्मा यांनी दुपारी कारखान्याला भेट देत अधिकाऱ्यांना सविस्तर चौकशी करण्याचा आणि सर्व औद्योगिक युनिट्सची तपासणी करण्यासाठी मोहीम राबविण्याचा निर्देश दिला. तसेच भिवाडी औद्योगिक परिसरातील कारखान्यांची तपासणी केली जाईल. जर अनुपालनाचे कोणतेही उल्लंघन आढळल्यास कारवाई केली जाईल, असेही ते म्हणाले. ◀(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### ‘तुंबाड-२’साठी होतेय् अक्षय खन्नाची चर्चा

**मुंबई** : सोहम शाहचा ‘तुंबाड’ हा चित्रपट २०१८ मध्ये प्रदर्शित झाला होता. आता या चित्रपटाचा सीक्वल येणार आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटात खलनायकाच्या भूमिकेसाठी अक्षय खन्नाच्या नावाची चर्चा होते आहे. बॉलिवूडमध्ये अक्षय खन्नासह नवाजुद्दीन सिद्दीकी याच्या नावाचीही चर्चा होते आहे. या दोघांपैकी कोण खलनायकाच्या भूमिकेत दिसणार याबाबत प्रेक्षकांमध्ये उत्सुकता आहे. ‘तुंबाड-२’ हा पहिल्या भागाच्या वातावरणाशी सुसंगत आहे. ‘तुंबाड-२’च्या कथानकात यापूर्वी न पाहिलेली, अधिक खोल कथा आणि भयानक शत्रू असणाऱ्या पात्राची आवश्यकता असल्याचे चित्रपटाचे टीमचे मत आहे. ■



## रोहित शेट्टीवरील गोळीबार प्रकरणी दुसऱ्या शूटरला अटक

◆ **मुंबई, १७ फेब्रुवारी**

चित्रपट निर्माता रोहित शेट्टी यांच्या घराबाहेर गोळीबार करणाऱ्या दुसऱ्या संशयित शूटरसह इतर सहा जणांना अटक करण्यात आली. त्यांना हरयाणा आणि उत्तरप्रदेशातून ताब्यात घेण्यात आले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली. लॉरेन्स बिश्नोई टोळीचा सदस्य शुभम लोणकरने शेट्टी यांना इजा पोहोचवणे आणि दशहत निर्माण करण्याच्या उद्देशाने ही घटना घडवून आणली.

**हरयाणा, उत्तरप्रदेशात कारवाई**

उत्तरप्रदेश आणि हरयाणा पोलिसांच्या दहशतवाद विरोधी पथकांच्या (एटीएस) मदतीने शहर पोलिसांच्या खंडणीविरोधी पथकाने रविवारी संशयित शूटर आग्रा निवासी दीपक रमेशचंद्र शर्मा आणि इतर सहा जणांना अटक केली.

मुंबई गुन्हे शाखेची सहापेक्षा जास्त पथखे या प्रकरणाची चौकशी करीत आहेत. आरोपींना पकडण्यासाठी अनेक पथके तैनात करण्यात आली आहेत. सहआयुक्त (गुन्हे) लख्मी गौतम आणि अतिरिक्त आयुक्त शैलेश बलकवडे यांच्या नेतृत्वातील पथके या कारवाईवर लक्ष ठेवून होती. या प्रकरणात आतापर्यंत १२ जणांना अटक करण्यात आली असून, मुख्य आरोपी शुभम लोणकर अद्याप फरार आहे. आरोपी शुभम लोणकरच्या इशाऱ्यावर काम करीत होते. शुभमने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. ◀(वृत्तसंस्था)



केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावीची परीक्षा सुरू झाली असून, गुरुग्राममध्ये परीक्षेसाठी आलेल्या विद्यार्थिनीला गोड भरवताना तिची आई

# रेणुका चौधरी यांना हक्कभंगाची नोटीस

◆ **नवी दिल्ली, १७ फेब्रुवारी**

संसदेच्या आवारात एका श्वानाला आणल्याबद्दल आणि खासदारांविरुद्ध अपमानास्पद टिप्पणी केल्याच्या प्रकरणात काँग्रेसच्या राज्यसभा खासदार रेणुका चौधरी यांना हक्कभंगाची नोटीस बजावण्यात आली.




राज्यसभेच्या हक्कभंग समितीने त्यांच्याविरुद्ध आलेल्या तक्रारीची दखल घेत २३ फेब्रुवारीपर्यंत उत्तर सादर करण्यास सांगितले.

भाजपाचे खासदार ब्रिजलाल आणि इंदू बाला गोस्वामी यांनी चौधरी यांच्याविरोधात तक्रार केली होती. यानंतर राज्यसभा अध्यक्षांनी संबंधित तक्रार हक्कभंग समितीकडे पाठवली होती. गेल्या आठवड्यात झालेल्या बैठकीत समितीने याची चौकशी केली आणि त्यांना नोटीस बजावत लेखी उत्तर सादर करण्याचा निर्देश दिला.

दरम्यान, हिवाळी अधिवेशनादरम्यान चौधरी यांनी १ डिसेंबर रोजी संसदेत कारमधून एका श्वानाला आणले होते. यावर काही सदस्यांनी आक्षेप घेतला. त्यावर चौधरी यांनी आत बसलेले लोक चावतात, श्वान चावत नाहीत, असे वादग्रस्त विधान केले होते. ◀(वृत्तसंस्था)

### वृंदावनला पोहोचले ‘विरुष्का’

**मथुरा** : क्रिकेटपटू विराट कोहली पत्नी अनुष्का शर्मासोबत मंगळवारी वृंदावनला पोहोचला. दोघांनी आश्रमात संत प्रेमानंद महाराजांचे दर्शन घेतले. या वर्षी त्यांची ही चौथी भेट आहे. यावेळी दोघेही महाराजांसमोर हात जोडून बसले होते.



यावेळी ते सामान्य लोकांसोबत बसून सत्संगात सहभागी झाले. विराट आणि अनुष्का सकाळी ५:३० वाजता केली कुंज आश्रमात पोहोचले. तिथे सुमारे एक तास थांबले. १६ डिसेंबर रोजी विराट आणि अनुष्काच्या गळ्यात तुळशीची माळ दिसली. महाराजजी, आम्ही तुमचे आहोत आणि तुम्ही आमचे आहात, असे अनुष्का म्हणाली. यावर आपण सर्व श्रीजींचे आहोत. खूप आनंदात राहा. मस्त राहा. देवाच्या आश्रयाने राहा, असे हसत प्रेमानंदजी म्हणाले. ■

# खगोलशास्त्रज्ञांना आढळली वेगळी ग्रहमाला

◆ **लंडन, १७ फेब्रुवारी**

खगोलशास्त्रज्ञांना एक वेगळी ग्रहमालेपेक्षा आढळली आहे. या ग्रहमालेत नियमांच्या विरुद्ध म्हणजे खडकाळ ग्रह त्याच्या ताऱ्यापासून दूर अंतरावर फिरत आहेत. या नवीन ग्रहमालेत चार ग्रह आहेत. सामान्यत: ग्रह निर्मितीच्या सिद्धांतानुसार, खडकाळ ग्रह हे ताऱ्याच्या जवळ असतात आणि वायुरूप ग्रह हे दूर असतात. या नवीन शोधामुळे शास्त्रज्ञांना आधीच्या सिद्धांतांचा फेरविचार करावा लागणार आहे.

‘सायन्स’ या नियतकालिकेत प्रसिद्ध झालेल्या संशोधनानुसार ही ग्रहमाला आपल्या सूर्यमालेपेक्षा




पूर्णपणे वेगळी आहे. ही ग्रहमाला उलट रचनेची आहे. आपल्या सूर्यमालेत बुध, शुक्र, मंगळ आणि पृथ्वी हे खडकाळ ग्रह सूर्याच्या जवळ आहेत. गुरू आणि शनीसारखे वायुरूप महाकाय ग्रह हे सूर्यापासून दूर आहेत. या मालेत असलेले पहिले तीन ग्रह सामान्य नियमांचे पालन करतात, तर चौथा आणि सर्वात बाहेरचा ग्रह हा खडकाळ आहे. हा ग्रह दोन वायुरूप ग्रहांच्या पलीकडे स्थिर आहे. हे एक वेगळे समीकरण आहे. सामान्यत: खडकाळ ग्रह मूळ ताऱ्यापासून इतक्या लांब, वायुरूप ग्रहाच्या बाहेरच्या बाजूला तयार होत नाहीत, असे युनिव्हर्सिटी ऑफ वॉर्विकचे शास्त्रज्ञ आणि या अभ्यासाचे सहलेखक थॉमस विल्सन म्हणाले.

आतापर्यंतचे ग्रह निर्मितीचे सिद्धांत हे आपल्या सूर्यमालेवर आधारित होते. मात्र, जसजशा नवीन ग्रहमाला समोर येत आहेत, तसतसे आम्हाला हे सिद्धांत बदलावे लागणार आहेत. हा शोध लावताना आधी संशोधकांनी ‘एलएचएस १९०३’ या लाल खुजा ताऱ्याचे निरीक्षण केले. २०१९ ते २०२३ दरम्यान ‘ट्रान्झिटिंग एक्सोप्लॅनेट सर्व्हे सॅटेलाईट’ आणि ‘कॅरेक्टरायझिंग एक्सोप्लॅनेट सॅटेलाईट’ या उपग्रहांच्या मदतीने या ग्रहांचा अभ्यास करण्यात आला. ◀(वृत्तसंस्था)

### चारही ग्रह वेगवेगळ्या वेळी झाले तयार

**हे चारही ग्रह एकाच वेळी तयार झाले नाहीत. ते एकामागून एक तयार झाले असावेत. यामुळे प्रत्येक नवीन ग्रहासाठी तिथले वातावरण बदलत गेले. हा शोध खगोलशास्त्रातील मूलभूत समजांना आव्हान देणारा ठरला आहे. या शोधामुळे विश्वात ग्रहांची निर्मिती कशी होते याबद्दल नवीन माहिती मिळणार आहे, असे मत शास्त्रज्ञांनी व्यक्त केले आहे.** ■

### ‘द केरला स्टोरी-२’चा ट्रेलर प्रदर्शित

**मुंबई** : ‘द केरल स्टोरी-२ : गोज बियॉन्ड’ या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. ३ मिनिटे २७ सेकंदांचा हा ट्रेलर पहिल्या भागापेक्षा अधिक गंभीर आणि तीव्र दिसतो. यात तीन वेगवेगळ्या राज्यांमधील धर्मांतराशी संबंधित कथा दाखवण्यात आल्या आहेत. हा चित्रपट २७ फेब्रुवारी रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट तीन हिंदू मुली उल्का गुप्ता, अदिती भाटिया आणि ऐश्वर्या ओझा यांच्या धक्कादायक कथेला समोर आणतो. त्या तीन मुली मुस्लिम मुलांच्या प्रेमात पडतात, यानंतर त्यांचे आयुष्य भयानक वळण घेते. हळूहळू त्या नात्यांमागे कथितरीत्या धर्मांतराचा एक सुनियोजित अजेंडा समोर येतो. या चित्रपटाचे दिग्दर्शन कामाख्या नारायण यांनी केले असून, विपुल अमृतलाल शाह हे निर्माते आहेत. ■



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# जागतिक नेतृत्वाची नवी संधी!

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील आश्चर्यकारक क्रांती म्हणून नव्या शतकात उदयास आलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता नावाच्या दुधारी हत्याराचे संपूर्ण उपयोग ध्यानात येण्याआधीच त्याच्या विनाशकारी बाजूच अगोदर उजेडात येऊ लागली. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर विवेकाने झाला नाही, तर आधुनिक तंत्रज्ञानाच्या रूपाने माणसाच्या मानगुटीवर बसलेला हा भस्मासुर आपल्या प्रगतीच्या सर्व वाटांनाच गिळंकृत करून भयाचे वातावरण निर्माण करेल, ही शंका खरी ठरू लागल्यानंतर आता त्याला लगाम घालण्याच्या जागतिक प्रयत्नांमध्ये भारताने घेतलेला पुढाकार लक्षणीय ठरतो. सोमवारपासून राजधानी दिल्लीत सुरू झालेल्या 'इंडिया एआय इम्पॅक्ट समीट २०२६' या पाच दिवसांच्या परिषदेत, याच तंत्रज्ञानाचे धोके आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराचे विविध पैलू यांचा व्यापक अभ्यास होणार आहे. एकूण ७०० सत्रांमध्ये या परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या पैलूंचा अभ्यास, उपयोग, उपद्रव आणि उपाय या सर्व बाबींवर सखोल विचारमंथन होणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करताना घ्यावयाची सुरक्षिततेची काळजी, शासन-प्रशासनातील कृत्रिम बुद्धिमत्तेचा सदुपयोगी वापर, देशाच्या दृष्टीने संवेदनशील समजल्या जाणाऱ्या क्षेत्रांत हे तंत्रज्ञान वापरण्याची भारतीय नीती आणि जागतिक परिक्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराबाबतचा दृष्टिकोन अशा विविध मुद्द्यांचा या परिषदेत ऊहापोह होणार आहे. या परिषदेत या तंत्रज्ञानाच्या विवेकी वापराविषयीची जागतिक स्तरावरील मार्गदर्शक तत्त्वे निश्चित झाली, समस्यांवरील उपायांचा ऊहापोह झाला, तर या तंत्रज्ञानाच्या वापराबाबत भारत जगाचे नेतृत्व करेल आणि जागतिक मंचावर भारताच्या मानवी बुद्धिमत्तेचा पुरावाही सिद्ध होईल.

सामाजिक सुरक्षिततेस आव्हान देणाऱ्या वा समाजहितास घातक अशा कोणत्याही गोष्टीस लगाम घालावयाचा असेल, तर जनजागृती हा सर्वाधिक महत्त्वाचा उपाय असतो. वाढती गुन्हेगारी, फसवणूक, आर्थिक घोटाळे, भ्रष्टाचार आदी अनेक बाबी सामाजिक स्वास्थ्य बिघडविणाऱ्या असतात. त्यांना आळा घालण्यासाठी प्रशासनात यंत्रणा सतत सजग असतातच; पण समाजाने किंवा नागरिकांनी जागरूक राहून अशा बाबींविरोधात सावधानता बाळगली, तर यापासून उद्भवणारे धोके टाळणे शक्य होते. डिजिटल व्यवहारांचे असंख्य फायदे देशात दिसू लागल्यानंतर डिजिटल फसवणुकीचे गैरप्रकार देशात वाढू लागले. अनेकांना अशा फसवणुकीचे फटके बसू लागल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही त्याची गंभीर दखल घेतली. गेल्या काही वर्षांत अशा गुन्हेगारीच्या माध्यमातून कष्टाने मिळविलेल्या कोट्यवधींच्या रकमेवर गुन्हेगारांनी डल्ला मारलाच; पण निष्पाप, निरपराध सामान्य नागरिकांस प्रचंड मनस्तापही भोगावा लागला आहे. एखाद्या गंभीर गुन्ह्यात हात असल्याचा आरोप करणाऱ्या दूरध्वनीमुळे कुटुंबाचे मानसिक स्वास्थ्य बिघडल्याच्या व मानसिक ताण असह्य झाल्यामुळे मृत्यू ओढवल्याच्या काही घटना याआधी घडल्या असल्याने 'डिजिटल अरेस्ट' नावाने फोफावलेली सायबर गुन्हेगारी असो किंवा डिजिटल संकेतांकांची चोरी करून पैशाची लुबाडणूक असो, असे प्रकार रोखण्याकरिता जनतेनेच जागरूक राहावयास हवे. 'थांबा, विचार करा आणि कृती करा' असा एक कानमंत्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एका संवादात्मक कार्यक्रमातून जनतेस दिला होता. पण या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या गैरवापराची पातळी एवढी खाली गेली आहे की, एवढ्या उपाययोजना माणसाच्या डिजिटल सुरक्षिततेची कडेकोट हमी देण्यास अपुऱ्या ठरू लागल्या आहेत. या तंत्रज्ञानाद्वारे होणारी फसवणूक म्हणजे सामाजिक आणि आर्थिक सुरक्षिततेवरील घाला आहे, त्यामुळे या परिषदेच्या निमित्ताने अशा धोक्यांना आळा घालण्यासाठी भारतास आपली संपूर्ण प्रतिभा कशा प्रकारे पणाला लावावी लागणार आहे, सार्वजनिक डिजिटल सुविधांचा विस्तार करताना सुरक्षिततेची कोणती खबरदारी घ्यावी लागणार आहे आणि या तंत्रज्ञानाचा सर्वाधिक वापर होत असलेल्या स्वदेशी क्षेत्रांचा पाया जागतिक स्तरापर्यंत विस्तारण्यास कोणती मदत होणार आहे आदी बाबी स्पष्ट होतील. जगाच्या दृष्टीने या बाबी सार्वत्रिकदृष्ट्या मार्गदर्शक ठरणार असल्याने, या क्षेत्राच्या सुरक्षित आणि विवेकशील वापराच्या नैतिकतेची संहिता आखून देणारा भारत हा जगातील पहिला देश ठरणार आहे.

डिजिटल गुन्हेगारीचा वाढता सुळसुळाट पाहता, आगामी काळात कृत्रिम बुद्धिमत्तेचा गैरवापर हे भारतासमोरील सर्वात मोठे आव्हान असेल. जसजसे कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान विकसित होत जाते, तसतसा त्याचा गैरफायदा घेण्याचे तंत्रज्ञान विकसित होत असते. त्यातूनच सायबर गुन्हेगारी वाढीस लागली असून कोट्यवधी रुपयांची लूट सुरू झाली आहे. या गुन्हेगारीस आळा घालण्याचे उपाय शोधणाऱ्या असंख्य परिषदा गेल्या काही वर्षांत झाल्या. या क्षेत्रातील तज्ज्ञांनी उपाय शोधण्यासाठी अहोरात्र संशोधने सुरू ठेवली आहेत. दहशतवादाहूनही अधिक भय फैलावणाऱ्या व असुरक्षिततेचे सावट माजविणाऱ्या या गुन्ह्याचे आव्हान अधिकाधिक गडद होऊ लागले असून सायबर गुन्हेगारी पूर्णपणे रोखणे सोपे नाही, याची जाणीव आता या यंत्रणांनाही झाली आहे. समाजमाध्यमांचा प्रचंड फैलाव झाल्यामुळे आभासी मंचाची उपलब्धता आता सर्वांसाठी सोपी झाली आहे. प्रचंड प्रमाणात वाढलेल्या फसवणुकीच्या असंख्य प्रकरणांचा तपास गेल्या १० वर्षांहूनही अधिक काळापासून संपूर्ण यशाच्या टप्प्यापर्यंत पोहोचू शकलेला नाही. या गुन्हेगारांचा नेमका ठावठिकाणा शोधणे हे एक आव्हान आहे. अनेकदा ही गुन्हेगारी देशाबाहेर असल्याने कायदेशीर कारवाईवरही मर्यादा येत असल्याचे सांगण्यात येते. या गुन्हेगारीची पाळेमुळे शोधण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता हे विकसित तंत्रज्ञानाचे वरदान ठरेलच, पण त्याचा गैरवापर झाल्यास तो सर्वात धोकादायक शापही ठरेल, ही सुरुवातीची भीती वास्तविक असल्याच्या जाणिवा आता होऊ लागल्या आहेत. डीपफेक, कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा वापर करून होणारे सायबर हल्ले नजीकच्या भविष्यकाळात तीव्र होणार आहेत, असा इशारा देणारा 'डाटा सिक्युरिटी कौन्सिल ऑफ इंडिया (डीएससीआय)'चा एक अहवाल अलिकडेच प्रसिद्ध झाला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर करून घडणारे असे गुन्हे शोधणे अधिक अवघड होणार आहेच; या गुन्ह्यांचे जाळे पसरविणे मात्र सोपे होणार आहे, असा या अहवालाचा इशारा आहे. गेमिंग ॲप्स, अधिक परताव्याची प्रलोभने दाखवून ऑनलाईन गुंतवणुकीची आमिषे, ओटीपीच्या माध्यमातून होणारी लुबाडणूक अशा अनेक प्रकारांचा सुळसुळाट झाला आहे. केवळ डिजिटल अरेस्टसारख्या भयावह गुन्हेगारीतून आणि शेअर बाजारातील गुंतवणुकीच्या माध्यमातून पैसे कमावण्याच्या प्रलोभनांस बळी पडून नागरिकांची हजारो कोटींची कमाई सायबर गुन्हेगारांनी लुबाडली आहे. केवळ आर्थिक लुबाडणूक हेच या तंत्रज्ञानाच्या गैरवापराचा भस्मासुर रोखण्यापुढील आव्हान नाही, तर या माध्यमातून संवेदनशील माहितीची चोरी, सामाजिक शांततेस धोका निर्माण करणाऱ्या हालचाली रोखण्याचे आव्हानही यापुढे बिकट होत जाणार आहे. सरकारी सेवांच्या नावाने बनावट ॲप्लिकेशन तयार करून लोकांस लुबाडण्याचे व फसविण्याचे प्रकार वाढीस लागण्याची भीती असल्याने, एकंदरीतच संपूर्ण व्यवस्थांची विश्वासार्हता पणाला लागणार आहे. सरकारी सेवांच्या नावाने समाजमाध्यमांवर बनावट व्यवस्था निर्माण करून त्यामध्ये गुंतवणूक करण्याची आमिषे दाखवून फसविण्याचे प्रकार वाढले, तर ते मोठेच संकट ठरेल. त्यामुळे ज्या कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्राचा वापर करून गुन्हेगारीने उच्छाद मांडला, तेच तंत्र वापरून गुन्हेगारी मोडून काढण्याचे मार्ग या परिषदेत शोधले जातील आणि डिजिटल सुरक्षितता, सामाजिक आर्थिक संवेदनशीलता जपली जाऊन या तंत्रज्ञानाविषयी विश्वासाचे वातावरण निर्माण करण्यास ही परिषद उपयुक्त ठरली, तर ते भारताचे मोठे यश ठरेल. सायबर गुन्हेगारांना वेसण घालून नागरिकांचे हक्क सुरक्षित राखण्यासाठी सरकारी स्तरावर प्रयत्न सुरू असले, तरी नागरिकांनी जागरूकता दाखविली तरच या युद्धास बळ मिळणार आहे. सायबर गुन्ह्यांचे सतत डोक्यावर दाटलेले मळभ दूर होण्यासाठी ही परिषद महत्त्वपूर्ण ठरली, तर तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील भारताचे नेतृत्व जगाला मान्य करावे लागेल. यासाठी केंद्र सरकारच्या पुढाकाराने सुरू झालेली ही परिषद महत्त्वाची भूमिका बजावेल. जगभरातील ४५ हून अधिक देशांतील नेते, धोरणकर्ते, उद्योजक आणि तंत्रज्ञान क्षेत्रांतील तज्ज्ञ याच नजरेने या परिषदेकडे पाहात आहेत.

## स्मरण

# अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे देखणे कुमार मामा

डॉ. रिता विवेक सोनटक्के

तुमचं असणं सर्व काही होतं. आयुष्यातील एक ते सुवर्ण पर्व होतं. आज सर्व काही असल्याची जाणीव आहे पण तुमचं नसणं हीच मोठी उणीव आहे. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी शशिकुमार शंकरराव भगत यांचे निधन झाले. मृत्यू हे एक शाश्वत सत्य असले तरी त्यांच्या मृत्यूमुळे आमच्या आयुष्यात एक पोकळी निर्माण झाली आहे. शशिकुमार भगत यांचा जन्म १८ डिसेंबर १९४४ साली मुक्तापूर येथे झाला. त्यांना तीन मोठ्या बहिणी व तीन मोठे भाऊ होते. ते घरात सर्वांत लहान असल्यामुळे सगळ्यांचे लाडके होते. दै. तरुण भारतमध्ये त्यांनी १९६८ ते २००४ पर्यंत जवळपास ३६ वर्षे काम केले व कार्यकारी संपादक म्हणून ते निवृत्त झालेत. चित्रपटसृष्टीवरील त्यांचे लिखाण अतिशय प्रसिद्ध होते. त्यांचे व्यक्तिमत्व अतिशय देखणे, मृदुभाषी व साधे होते.

भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते. अप्रतिम, अत्यंत साधी व सोपी भाषा त्याला साहित्यिक वळण असे त्यांचे लिखाण होते. ते फक्त आमचेच मामा नव्हते तर बहुतांश लोक त्यांना कुमार मामा म्हणत असे. स्वच्छतेची अत्यंत आवड असणारे, देखणे कर्तबगार व सरस्वतीचा वरदहस्त असणारे आमचे मामा आज आपल्यात नाहीत, हे सत्य पचवणे जरा जडच जात आहे. त्यांनी ८० व्या दशकातील अनेक चित्रपट कलाकारांच्या मुलाखती घेतल्या होत्या. त्यामुळे त्यांच्यासोबत प्रत्यक्ष भेटीचा सुवर्णयोग त्यांना मिळत असे. ते १९९१ साली पत्रकार संघाचे अध्यक्ष होते. बरेच वर्ष त्यांनी तरुण भारतच्या दिवाळी अंकाची मुख्य संपादक म्हणून जबाबदारी सांभाळली. त्यातील एका अंकाला प्रथम क्रमांक मिळाला होता. अनेक



पुस्तकांसाठी प्रस्तावना लिहिल्या. त्यात डॉ. शेंबेकर यांच्या तसेच इकेबाना या लताताई व्यवहारे यांच्या पुस्तकांचा समावेश आहे. दि. ३ जून २००३ रोजी जर्मनी, रशिया व स्वित्झर्लंड या तीन देशांचा दौरा आटोपून तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे विशेष विमान मायदेशी परत निघाले होते. या विमानात अटलजी यांच्या प्रतिनिधी मंडळासोबत जे सुमारे दोन डझन पत्रकार होते त्यात तरुण भारतचे शशिकुमार भगत हेसुद्धा होते. ते जवळपास आठ दिवस अटलजींसोबत होते. मला वाटतं की, ते त्यांच्या आयुष्यातील एक अपूर्व, चिरंतन टिकणारे व अविस्मरणीय क्षण असावेत. त्यांना अटलजींची मुलाखत घेण्याची संधी मिळाली व तसेच त्यांच्यासोबत घालविलेले देवदुर्लभ क्षण म्हणजे सुवर्ण पर्वणीच असावी. फक्त अटलजीच नव्हे तर दिवंगत प्रमोद महाजन हे जेव्हा भंडारा जिल्ह्यात दौऱ्यावर होते तेव्हा त्यांची सुद्धा मुलाखत मामांनी घेतली होती. १९८० मध्ये बंगलोर फिल्म फेस्टिव्हलमध्ये त्यांनी सत्यजित रे, यश चोप्रा व गुलजार यांची मुलाखत घेतली. संपादक असल्यामुळे विविध विषयांवर अप्रतिम असे लिखाण व सिनेसृष्टीतील दिग्गज लोकांच्या त्यांनी भेटी व मुलाखती घेतल्या. त्यात गुलाम अली, सचिन पिळगावकर, स्मिता पाटील, ओम शिवपुरी, नितीन मुकेश, राजीव कपूर, वैजयंती माला, सुरेश ओबेरॉय, हेमा मालिनी इत्यादी कलावंतांचा समावेश आहे. त्यांच्यासोबत त्यांचे सुंदर फोटो पण आहेत.

मामांच्या मित्रपरिवारामध्ये नागपुरातील अनेक नामवंत डॉक्टरांचा समावेश होता. त्यात मेडिकलचे अधिष्ठाता स्व. डॉ. चौबे, स्व. डॉ. व्यवहारे, डॉ. बाभुळकर, डॉ. शेंबेकर, डॉ. कोलवाडकर आदींचा समावेश आहे. कुमार मामा आज आपल्यात नाही, पण त्यांचे लिखाण, त्यांच्या आठवणी आपल्यासोबत सदैव राहतील यात तिळमात्र शंका नाही. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी मीना मामी व मुलगी केतकी, जावई जयदीप, नातू व नात आहेत. ईश्वर त्यांच्या आत्म्याला चिरशांती देवो हीच प्रार्थना. ओम शांती शांती!

"Though you are not with us but your memories in the form of beautiful write up will be forever."

९४२२८२७५४७

## वेध

विजय निचकवडे

# 'पांढऱ्या' कोटातील 'काळा' कारभार!

आज आम्हाला 'स्व'चा विसर पडला आहे. म्हणजे स्वतःचे कर्तव्य, जबाबदाऱ्या विसरत चाललो आहोत. म्हणूनच जे आपल्याशी सुसंगत नाही, त्याची 'संगत' वाढली अन् नीतिमूल्यांचा ऱ्हास झाल्यागत आपण वागू लागलो आहोत. दिवसागणिक नवनवीन पण मन सुन्न करणारे प्रकार पुढे येत आहेत. डॉक्टर आमच्यासाठी देवचं ना, पण तोच जिवाचा बाजार मांडत असेल आणि या बाजारात खरेदीदारांची गर्दी वाढून जिवांची बोली लागत असेल तर 'पांढऱ्या' कोटातील 'काळा' कारभार नैतिक अधःपतन नव्हे का? नीती, मूल्ये, समाजभान आणि सामाजिक दायित्व या गोष्टी गाठोड्यात बांधल्या गेल्या आहेत. मी, माझं आणि माझ्यासाठी एवढ्याच विश्वात स्वतःचं समाधान शोधणारी मानसिकता बोकाळत चालली आहे. हे सर्व करताना पैसा हा प्रत्येकाची कमजोर होऊन बसला आहे. पैसा मिळविण्यासाठी वाट्टेल त्या थराला जाण्याची तयार अनेकांची असते अन् त्याचा प्रत्ययही अनेकदा येतो. मात्र, हे करताना आपण आपल्या 'स्व' ला गहाण ठेवतो, याचे भान कुणाला नाही. माझी जबाबदारी काय? मी ज्या पेशात आहे, त्याचे कर्तव्य कोणते? त्याकडे लोकांचा पाहण्याचा दृष्टिकोन कसा आहे? हे आर्थिक स्वार्थापुढे विसरलो आणि नीतिमूल्यांचा ऱ्हास होण्यास सुरुवात झाली.

खरं तर वैद्यकीय क्षेत्र म्हणजे पवित्र! डॉक्टर म्हणजे आम्हा प्रत्येकासाठी देवापेक्षा कमी नाही. कारण ते हात अनेकांचे जीव वाचवितात. मोठ्या विश्वासाने आम्ही आमच्या जिवापाड जपत असलेल्या लोकांना उपचारासाठी डॉक्टरांच्या सुपूर्द करतो. यामागे असतो, तो केवळ आणि केवळ डॉक्टरांवरील विश्वास! आज हा विश्वास किती ठेवावा, असा प्रश्न निर्माण झाला आहे. या क्षेत्रातील काही महाभागांचे प्रताप वैद्यकीय क्षेत्रालाही नासवीत आहे. चार-दोन लोकांच्या कृतीने खऱ्या अर्थाने प्रामाणिकपणे आपले कर्तव्य वहन करणाऱ्या डॉक्टरांनाही खाली पाहण्याची वेळ येते, तेव्हा नैतिक अधःपतन झाल्याची जाणीव होते.

भंडारा जिल्ह्यात सध्या चांगलेच चर्चेत असलेले बाळ विक्री प्रकरण डॉक्टरांवरील विश्वास क्षणात संपविणारे आहे. उपचाराच्या नावाखाली रुग्णालयात ठेवीत असल्याचे सांगून चक्क लाखो रुपयात एका नवजात चिमुकलीचा 'सौदा' करून स्वतःच्या घरात आर्थिक संपन्नता आणण्याचा प्रयत्न करणारा डॉक्टर खरंच डॉक्टर म्हणविण्याचा योग्यतेचा आहे का? ज्या हातांनी जीव वाचवायचे, तेच हात जीव विकू लागले तर हा मांडलेला जिवाचा बाजार विकृत मानसिकतेचे दर्शन घडविणाराच आहे. जागतिक स्तरावर मुलांची विक्री हा अतिशय गंभीर आणि अमानवीय गुन्हा मानला जातो. पण हे जर सुशिक्षित मानवी मनाला समजत नसेल, तर हे बाजार भविष्यात व्यापक स्वरूपाचे होतील, हे तेवढेच खरे! कुणाच्या तरी परिस्थितीचा फायदा घेत स्वतःचा स्वार्थ साधायचा. हे करताना आपले कर्तव्य, आपल्या व्यवसायातील नैतिकता विकून टाकल्यागत वागायचे, याचे समर्थन होऊच शकत नाही? वैद्यकीय व्यवसायातील नीतिमत्ता पायदळी तुडविण्याचा हा प्रकार विविधांगांनी विचार करण्यास भाग पाडणारा आहे. अशावेळी डॉक्टरांचे दवाखाने म्हणजे बाळ विक्रीचा सुरक्षित अड्डा म्हणायचा का? हा प्रश्न पडतो. एक डॉक्टर असे करत असेल, तर ही नक्कीच त्याच्या वैद्यकीय व्यवसायाशी केलेली प्रतारणा आहे. पण मग अशा मानसिकतेला खतपाणी घालणाऱ्या समाजाचाही विचार व्हायला हवा! मुलांची विक्री हा प्रकार अवैध दत्तक विधान म्हणूनही पाहिला जातो. जे नियमानुसार नाही, ज्यासाठी 'त्या' जिवांची बोली लागते, ते चुकीचेच आहे. याची जाणीव असातानाही मुलांची खरेदी करण्याची चूक करण्याचे धाडस का होते, हा प्रश्नच आहे. डॉक्टरांनी जरी असा बाजार मांडला, तरी त्या बाजारात जाऊन व्यवहार करायचे की नाही, याचे तारतम्य या सौदबाजीत सहभागी होणाऱ्यांनी ठेवायला पाहिजे. आज मुलं न होणे ही समस्या वाढताना दिसते. याची अनेक कारणेही असतील. पण मग पैसे देऊन विकत घेतलेल्या मुलांमध्ये आपण खरा आनंद शोधू शकतो का? वस्तूंच्या बाजारातून एखादी गोष्ट विकत आणल्यानंतर त्याबद्दल किती आत्मियता आणि जिव्हाळा आम्हाला असतो, हे सर्वश्रुत आहे. तेवढ्यापुरते असलेले कौतूक नंतर आटू लागते. अशावेळी पैसे मोजून आणलेल्या बाळाप्रतीचा जिव्हाळा, प्रेम आटू लागल्यास अशा लेकरांची आयुष्यभराची होणारी हेळसांड मानवतेच्या सर्व सीमा पार करणारीच असेल! डॉक्टर म्हणून त्यांनी मांडलेला लेकरांचा बाजार नक्कीच त्यांच्या नैतिक अधःपतनाचे लक्षण आहे, पण माणूस म्हणून आपल्याला परमेश्वराने दिलेल्या वैचारिक क्षमतेचा वापर करून अशा बाजारांमध्ये आपण खरेदीसाठी जायचे की नाही, याचा विचार आपल्यालाच करायचा आहे. नाहीतर आज एक बाळ विकले गेले, उद्या हा आकडा वाढेल आणि आपण केवळ हे किती चुकीचे आहे, यावरच चर्चा करत राहू.

९७६३७१३४१७

## विशेष

# समुद्रानजीक औद्योगिकीकरण फायदेशीर

प्रा. सुखदेव बखळे

भारताला साडेसात हजार किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा लाभला असून देशात सुमारे २१२ लहान आणि मोठी बंदरे आहेत. तथापि, पायाभूत सुविधांच्या कमतरता शेवटच्या मैलाची मर्यादित कनेक्टिव्हिटी आणि एकात्मिक नियोजनाच्या अभावामुळे अनेक दशकांपासून ही क्षमता वापरात आली नाही. किनारपट्टीच्या फायद्याचे धोरणात्मक आणि आर्थिक महत्त्व ओळखून भारत सरकारने 'सागरमाला' कार्यक्रम सुरू केला. सागरमाला कार्यक्रम किनारपट्टी विकासासाठी अतिशय महत्त्वाचा आहे. हा केवळ पायाभूत सुविधांचा प्रचार नाही, तर अभियांत्रिकी, अर्थशास्त्र, शाश्वतता आणि प्रशासन यांना एकत्र आणणारा परिवर्तनात्मक अजेंडा आहे. कार्यक्रमाचे यश केवळ भांडवली गुंतवणुकीवरच नाही, तर अनुभवजन्य डेटा आणि पर्यावरणीय जागरूकतेद्वारे मार्गदर्शन करणाऱ्या निर्णयांच्या गुणवत्तेवरदेखील अवलंबून आहे. येत्या काही वर्षांमध्ये भारताची बंदर क्षमता चार हजार दशलक्ष टन प्रति तासाहून अधिक होण्याचा अंदाज आहे. ही वाढ ग्रीनफील्ड डेव्हलपमेंट, मोठ्या नसलेल्या बंदरांवर क्षमता वाढ आणि विद्यमान बंदरांवर तांत्रिक सुधारणा यांच्या मिश्रणातून होईल. सागरमाला कार्यक्रमाचे वेगळेपण म्हणजे त्याचा एकात्मिक दृष्टिकोन. तो बंदरांकडे केवळ स्वतंत्र मालमत्ता म्हणून पाहत नाही, तर औद्योगिक कॉरिडॉर, लॉजिस्टिक्स पार्क, अंतर्देशीय जलमार्ग आणि सामाजिक विकास उपक्रमांसह मोठ्या परिसंस्थेचे आवश्यक घटक म्हणून पाहतो.

एकंदरीत, कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे भारतातील शाश्वत, समावेशक आणि कार्यक्षम बंदर परिसंस्थेचा मार्ग मोकळा होईल. बंदरे आणि शिपिंगची पुनर्कल्पना परिघीय पायाभूत सुविधा म्हणून नव्हे, तर राज्याच्या आर्थिक विस्ताराच्या पुढील टप्प्यासाठी केंद्रस्थानी म्हणून केली जात आहे. महाराष्ट्राला ७२० किलोमीटरचा लांबीचा किनारा आणि जगातील काही सर्वांत व्यस्त बंदरे लाभली आहेत. बंदरे अस्तित्वात होती, परंतु बहुतेक उपयुक्तता म्हणून, धोरणात्मक वाढीचे इंजिन म्हणून नाही. त्याचा आता पुनर्विचार केला जात आहे. जागतिक व्यापारपद्धती बदलत असताना आणि लॉजिस्टिक्स खर्च स्पर्धात्मकतेला आकार देत असताना महाराष्ट्र विकासाच्या दृष्टिकोनाचे पुनर्संचयन करत आहे. बंदरे आणि जहाजबांधणी ही उपपायाभूत सुविधा म्हणून नव्हे, तर राज्याच्या आर्थिक विस्ताराच्या पुढील टप्प्यातील केंद्र म्हणून पुनर्कल्पित केली जात आहे. किनारपट्टी एक आर्थिक संसाधन आहे. सागरी मालमत्ता मूलभूत आहेत. उत्पादन आणि निर्यात केंद्र म्हणून उदयास येण्याच्या भारताच्या तीव्र इच्छेने लॉजिस्टिक्स कार्यक्षमता धोरणाच्या प्रकाशझोतात आणली आहे. आज बंदरे कार्गो हाताळण्या व्यतिरिक्तही बरेच काही करतात. कारखाने कुठे आणले जातात, पुरवठा साखळ्या कशा आयोजित केल्या जातात आणि कोणते प्रदेश गुंतवणूक आकर्षित करतात यावर त्यांचा प्रभाव पडतो.

महाराष्ट्राचे नूतनीकरण केलेले सागरी लक्ष्य 'सागरमाला'सारख्या राष्ट्रीय उपक्रमांशी सुसंगत आहे, परंतु त्यावर एक वेगळा राज्यस्तरीय भर आहे. बंदर नेतृत्वाखालील औद्योगिकीकरण हे त्याचे ध्येय आहे. बंदरांचा वापर करून किनाऱ्यावरील उत्पादनसमूह, लॉजिस्टिक्स इकोसिस्टिम आणि रोजगार निर्मितीसाठी एक आधार म्हणून काम करणे हेच त्याचे उद्दिष्ट आहे. या मांडणीत बंदरे ही अंतिम बिंदू नाहीत, तर राज्याच्या आर्थिक सुबत्तेचे प्रवेशद्वार आहेत. प्रस्तावित



वाढवण बंदर महाराष्ट्राच्या महत्त्वाकांक्षेचे प्रमाण दर्शवते. मुंबईच्या विद्यमान बंदरांवर गर्दी कमी करणे आणि पश्चिम किनाऱ्यावरील भारताच्या ट्रान्सशिपमेंट क्षमता मजबूत करणे, हे त्याचे उद्दिष्ट आहे. आधुनिक बंदरे वेळेचा कार्यक्षम वापर करू शकतात. मालवाहतुकीचा खर्च कमी करू शकतात आणि पुरवठा साखळीची विश्वासार्हता सुधारू शकतात. हे फायदे किनाऱ्यापासून दूर असलेल्या औद्योगिक पट्ट्यांमध्येदेखील होतात. महाराष्ट्राच्या बंदर धोरणातील एक परिसंस्था कार्गो हाताळणीच्या पलीकडे विस्तारलेली आहे. ती एक परिसंस्थाच असून त्यात लॉजिस्टिक्स पार्क, जहाजबांधणी आणि दुरुस्ती सुविधा, मत्स्यपालन पायाभूत सुविधा किनारी पर्यटन आदी घटकांचा समावेश होतो. हे सर्व घटक एकत्रितपणे 'नील अर्थव्यवस्थे'शी निगडित आहेत. समुद्र आणि किनाऱ्यांशी जोडलेल्या आर्थिक क्रियाकलापामध्ये व्यापार, उपजीविका आणि सेवांचा समावेश होतो. विशेषतः कोकणात बंदरांशी निगडित विकास दीर्घकाळापासून रखडलेली पायाभूत सुविधा गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीचे आश्वासन देतो.

हे धोरण प्रभावीपणे अंमलात आणले गेले, तर सागरी विकास राज्यातील प्रादेशिक विकासाचे संतुलन पुन्हा साधू शकतो. शहरी केंद्रांवरील दबाव कमी करून किनाऱ्यालगत नवीन विकास कॉरिडॉर उघडू शकतो. सागरी विस्तार क्वचितच व्यत्ययाशिवाय पुढे जातो. किनारी क्षेत्रे पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील आहेत आणि बंदर प्रकल्प बहुतेकदा मासेमार समुदायांच्या उपजीविकेशी जोडलेले असतात. संपूर्ण भारतात अशा प्रकल्पांना भूसंपादन, पर्यावरणीय परिणाम आणि भरपाई चौकटींबाबत विरोधाचा सामना करावा लागला आहे. महाराष्ट्र सरकारने या घटकांची सुरक्षा आणि सल्लामसलत करण्यास वचनबद्ध असल्याचे स्पष्ट केले आहे, परंतु पूर्वानुभवानुसार या प्रक्रियांमध्ये सातत्य असायला हवे, असे वाटते. पर्यावरणीय मंजुरी आणि भागधारकांचा सहभाग हे केवळ नियामक अडथळे नाहीत, ते प्रकल्पाची व्यवहार्यता निश्चित करणारे घटक आहेत. खटले किंवा विरोधामुळे होणारा विलंब आर्थिक परतावा आणि सार्वजनिक विश्वास दोन्ही लक्षणीयरीत्या कमी करू शकतो. प्रशासनाच्या दृष्टिकोनातून येथेच महाराष्ट्राच्या सागरी धोरणाला सर्वांत कठीण परीक्षेचा सामना करावा लागतो. बंदर धोरण एका जटिल संस्थात्मक वळणावर आहे. राज्य विभाग, केंद्रीय संस्था, पर्यावरण नियामक आणि स्थानिक सरकारे प्रकल्प विकासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर अधिकार वापरतात. यासाठी प्रशासकीय शिस्तीची गरज आहे. राजकीय नेते निर्णय घेण्यास गती देऊ शकतात, परंतु दीर्घकालीन यश अंमलबजावणी क्षमतेवर अवलंबून असते.

शिपिंगकडे अनेकदा कमी लक्ष दिले जाते. किनारी शिपिंग आणि अंतर्देशीय जलमार्ग रस्ते वाहतुकीपेक्षा किफायतशीर आणि कमी उत्सर्जन पर्याय देतात, तरीही त्यांचा वापर मर्यादित राहतो. कार्यपद्धतीतील सुधारणांशिवाय वाढीव बंदरक्षमतेचे फायदे अपूर्ण राहतील. २०२६ ते २०३५ दरम्यान महाराष्ट्राची सागरी रणनीती राज्याच्या आर्थिक भूगोलात बदल घडवून आणू शकते. कार्यक्षम बंदरे आणि एकात्मिक शिपिंग नेटवर्कमध्ये शहरांची गर्दी कमी करण्याची, लॉजिस्टिक्स खर्च कमी करण्याची आणि नवी किनारी विकास केंद्रे तयार करण्याची क्षमता आहे. तथापि, हा पूर्वनिर्धारित निष्कर्ष नाही. महाराष्ट्राची नील अर्थव्यवस्था धोरण शाश्वत विकास प्रदान करते, की वादग्रस्त पायाभूत सुविधांसाठी एक महत्त्वाचा मुद्दा बनते, हे संतुलन किती प्रभावीपणे राखले जाते यावर अवलंबून असेल. बंदरांचे आधुनिकीकरण, किनारी आर्थिक क्षेत्रे तयार करणे आणि बंदर नेतृत्वविकासाच्या मजबूत चौकटीद्वारे लॉजिस्टिक्स खर्च कमी करणे, हा एक प्रमुख देशव्यापी उपक्रम आहे. हा कार्यक्रम अलिकडच्या वर्षांमध्ये हाती घेतलेल्या सर्वांत मोठ्या पायाभूत सुविधा परिवर्तनांपैकी एक आहे. सागरी क्षेत्र केवळ वस्तूंच्या वाहतुकीसाठी आवश्यक नाही, तर रोजगार निर्मिती, औद्योगिक विकास आणि राष्ट्रीय सुरक्षेतही महत्त्वाची भूमिका बजावते. 'सागरमाला'च्या माध्यमातून भारत भौतिक पायाभूत सुविधा वाढवत असून आर्थिक विकासासाठी उत्प्रेरक म्हणून बंदरांना स्थान देणाऱ्या सहायक धोरणात्मक सुधारणा विकसित करत आहे.

सागरमाला कार्यक्रम पाच धोरणात्मक स्तंभांवर बांधला गेला आहे. बंदर आधुनिकीकरण, बंदर कनेक्टिव्हिटी, बंदर-नेतृत्वाखालील औद्योगीकीकरण, किनारी समुदाय विकास आणि किनारी नौवहन आणि अंतर्गत जलवाहतूक. हा बहुआयामी दृष्टिकोन सुनिश्चित करतो, की पायाभूत सुविधांचा विस्तार आर्थिक नियोजन आणि सामाजिक विकासाशी संक्रमित केला जातो. वाहतूक नेटवर्कला औद्योगिक कॉरिडॉर आणि समुदाय उपक्रमांशी जोडून सागरमाला किनारी विकासाचे समग्र मॉडेल स्वीकारते. सध्या कार्यक्रमांतर्गत २७७ प्रकल्प पूर्ण झाले आहेत आणि इतर अनेक अंमलबजावणीच्या प्रगत टप्प्यात आहेत. प्रमुख बंदरांवर नवीन बर्थ सुरू करणे, किनारी नौवहनात वाढ आणि अंतर्गत जलमार्ग मालवाहतुकीत वाढ यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त क्रूझ पर्यटन आणि मत्स्यपालन पायाभूत सुविधांवर लक्ष केंद्रित केलेले प्रकल्प समावेशक वाढीच्या दृष्टिकोनात योगदान देत आहेत. भारताची बंदरे दर वर्षी अंदाजे १.३ अब्ज टन मालवाहतूक करतात आणि देशाच्या व्यापारापैकी सुमारे ९० टक्के व्यापार समुद्रमार्गे होतो. तथापि, मालवाहतूक अपुरी राहिली आहे, अनेक बंदरे गर्दीने भरलेली आहेत आणि काहींचा वापर कमी झाला आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

### भारतीय संघ विजेतेपदाचा दावेदार

टी-२० विश्वचषक स्पर्धेत रविवारच्या सामन्यात भारताने पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा ६१ धावांनी धुव्वा उडवत सुपर ८ मध्ये दिमाखात प्रवेश केला. भारताने पाकिस्तानला चारी मुंड्या चीत केले. फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही क्षेत्रात पाकिस्तानवर वर्चस्व गाजवत सामना जिंकला. हा विजय मिळवून भारताने पाकिस्तानवरील वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले. विश्वचषकात पाकिस्तान भारताला फक्त एकदाच हरवू शकला. भारताने मात्र पाकिस्तानला तब्बल आठ वेळा हरवले आहे. या सामन्यात भारताचा सलामीवीर ईशान किशनने वादळी सुरुवात करून भारताला पावणेदोनशेचा टप्पा गाठून दिला. त्याने आक्रमक अर्धशतक झळकावले त्याला सूर्यकुमार यादव, शिवम दुबे, तिलक वर्मा, रिंकू सिंग यांनी चांगली साथ दिली. भारतीय गोलंदाजांनी तर कमाल केली. भारतीय गोलंदाजांसमोर पाकिस्तानच्या फलंदाजानी अक्षरशः नांगी टाकली. त्यांचा कोणताच फलंदाज भारतीय गोलंदाजीपुढे टिकू शकला नाही. जसप्रीत बुमरा, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव या भारताच्या सर्व प्रमुख गोलंदाजांनी अचूक गोलंदाजी करून पाकिस्तानी फलंदाजांना जेरीस आणले. पाकिस्तानचे फलंदाज कसेबसे शतक पार करून शकले. पाकिस्तानला नमवण्यापूर्वी भारताने अमेरिका व नामिबियालाही असेच एकतर्फी नमविले होते. आता भारत सुपर ८ मध्ये पोहोचला आहे. विश्वचषकाची खरी लढाई आता सुरू झाली आहे, असे म्हणावे लागेल. जगातील सर्वोत्तम आठ संघ सुपर आठमध्ये असतील. तिथे लढाई सोपी नसेल; सर्वच संघ जिंकण्यासाठी खेळतील. टी-२० क्रिकेटमध्ये कोण जिंकेल हे कोणीच छातीठोकपणे सांगू शकत नाही. एखादे चांगले षटक किंवा एखादी छोटी पण महत्त्वपूर्ण खेळी सामन्याचे चित्र पालटवते; पण सध्याचा फॉर्म पाहता भारत विजेतेपदाचा प्रबळ दावेदार वाटतो. भारतीय खेळाडूंनी आपल्या क्षमतेनुसार खेळ केला तर तीन वेळा टी-२० चा विश्वचषक जिंकणारा तसेच सलग दुसऱ्यांदा विश्वचषक जिंकणारा भारत पहिला संघ ठरू शकतो.

**श्याम ठाणेकर**/९९२२५४६२९५

## वाचक पत्रे

### सत्तातुराणां न भयं, न लज्जा

'टिपूला शिवरायांच्या समकक्ष मानायला हवे : हर्षवर्धन सपकाळ' ही बातमी वाचली (तरुण भारत, १५ फेब्रुवारी) आणि आजिबात आश्चर्य वाटले नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आजतागायत काँग्रेसच्या नेत्यांनी अनेक नायकांना/राष्ट्रप्रेमी संघटनांना खलनायक ठरवून त्यांची यथेच्छ बदनामी केली आहे; अजूनही ते ती करत आहेत. त्याचबरोबरीने जवळपास सर्वच खलनायकांना नायक ठरवून त्यांचे उदात्तीकरणही केले आहे. काँग्रेसचे नेते मोठे अभ्यासू इतिहास संशोधक असते तर त्यांच्या वक्तव्याला कदाचित गांभीर्याने घेतले गेले असते आणि त्यावर चर्चाही झाल्या असत्या. तसे काहीही नसताना केवळ अल्पसंख्यक समाजाचे लांगूलचालन करून, त्यांची मतं सत्ता मिळविण्यासाठी केली जात आहेत, हे अधिक संतापजनक आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांची महती संपूर्ण जगाने मानली असताना त्यांची तुलना एका जुलमी सुलतानाशी करावी आणि तेही एका राष्ट्रीय पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असलेल्या एका मराठी इसमाने, यासारखे दुर्दैव ते काय? सत्ताप्राप्तीसाठी काँग्रेस पक्ष कोणत्याही खालच्या पातळीवर जाऊ शकतो हे इतिहासात अनेकदा सिद्ध झाले आहे. समाजामध्ये धर्म, जातपात, पंथ, भाषा आणि प्रांत अशा अनेक मुद्द्यांवर फूट पाडून सत्ता मिळवण्याची काँग्रेस पक्षाची 'मोडस ऑपरेंडी' आहे. सत्तेपुढे देशहित, राष्ट्रीय एकात्मता आणि अखंडता, सामाजिक आणि धार्मिक एकता, देशाची सुरक्षितता अशांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांना काँग्रेसच्या लेखी काहीही किंमत नाही. म्हणूनच हर्षवर्धन सपकाळांच्या या आततायी आणि बेलगाम वक्तव्याचा कडाडून निषेध केला पाहिजे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### जाणता राजा

ज्या काळात माणसामाणसात भेद केला जायचा, त्या वेळी सर्व जाती-धर्मातील प्रजा ही आपली लेकरं आहेत. अशी आपुलकीची वागणूक देणारे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरीवर झाला. बालपणी केलेले योग्य संस्कारच माणसाला घडवत असते. शिवाजी महाराज घडविण्याचा सर्वांत मोठं हात जिजामातेचं आहे.

राजा हा प्रजेचा पालनकर्ता असतो, उपभोगी नसतो. प्रजेने उभे केलेल्या साम्राज्याचा तो केवळ विश्वास म्हणून धनी असतो, हे तत्त्व त्यांनी प्रत्यक्ष आचरणात आणले. स्वतःचे राज्य ही कल्पना त्यांना कधीच पटली नाही. राज्य हे प्रजेचे गोरगरिबांचे, साधुसंन्यासाचे आहे, या समजुतीनेच त्यांनी कारभार चालवला. महाराज कधीच जातिभेद करीत नव्हते, सर्वांना नियम सारखे होते. परस्त्रियांना आपली माता, बहीण मानत असत. १६७४ साली रायगड येथे त्यांचा भव्य राज्याभिषेक झाला आणि ते छत्रपती म्हणून गौरवले गेले. त्यांनी स्वराज्याचे स्वप्न सत्यात उतरवले आणि मराठी माणसाच्या मनात स्वाभिमान जागवला. जाणता राजा म्हणून ते लोकांच्या हृदयात अमर आहेत.

**प्रीती खोब्रागडे**/मालवण

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# २०३६ च्या ऑलिम्पिकमध्ये कबड्डीच्या समावेशासाठी क्रीडा भारतीचा निर्धार : महानकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

''२०३६ च्या ऑलिम्पिक यजमानपदासाठी भारत सज्ज असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी जाहीर केले आहे. या पार्श्वभूमीवर, ऑलिम्पिकमध्ये कबड्डी या अस्सल भारतीय खेळाचा समावेश व्हावा, यासाठी क्रीडा भारती विशेष प्रयत्न करत आहे. देशातील प्रत्येक जिल्ह्यात किमान १०० कबड्डी संघ तयार करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे,'' असे प्रतिपादन क्रीडा भारतीचे अखिल भारतीय संघटन मंत्री प्रसाद महानकर यांनी केले.



सोलापूर येथे आयोजित क्रीडा भारतीच्या प्रशिक्षक मार्गदर्शन शिबिरात ते बोलत होते. क्रीडा भारतीच्या प्रचार आणि प्रसारासाठी महानकर सध्या देशव्यापी दौरा करत आहेत.

**खेळ संवाद उपक्रमाचा संकल्प**

यावेळी बोलताना महानकर पुढे म्हणाले की, केवळ मैदानी खेळच नव्हे, तर खेळाडूंच्या मानसिक आणि वैचारिक विकासासाठी यावर्षी भारतातील १०० मोठ्या गावांमध्ये खेळ संवाद या उपक्रमाद्वारे चर्चासत्रांचे आयोजन करण्याचा संकल्प क्रीडा भारतीने केला आहे.



या बैठकीला क्रीडा भारतीचे शहराध्यक्ष सुधीर देव, शहर सहमंत्री प्रतीक तडवळकर, प्रमोद चुंगे, अनिल गिराम, भक्तराज जाधव, युवराज शिंदे, केशव गुंटूक, विवेक मिस्किन यांसह अनेक प्रशिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात क्रीडा भारतीचे उपाध्यक्ष अरुण उपाध्ये यांच्या प्रास्ताविकाने झाली. जिल्हा मंत्री राजेश कळमणकर यांनी क्रीडा भारतीच्या कार्याचा वार्षिक अहवाल सादर केला. पश्चिम महाराष्ट्र प्रांतमंत्री ज्ञानेश्वर मॅकल यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## शिवजयंतीनिमित्त आज मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

शिवजयंतीनिमित्त श्री हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठान व स्वर्गीय प्रमोद महाजन युथ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने यंदा डॉल्बीमुक्त शिवजयंती साजरी करण्याचे १२ वे वर्ष पूर्ण होत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे बुधवार १८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत बापूजी नगर येथील श्री मारुती देवस्थान येथे आयोजित करण्यात आले आहे. या आरोग्य शिबिरामध्ये रक्तदाब तपासणी, मधुमेह/साखर तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी, पूर्ण रक्त तपासणी व थायरॉईड तपासणी यांचा समावेश आहे. तसेच इतर तपासण्यांमध्ये दात तपासणी, त्वचारोग तपासणी, स्त्रीरोग तपासणी आणि जनरल मेडिसिन तपासणी अशा विविध आरोग्य सेवा नागरिकांना उपलब्ध करून दिल्या जाणार असून तपासणीनंतर गरजूंना मोफत औषधांचेही वाटप करण्यात येणार आहे. परिसरातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमोद महाजन युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष जयंत होलेपाटील व श्री हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्रीधर आरगोंडा यांनी केले आहे.

रे.मु.नं. ७६०/२०२३

## बार्शी येथील मे.सि.ज.ज्यु.डि. साहेब यांचे कोर्टात

**भारत अशोक शिंदे वगैरे** -- **वादी**
**विरुध्द**
**अशोक अंबऋषी शिंदे वगैरे** -- **प्रतिवादी**
**यात वादी तर्फे विनंती की,**

सदरचा दावा वादींनी दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवून त्याचा प्रथक कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

यातील प्रतिवादी नं. १ अशोक अंबऋषी शिंदे हे व्यवसायाने आचारी असून हल्ली नि.नं. १ वर दिलेल्या पत्यावर राहत नाही. सध्या प्रतिवादी नं. १ पंढरपुरच्या मठात राहत असल्याची माहिती वादींना मिळाली परंतु प्रतिवादी नं. १ सतत त्यांचे राहण्याचे ठिकाण बदलत असल्याचे त्यांना समन्सची बजावणी झालेली नाही.

प्रतिवादी नं. १ चा वादींशी व दावा मिळकतीशी संबंध असल्याने त्यांचे म्हणणे रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे.

सबब हे प्रसिध्दीकरण झाल्यापासून ३० दिवसाचे आत प्रतिवादी नं. १ यांनी स्वतः मे. कोर्टात हजर राहून म्हणणे दाखल न झाल्यास प्रतिवादी नं. १ यांनी काहीही म्हणणे द्यायचे नाही. असे गृहित धरून पुढील कारवाई करण्यात येईल. हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले. ता.१६/०२/२०२६

शिक्का

**सही/-**
**हुकूमावरून**
**सहाय्यक अधिक्षक**
**सह दिवाणी न्यायालय, क. स्तर, बार्शी**



## दहावी, बारावी ग्रेस गुण प्रस्ताव दाखल करण्यासाठी ३० एप्रिलपर्यंत मुदत मिळावी

### दुहेरी शुल्क माफ करावे : शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी -**

इयत्ता १०वी व १२च्या परिक्षेत प्रविष्ट शालेय खेळाडुना बोर्डा कडुन ग्रेस गुणाचे प्रस्ताव दाखल करण्यासाठी किमान ३० एप्रिल २०२६ पर्यंत मुदत मिळावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाने महाराष्ट्र राज्य माध्य व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे प्रभारी अध्यक्ष नंदकुमार बेडगे तसेच सचिव दिपक माळी यांना केली आहे.

यावेळी महासंघाचे राज्याध्यक्ष शरदचंद्र धारुरकर, सचिव डॉ. चांगदेव पिंगळे, विभागीय सचिव कमलाकर डोके आणि पिंपरी चिंचवड महानगर संघटनेचे सचिव राजेंद्र पितळीया उपस्थित होते .

या वर्षी बोर्डाचा सर्व परिक्षा कालावधी संपत आला तरी या संदर्भात बोर्डाकडुन ग्रेसगुण संदर्भात परिपत्रक शाळाना पाठविले नाही. बोर्डाकडून सदर ग्रेस गुणा संदर्भाचे परिपत्रक राज्यातील सर्व शाळांना लवकरात लवकर प्राप्त व्हावे. तसेच खेळाडुना मिळणाऱ्या ग्रेस गुणाचे फॉर्म स्विकारताना आपले सरकारद्वारा आकारली जाणारी ऑनलाईन प्रक्रियेची फी आणि बोर्डाची फॉर्म छानणी फी अशी सदर प्रक्रियेच्या नावाखाली एका खेळाडुस दोन ठिकाणी फी आकारली जाते. बोर्डाकडून आकारली जाणारे शुल्क रुपये २५ हेही माफ करण्यात यावी, असेही त्यांच्या निवेदनात नमूद आहे.

## सूर्यनमस्कार स्पर्धेत मेहता प्रशालेचा चौकार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्हा योग परिषद व योगसाधना मंडळ यांच्यावतीने आयोजित केलेल्या आंतर शालेय सांघिक सूर्यनमस्कार स्पर्धेत कै वि मो मेहता माध्यमिक प्रशालेतील विद्यार्थ्यांनी चार गटात प्रथम क्रमांक पटकाविला.

न.म.वि प्रशाला डफरीन चौक येथे झालेल्या या स्पर्धेत प्रशालेतील पाचवी ते सातवी गट मुले मुली, आठवी ते दहावी गट मुले मुली अशा चार गटांनी सांघिक सूर्यनमस्काराचे सादरीकरण केले.

नृत्य, सूर्यनमस्कार मंत्राचे पठण, विविध रचना याला देशभक्तीपर गीतांची जोड देऊन उत्तम सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले व याची फलश्रुती म्हणजे चारही गटांमध्ये ही कामगिरी केली. या विद्यार्थ्यांना क्रीडा प्रमुख अमित कोर्टीकर व योगशिक्षिका प्रतिमा स्वामी यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन, मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी, पर्यवेक्षिका मीनाक्षी भाटवडेकर यांनी अभिनंदन केले.

### स्पर्धेतील यशस्वी योगपटू असे

**इयत्ता पाचवी ते सातवी- मुली :** सानवी तंबाके, सिद्धी टेळे, ऋचा मोकाशी, गुंजन कस्तुरकर, तनवी बिरंगणे, राजनंदिनी मोकाशी, संजीवनी गायकवाड, श्रावणी शिंदे, हिंदवी गायकवाड, सेजल ढोनसळे, स्पृहा जाधवर, दिव्या चंदेले. **मुले :** शिवराज पाटील, असद शेख, चेतन पांचाळ, कार्तिक बिराजदार, यशवर्धन शिंदे, राजवर्धन बिराजदार, ऋतुराज शिंदे, अद्वैत आराध्ये, श्रेयस चव्हाण, शंभू व्यवहारे, भार्गवेश दिवाणजी, देवेंद्र राजमाने.

**आठवी ते दहावी- मुली :** अनुष्का झाकणे, संहिता गद्रे, गौरी पोळ, साक्षी लांडगे, अनुष्का पाटील, दूर्वा जाधव, विद्या गुरव, साक्षी मसळे, सई माळगे, करुणा हिप्परगी, अंजली मनूरे, आकांक्षा वाघमोडे. **मुले :** कपिल बिराजदार, नैतिक पाटील, समर्थ कोरे, श्रीराज जळगोडर, सोहम कवडे, अभिषेक बिचितकर, चिदंबरम कोणाळे, आदित्य पवार, वेदांत व्यवहारे, राजवीर बिराजदार, अभय शिंदे, प्रणव व्यवहारे.

## श्रीनिवास पाथरुट सिध्देश्वर केसरीचा मानकरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**



जय हनुमान तालीम संघ, सारोळे (ता. मोहोळ) यांच्यावतीने महाशिवरात्रीनिमित्त आयोजित भव्य जंगी कुस्ती स्पर्धेतील श्री सिद्धेश्वर केसरी २०२६ किताब विजेते पै. श्रीनिवास पाथरूट ठरला. यावेळी पाथरूटसह आंतरराष्ट्रीय जलतरणपटू श्रावणी सूर्यवंशी यांचा गौरव करण्यात आला.

ट्रिपल महाराष्ट्र चॅम्पियन पै. श्रीनिवास आणि पै. अरमान पटेल यांच्यातील अत्यंत अटीतटीच्या आणि रोमहर्षक झालेल्या या लढतीत पै. श्रीनिवासने उत्कृष्ट कौशल्याचे प्रदर्शन करत विजय मिळवला. या विशेष कुस्ती मैदानाचे उद्घाटन आमदार राजू खरे व महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा परिषद सदस्य चरणराज चवरे, नगरसेवक बिज्जू प्रधाने, व्यकटेश कोंडी, युवराज सरवदे यांच्यासह अक्षय अजिखाने, विश्वास शिंदे, अर्जुन जाधव, यशवंत पाथरूट आदी उपस्थित होते. आरंभ फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष यशवंत पाथरूट यांच्यावतीने व विठ्ठल पाथरूट यांच्या स्मरणार्थ श्रीनिवास पाथरूट यांना चांदीची गदा सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-Tender (1st call) Notice**

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.: 7000038911 E-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender: 15/2025-2026, Particulars:** Work of supply & installation of EPDM based modular advance multi cable transit system for cable entry points for control and power cables at various EHV Substations under EHV O&M Circle Solapur, **Estimated cost:** Rs. 1,39,10,599/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost):** Rs 1,39,106/- **Tender Fee cost** in Rs. 5000.00+ GST, **Sale period:** 17.02.2026 to 03.03.2026 **Last Date of Submission:** 03.03.2026 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 05.03.2026 at 12:00 Hrs. (If possible). **Contact person:** Executive Engineer 7447440852 / Dy. Executive Engineer 7447440605. For further details please visit to **https://srmetender.mahatransco.in**. Subsequent call intimations (2nd/3rd calls, if any) will not be re-published in newspapers and will only be available on the e-tender portal: please visit. 1) **https://srmetender.mahatransco.in**. 2) **https://mahatransco.in Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Superintending Engineer,**
**EHV O&M Circle Solapur**

## तुळजापूर नाका परिसरात अतिक्रमण हटाव मोहीम

### टपऱ्या , चार चाकी हात गाड्या केल्या जागेवरच निष्काशीत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**



महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने आज तुळजापूर नाका, मड्डी वस्ती परिसरात अतिक्रमण विरोधात कारवाई करण्यात आली. रस्त्याला अडथळा ठरणारे अतिक्रमण हटविण्यात आले. या मोहिमेत चार टपऱ्या, चार चाकी चार हात गाड्या, पत्रा शेड जेसीबीच्या साह्याने जागेवरच निष्काशीत करण्यात आले.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार उपअभियंता तपन डंके यांच्या नियंत्रणाखाली अतिक्रमण विरोधी मोहीम राबविण्यात येत आहे. महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने आज तुळजापूर नाका परिसरात ही कारवाई करण्यात आली. पोलीस प्रशासन त्याचबरोबर काही नागरिकांकडून आलेल्या तक्रारीनुसार ही कारवाई करण्यात आली. यामुळे येथील रस्त्यावरील अडथळा दूर झाला.

दरम्यान या कारवाईत अतिक्रमित चार चाकी चार हात गाड्या , चार टपऱ्या जागेवरच निष्काशीत करण्यात आले आहे. तसेच रस्त्यावर अडथळा ठरणारे कट्टे आणि समोर आलेले सुमारे १५ पत्रा शेड जमीनदोस्त करण्यात आले, अशी माहिती अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी दिली.

विक्रेत्यांनी कोणत्याही परिस्थितीत रस्त्यावर आपला व्यवसाय करू नये. रस्त्याला अडथळा आल्याचे दिसून आल्यास तातडीने कारवाई करण्यात येणार आहे. रस्त्याला अडथळा निर्माण होईल आणि सार्वजनिक ठिकाणी अतिक्रमण केल्यास जप्ती आणि इतर कारवाई करण्यात येईल, असा इशारा महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी दिला आहे.

**IDFC FIRST Bank Limited**
(erstwhile Capital First Limited and amalgamated with IDFC Bank Limited)
CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031. TEL: +91 44 4564 4000 | FAX: +91 44 4564 4022.

IDFC FIRST Bank

**परिशिष्ट खत नियम ८(१) ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी)**

तर, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (**पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड आणि आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीनीकरण)चे** अधिकृत अधिकारी म्हणून, सिक्युरिटीजेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३(१२) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून, २८.०२.२०२४ रोजी कर्जदार, सह-कर्जदार आणि जामीनदार १. अब्दुल उसन मुलानी, २. हसिना अब्दुल मुलानी यांना २७.०२.२०२४ रोजी नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम ५,०८,०३६.००/- (रुपये पाच लाख आठ हजार छत्तीस फक्त) परत करण्याचे आवाहन करणारी मागणी सूचना जारी केली आहे.

कर्जदारांनी रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी ठरल्यामुळे, कर्जदाराला आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, खाली स्वाक्षरी करणाऱ्याने १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ सह वाचलेल्या कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (४) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा भौतिक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार केल्यास **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड आणि आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन)** कडून ५,०८,०३६.००/- (रुपये पाच लाख आठ हजार छत्तीस फक्त) आणि त्यावरील व्याज आकारले जाईल. कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (८) च्या तरतुदींकडे आकर्षित केले जाते, उपलब्ध वेळेनुसार, सुरक्षित मालमत्ता परत मिळविण्यासाठी.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ३५२/अ, क्षेत्रफळ १४०० चौ.फूट, ग्रामपंचायत मुंढेवाडी, विभाग सोलापूर, उपविभाग पंढरपूर, महाराष्ट्र-४१३३०४ च्या हद्दीत स्थित, आणि सीमा :- पूर्व - विठ्ठल कदम क्षेत्र, पश्चिम - सलीम सय्यद क्षेत्र, उत्तर - संजय शिंदे क्षे, दक्षिण - रस्ता.

दिनांक : 12/02/2026
स्थळ : महाराष्ट्र
कर्ज खाते क्र. : 98356062

**सही/-**
**अधिकृत अधिकारी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड आणि आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन)**

## जाहीर समन्स

**मे. उपनिबंधक सहकारी संस्था, शहर सोलापूर, सोलापूर यांचे समोर**
**(सोलापूर जिल्हा महसूल कर्मचारी सहकारी पतसंस्था, नियमित, सोलापूर सिटी सर्व्हे नं. ८४१३, दुसरा मजला, जुने जिल्हाधिकारी आवार, सोलापूर ४१३००३)**

जा.क्र. ३७८९/२०२६
**आर्यनंदी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर** - **अर्जदार**
**विरुद्ध**
खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद - **जाब देणार**

| अ. क्र. | दावा क | दावा रक्कम | प्रतिवादी नंबर | प्रतिवादीचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ६८४/ २०२५ | १,२०,५५३/- | २ | **श्री. वाघमोडे निखील आदिनाथ** रा. ३१६, द्वारका नगर, ओमगर्जना चौक, गणपती मंदिर, जुळे सोलापूर, जि. सोलापूर |
| २ | ६७७ २०२५ | २०,५४,४४७/- | १<br>३ | **श्री. आग्रे बसवराज वैजनाथअप्पा सहकर्जदार : चाकोते विश्वनाथ बाबुराव** अे३ नवसमता हौसिंग सोसायटी चाकोते नगर, सोलापूर, १९७ जोडभावी पेठ, सोलापूर<br>**श्री. हिरोळे संतोष नवलिंग** रा. रा. पाटील गल्ली, मु.पो. धोत्री, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर |
| ३ | ६७६/ २०२५ | १७,३४,३५९/- | २ | **श्री. निकम कृष्णात शिवाजी** रा. २९३.१ प्लॉट नं. ११.२ साठे गोडावूनजवळ बाळे, सोलापूर, जि. सोलापूर |
| ४ | ६६७/ २०२५ | १६,३२,७७४.४०/- | १ | **श्री. उबाळे गिरीष आनंदराव** रा. प्लॉट नं. सी १४अ, ग्राऊंड फ्लोअर, भैरवनाथ सोसायटी, होटगी रोड, सोलापूर, जि. सोलापूर |
| ५ | ६७१/ २०२५ | १,६०,६३४/- | १<br>२ | **श्री. अरवत धरेप्पा संगण्णा** रा. जुना संतोषी नगर, विजापूर रोड, शांती इंग्लिश मिडिअम शाळेजवळ, सोलापूर, जि. सोलापूर<br>**श्री. बिराजदार धनराज सिध्दराम** रा. ०५ नरेंद्र नगर, विजापूर रोड, सोलापूर, गणपती मंदिरजवळ, जि. सोलापूर |
| ६ | ६८२/ २०२५ | १६,२२,४६१/- | ३ | **श्री. निंबाळकर आनंद सिद्राम** रा. ८७ बी, मड्डी वस्ती, हनुमान मंदिर शेजारी, भवानी पेठ, सोलापूर |
| ७ | ६८१/ २०२५ | १,३०,४४९/- | २ | **श्री. जाधव रामराव जयराम** रा. मु.पो. बसव नगर, तेरामैल, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर |
| ८ | ६८५/ २०२५ | ८,६७,४९६,३४/- | २<br>३ | **सौ. शिंदे यशोदा श्रीधर** रा. १०२, जोडभावी पेठ, सोलापूर, जि. सोलापूर<br>**श्री. भालेराव दत्तात्रय पांडुरंग** रा. ४१.४२९, न्यु बुधवार पेठ, रमापती चौक, सोलापूर, जि. सोलापूर |
| ९ | ६७०/ २०२५ | ३५,९९२८०/- | २<br>३ | **श्री. पारखे पांडुरंग पुंडलिक** रा. ९९, गोल्डफिंच पेठ, रुम नं. ४, दुसरा मजला, सोलापूर, जि. सोलापूर<br>**श्री. केकडे दिपक प्रकाश** रा. ११६८, गरिबी हटाव झोपडपट्टी नं.२, मारुती मंदिराजवळ, इंदिरा जवळ सोलापूर |
| १० | ६७८/ २०२५ | २८,५४,२२४/- | १ | **श्री. वाघमारे अश्रुबा सर्जेराव व वाघमारे सर्जेराव दगड** रा. १४०, पोपल वस्ती, जुना तुळजापूर नाका, जि.प. शाळेजवळ सोलापूर, जि. सोलापूर |
| ११ | ६७३/ २०२५ | १७,१०,९७०/- | १<br>३ | **श्री. पाटील हणमंत रामचंद्र सहकर्जदार : पाटील सुगंधा हणमंत** रा. सापळे, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर<br>**श्री. धोत्रे विजय सिद्राम** रा. प्लॉट नं. ५५ गर नं. १०१ माशाळ नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| १२ | ६७४/ २०२५ | ८,२७,६७१.९०/- | १<br>३ | **श्री. शेंडगे समाधान श्रीधर सहकर्जदार : जवंजाळ सुरज शामराव** रा. मु.पो. सावळेश्वर, ता. मोहोळ, जि. सोलापूर<br>**श्री. भागवत नितीन अमोगसिध्द** रा. १४२.९ मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर |
| १३ | ६७२/ २०२५ | १७,७७,८११/- | २<br>३ | **सौ. डांगे निता मनोज** रा. ०७, तिसरा मजला, खमितकर अपार्टमेंट, मुरारजी पेठ, सोलापूर, जि. सोलापूर<br>**श्री. भालेराव दत्तात्रय दशरथ** रा. १२०.३५०, यश नगर फेज २, मुरारजी पेठ, सोलापूर |
| १४ | ६६९/ २०२५ | १,०२,४७४/- | १<br>२<br>३ | **श्री. शेख जमीर हुसेनबाशा** रा. २५५, रविवार पेठ, गुजर वस्ती, सोलापूर, जि. सोलापूर<br>**श्री. कंपली सरफराज अ.सत्तार** रा. २०.१७ तेलंगी पाच्छा पेठ, दाजी पेठ, सोलापूर, जि. सोलापूर<br>**श्री. मिरजकर प्रसाद श्रीधर** रा. ५६.६.१० भवानी पेठ, शाहिर वस्ती, सोलापूर, जि. सोलापूर |
| १५ | ६८३/ २०२५ | २०,५४,४४७/- | १ | **श्री. हिरोळे संतोष नवलिंग सहकर्जदार : चाकोते विश्वनाथ बाबुराव** रा. पाटील गल्ली मु.पो. धोत्री, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर |
| १६ | ६८०/ २०२५ | १५,८०,४९६/- | १ | **श्री. चव्हाण लक्ष्मी परमेश्वर** रा. जोशी गल्ली, हनुमान तालिमजवळ, केंगाव, जि. सोलापूर |

यात वादी पतसंस्था यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या प्रतिवादी यांचे पत्ते उपलब्ध होत नसल्यामुळे/पत्तावर आढळून येत नसल्याने/अपुरा पत्ता असल्याने सदरचे जाहीर समन्स देणेत येत आहे.

**प्रतिवादी यांना जाहीर समन्सद्वारे कळविणे येते की, उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडणेसाठी स्वतः जातीने अथवा वकिलामार्फत दिनांकः- ०५/०३/२०२६ रोजी दुपारी १२.०० वा. कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.** प्रतिवादी यांनी तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास त्यांच्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व पुढील योग्य तो निर्णय केला जाईल.

आज दि. १७/०२/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्य दिले आहे.

**स्थळ - सोलापूर**
**दि - १७/०२/२०२६**

**सही/-**
**(डॉ. प्र.अ. बागल)**
**निंबधक सहकारी संस्था,**
**सोलापूर शहर, सोलापूर**

# टी-२० विश्वचषकाचा थरार





## महत्त्वाचे

### इम्रान खानसाठी सरसावले गावस्कर, कपिल देव

**नवी दिल्ली** : भारतीय क्रिकेट दिग्गज सुनील गावस्कर आणि कपिल देव यांच्यासह चौदा माजी कर्णधारांनी तुरुंगात असलेल्या क्रिकेटपटूपासून राजकारणी बनलेल्या इम्रान खान यांच्या बिघडत्या प्रकृतीबद्दल चिंता व्यक्त केली आहे आणि पाकिस्तान सरकारला आंतरराष्ट्रीय मानकांनुसार योग्य वैद्यकीय सेवा देण्याची विनंती केली आहे. १९९२ च्या विश्वचषक विजेत्या संघाचे कर्णधार इम्रान खान रावळपिंडीच्या अदियाला तुरुंगात योग्य वैद्यकीय सेवेअभावी त्यांच्या उजव्या डोळ्यातील अंदाजे ८५ टक्के दृष्टी गमावल्याचे वृत्त आहे. सुमारे १४ माजी कर्णधारांनी पाकिस्तान सरकारला माजी आंतरराष्ट्रीय क्रिकेट कर्णधारांचे आवाहन या शीर्षकाचे पत्र लिहिले आहे, ज्यामध्ये इम्रानला योग्य वागणूक देण्याची मागणी केली आहे. पत्रात म्हटले आहे की, आमच्या राष्ट्रीय क्रिकेट संघांचे माजी कर्णधार, पाकिस्तानचे माजी कर्णधार आणि जागतिक क्रिकेटचे दिग्गज इम्रान खान यांच्यावर कथित उपचार आणि तुरुंगवासाच्या परिस्थितीबद्दल आमची चिंता व्यक्त करण्यासाठी आम्ही लिहीत आहोत.इम्रान खानच्या प्रकृतीबद्दलच्या अलिकडच्या बातम्या, विशेषतः कोठडीत असताना त्यांची दृष्टी चिंताजनक ढासळणे आणि गेल्या अडीच वर्षांत त्यांच्या तुरुंगवासाच्या परिस्थितीमुळे आम्हाला खूप चिंता वाटली आहे. ■

### प्रमोद भगतचे आशियाई खेळ आणि लॉस एंजेलिसवर लक्ष

**नवी दिल्ली** : डोपिंग उल्लंघनामुळे २०२४ च्या पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये सहभागी होऊ न शकलेला बॅडमिंटनपटू प्रमोद भगतने अलिकडच्या जागतिक विजेतेपदासह आपल्या कारकीर्दीतील पराभव पत्करला नाही आणि आता तो आशियाई खेळ आणि लॉस एंजेलिसमधील २०२८ च्या पॅरालिम्पिकवर लक्ष केंद्रित करत आहे. बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशन डोपिंग नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल १८ महिन्यांच्या बंदीनंतर परत येत, भगतने पॅरालिम्पिक वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये ३ प्रकारात आपले सहावे एकेरी सुवर्णपदक जिंकून आपली योग्यता सिद्ध केली. अशा प्रकारे भगतने त्याचे सलग चौथे एकेरी जागतिक विजेतेपद मिळवले, परंतु पदकाचे भावनिक महत्त्व आकडेवारीच्या पलीकडे गेले. भगतने सांगितले, माझ्यावर दीड वर्षांसाठी बंदी घालण्यात आली होती. यामुळे, मी पॅरालिम्पिकमध्ये भाग घेऊ शकलो नाही. त्यानंतर, मी परत आलो आणि पुन्हा विश्वविजेता झालो. म्हणून हे पदक माझ्यासाठी खूप अर्थपूर्ण आहे कारण माझ्या आयुष्याच्या या काळात मी अनेक कठीण परिस्थितींचा सामना केला. ३७ वर्षीय खेळाडूला पॅरालिम्पिकमध्ये पदक मिळवण्याचा निश्चित विजेता मानला जात होता, परंतु बंदीमुळे स्पर्धा करू न शकणे हा एका दशकाहून अधिक काळ त्याच्या श्रेणीवर वर्चस्व गाजवणाऱ्या खेळाडूसाठी एक भयंकर धक्का होता.

### कर्नाटकची उत्तराखंडविरुद्ध मजबूत पकड

**लखनौ** : कर्नाटकने पहिल्या डावात ७०० पेक्षा जास्त धावा काढल्यानंतर मंगळवारी रणजी चषक उपांत्य फेरीच्या तिसऱ्या दिवशी उत्तराखंडला १४९ धावांवर बाद केले. आठ वेळा विजेत्या कर्नाटकने दुसऱ्या दिवशी सहा गडी बाद ६८९ धावा केल्या होत्या पण तिसऱ्या दिवशी त्यांनी आपला डाव घोषित केला नाही. रविचंद्रन स्मरा आणि विद्याधर पाटील यांनी संघाला ७३६ धावांपर्यंत पोहोचवले. आता कर्नाटकने सामन्यावर आपली पकड पूर्णपणे मजबूत केली आहे. स्मरा आणि पाटील यांनी कालच्या धावसंख्येत २८ धावा जोडल्या. पाटीलने ११४ चेंडूत दोन चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ५४ धावा केल्या. स्मरा आणि पाटील बाद झाल्यानंतर कर्नाटकचा डावही संपुष्टात आला. केएल राहुलने यापूर्वी १४१ धावा केल्या होत्या. उत्तराखंडकडून उजव्या हाताचा वेगवान गोलंदाज आदित्य रावतने चार आणि फिरकी गोलंदाज मयंक मिश्राने तीन गडी बाद केले. उत्तराखंड अजूनही पहिल्या डावात ५८७ धावांनी पिछाडीवर आहे. कर्नाटककडून पाटीलने दोन गडी टिपले. कर्नाटकने ८१ धावांत चार गडी गमावले होते आणि त्यानंतर लक्ष्य रायचंदानी (नाबाद ५२) आणि जगदीश सुचित (२१) यांनी पाचव्या गड्यासाठी ४३ धावांची भागीदारी केली.सुचितला भारतीय जलदगती गोलंदाज प्रसिद्ध कृष्णाने बाद केले आणि उत्तराखंडला पाच बाद १२४ धावांवर बाद केले. लक्ष्य आणि सौरभ रावत (१०) अजूनही नाबाद आहेत.

### खेलो इंडिया दुसऱ्या टप्प्यात ४०० खेळाडूंचा सहभाग

**गुलमर्ग** : खेलो इंडिया हिवाळी खेळांचा दुसरा टप्पा २३ ते २६ फेब्रुवारी दरम्यान येथे होणार आहे. यामध्ये देशभरातील अंदाजे ४०० खेळाडू सहभागी होतील. अंबाला, हैदराबाद, इंदूर, पुणे आणि मध्य प्रदेश सारख्या ठिकाणांहून स्पर्धक समुद्रसपाटीपासून अंदाजे ८,७०० फूट उंचीवर चार पदक स्पर्धांमध्ये त्यांचे कौशल्य दाखवतील. स्की पर्वतारोहण, अल्पाइन स्कीइंग, नॉर्डिक स्कीइंग (क्रॉस-कंट्री) आणि स्नोबोर्डिंग या खेळांचा समावेश आहे. ■

# भारत विजयाची लय कायम राखणार

### सुपर ८ मध्ये प्रवेशाचा विश्वास

◆ **अहमदाबाद, १७ फेब्रुवारी**

भारताने आतापर्यंतचे तिन्ही सामने तुलनेने सहज जिंकले आहेत, परंतु त्यांना अद्याप खेळण्याची इच्छा असलेली शैली दाखवता आलेली नाही. या तीन सामन्यांपैकी फक्त एक सामना भारतासाठी महत्त्वाचा होता. पाकिस्तानविरुद्धच्या सामन्याचा भारताच्या प्रगतीवर किंवा त्यांच्या सुपर ८ मध्ये कोणताही परिणाम झाला नाही, परंतु त्यांना पराभव परवडणारा नव्हता.

आता, भारत पुन्हा मोठी धावसंख्या करण्याचा प्रयत्न करेल. तिन्ही सामन्यांमध्ये प्रथम फलंदाजी करूनही, भारताने अद्याप २०९ पेक्षा जास्त धावा केलेल्या नाहीत. रात्रीचा हा सामना त्यांच्यासाठी परिपूर्ण परिस्थिती असेल. अहमदाबादमधील गेल्या पाच रात्रीच्या डावांपैकी चार डावांनी २१० पेक्षा जास्त धावा केल्या आहेत.



सूर्यकुमार यादव



स्कॉट एडवर्ड

नेदरलँड्स देखील ते हलके नाहीत हे दाखवण्याचा प्रयत्न करतील. ते पाकिस्तानला हरवण्याच्या जवळ होते, परंतु एक झेल सोडणे महागडे ठरले. नामिबियाला हरवल्यानंतर, ते भारताला आव्हान देण्याचा देखील प्रयत्न करतील. जर त्यांनी नाणेफेक जिंकली तर भारत प्रथम फलंदाजी करू शकेल परंतु नेदरलँड्स अशक्य लक्ष्य टाळण्याचा प्रयत्न करेल का हे पाहणे मनोरंजक असेल.

भारताच्या अभिषेक शर्माची विश्वचषकात निराशाजनक सुरुवात झाली आहे. एक गोल्डन डक, पोटदुखी, चार चेंडूंमध्ये डक. तथापि, या गोष्टी अभिषेकच्या कौशल्याबद्दल किंवा स्वभावाबद्दल फारसे काही सांगत नाहीत. परंतु अभिषेक एक चांगली खेळी खेळण्याचा आणि सुपर ८ च्या आधी स्वतःवरील दबाव कमी करण्याचा प्रयत्न करेल.

नेदरलॅण्ड्स निश्चितच विश्वचषकाच्या पहिल्या दोन सामन्यांमध्ये अभिषेक ज्या पद्धतीने बाद झाला त्यातून शिकू इच्छितात. हे पाहता,

ते ऑफ-स्पिनर आर्यन दत्तसह गोलंदाजीची सुरुवात करू इच्छितात. सलमान आगाने ज्या पद्धतीने सलग तीन चेंडूंवर अभिषेकला बरोबरीत रोखले आणि चौथ्या चेंडूवर त्याला बाद केले त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास आणखी वाढेल. तथापि, हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की हे कोलंबो नाही. ◂(वृत्तसंस्था)

# पाकिस्तानला सामना जिंकणे आवश्यक

### नामिबियाविरुद्ध आज निकराची लढत

◆ **कोलंबो, १७ फेब्रुवारी**

कट्टर प्रतिस्पर्धी भारताकडून झालेल्या पराभवानंतर पाकिस्तानचा टी-२० विश्वचषकातील प्रवास एका महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचला आहे. त्यामुळे बुधवारचा नामिबियाविरुद्धचा सामना 'करो या मरो' असा झाला आहे.

एकेकाळी पाकिस्तान सुपर आठमध्ये पात्र ठरण्यासाठी चांगल्या स्थितीत दिसत होता, परंतु भारताकडून झालेल्या पराभवामुळे त्यांना मोठा धक्का बसला आहे, त्यामुळे त्यांच्या शेवटच्या 'अ' गटातील सामन्यात त्यांना 'करो या मरो' अशा परिस्थितीत सामोरे जावे लागले आहे.

विश्वचषकातील प्रत्येक गटातील फक्त दोनच संघ सुपर आठमध्ये प्रवेश करतील. पाकिस्तान सध्या गुणतालिकेत भारत आणि अमेरिकेनंतर तिसऱ्या स्थानावर आहे. भारताने तीन सामन्यांत तीन विजयांसह सुपर आठमध्ये स्थान मिळवले आहे, तर अमेरिका चार गुणांसह आणि चांगल्या धावगतीसह दुसऱ्या स्थानावर आहे.

कागदावर नामिबियाविरुद्ध पराभव अशक्य वाटतो, परंतु पाकिस्तानची अस्थिर फलंदाजी पाहता, ते पूर्णपणे नाकारता येत नाही. या सामन्यातील पराभवामुळे पाकिस्तान स्पर्धेतून बाहेर पडेल आणि सुपर आठमध्ये प्रवेश करण्यासाठी अमेरिकेची चांगली स्थिती राहील.





गेर्हार्ड इरास्मस सलमान आगा

तथापि, पाकिस्तान ज्या संघाचा सामना करणार आहे त्याने त्यांचे तिन्ही सामने गमावले आहेत आणि तो गटात तळाशी आहे. त्यामुळे, सर्व लक्ष पाकिस्तानच्या फलंदाजीवर असेल, ज्यामध्ये बाबर आझम, सलामीवीर साहिबजादा फरहान, सईम अयुब आणि कर्णधार सलमान अली आघा यांचा समावेश आहे. भारताविरुद्ध पाकिस्तानच्या फलंदाजीच्या कमकुवतपणा उघड झाला.

भारताचे जलद गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि हार्दिक पंड्या यांनी पाकिस्तानला तीन बाद १३ धावांवर बाद केले. पाकिस्तानच्या मधल्या फळीने कोणताही प्रतिकार केला नाही, जे नामिबियासारख्या संघाविरुद्धही चिंताजनक लक्षण आहे. जलद गोलंदाज शाहीन शाह आफ्रिदीनेही संघर्ष केला. त्याने त्याच्या दोन षटकांमध्ये ३१ धावा दिल्या आणि एक बळी घेतला. एकमेव सकारात्मक पैलू म्हणजे सईम अयुबने तीन बळी घेतले आणि भारताच्या वरच्या फळीला अडचणीत आणले.

नामिबियाविरुद्ध, आफ्रिदीला लवकर बळी घ्यावे लागतील, कारण पहिल्या सहा षटकांमध्ये प्रमुख फलंदाजांना बाद केल्याने पाकिस्तानला सामन्यावर वर्चस्व गाजवण्याची संधी मिळेल. पाकिस्तानच्या पॉवरप्लेमधील कमकुवतपणा देखील चिंतेचा विषय आहे. गेल्या सामन्यात त्यांनी पॉवरप्लेमध्ये चार गडी गमावले. त्यांच्या मधल्या फळीत वारंवार बदल केल्याने परिस्थिती आणखी गुंतागुंतीची झाली आहे, त्यामुळे खालच्या फळीतील फलंदाजांना लवकर धावा काढण्याची शक्यता कमी झाली आहे. नामिबियाकडे प्रतिभावान गोलंदाज आहेत आणि मधल्या षटकांमध्ये पाकिस्तानचा संघर्ष महागात पडू शकतो. तीन पराभवांनंतर स्पर्धेतून आधीच बाहेर पडलेला नामिबिया सन्माननीय विजय मिळवण्यासाठी दृढनिश्चयी असेल. जर त्यांच्या संघाने पाकिस्तानला कमी धावसंख्येपर्यंत रोखले तर सामन्यात उलटफेर होऊ शकते. ◂(वृत्तसंस्था)

### आजचे सामने

**दक्षिण आफ्रिका विरुद्ध यूएई**
**स्थळ** : अरुण जेटली स्टेडियम, दिल्ली
**वेळ** : सकाळी ११ वाजता

**पाकिस्तान विरुद्ध नामिबिया**
**स्थळ** : एसएससी क्रिकेट मैदान, कोलंबो
**वेळ** : दुपारी ३.०० वाजतापासून

**भारत विरुद्ध नेदरलॅण्ड्स**
**स्थळ** : नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियम, अहमदाबाद
**वेळ** : सायंकाळी ७ वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# यूएई विरुद्धच्या सामन्यात ब्रेव्हिसकडे नजरा

◆ **नवी दिल्ली, १७ फेब्रुवारी**

बुधवारी येथे टी-२० विश्वचषकातील शेवटच्या आणि महत्त्वाच्या वाटणाऱ्या गट सामन्यात दक्षिण आफ्रिका संघर्ष करत असलेल्या संयुक्त अरब अमिराती (यूएई) विरुद्ध खेळेल तेव्हा सर्वांच्या नजरा तरुण स्फोटक फलंदाज डेवाल्ड ब्रेव्हिसच्या फॉर्मवर असतील.

दक्षिण आफ्रिकेने तीन विजयांसह सुपर आठमध्ये आधीच पात्रता मिळवली आहे. यामध्ये दोन सुपर ओव्हरमध्ये अफगाणिस्तानवर रोमांचक विजय आणि न्यूझीलंडवर सात गड्यांनी प्रभावी विजय समाविष्ट आहे. यूएईसाठी, हा सामना मार्को



जॅन्सेन, कागिसो रबाडा आणि लुंगी न्गीडीसारख्या वेगवान गोलंदाजांविरुद्ध स्वतःची चाचणी घेण्याची संधी असेल. आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांना क्वचितच अशा आक्रमक संघाचा सामना करावा लागतो, कारण बहुतेक प्रोटीया खेळाडू एस--२० मध्ये खेळतात. हा सामना दक्षिण आफ्रिकेसाठी सरावाचा असेल आणि संघ सपाट खेळपट्टीचा पुरेपूर फायदा घेण्यासाठी प्रथम फलंदाजी करू इच्छित असेल. वरच्या क्रमात, क्विंटन डी कॉक, एडन मार्कराम आणि रायन रिकेल्टन यांनी तीन सामन्यांमध्ये किमान एक अर्धशतक झळकावले आहे, परंतु ब्रेव्हिस (सहा, २३ आणि २१) यांनी अद्याप त्याची पूर्ण क्षमता सिद्ध केली नाही. दिग्गज एबी डिव्हिलियर्सशी जुळणाऱ्या फलंदाजीच्या शैलीसाठी बेबी एबी म्हणून ओळखला जाणारा ब्रेव्हिस, त्याच्या शानदार शॉट्समध्येही बेजबाबदार स्ट्रोक खेळण्याची प्रवृत्ती, त्याच्या पुढील स्तरावर प्रगतीमध्ये अडथळा आणत आहे. म्हणूनच २२ वर्षीय ब्रेव्हिसला अद्याप शुभमन गिल, हॅरी ब्रूक आणि यशस्वी जयस्वाल सारख्या समकालीन तरुण खेळाडूंच्या समान श्रेणीत मानले जात नाही.

यूएईमध्ये अनेक वेगवान गोलंदाजांची कमतरता आहे आणि फलंदाजांना अनुकूल कोटलाची खेळपट्टी अहमदाबादमध्ये भारताविरुद्धच्या सुपर एट सामन्यापूर्वी ब्रेव्हिसला त्याची लय परत मिळवण्याची संधी देऊ शकते.

दक्षिण आफ्रिका त्यांच्या फलंदाजीचा क्रम बदलणार नाही, परंतु कर्णधार मार्कराम रबाडा आणि एनगिडी या प्रमुख वेगवान गोलंदाजांना विश्रांती देऊन ॲंरिच नॉर्टजे आणि तरुण क्वेना म्फाका यांना संधी देऊ शकतो.◂(वृत्तसंस्था)

# वैयक्तिक कारणांमुळे हरमनप्रीत बाहेर

### हार्दिक सिंग करणार भारतीय हॉकी संघाचे नेतृत्व

◆ **नवी दिल्ली, १७ फेब्रुवारी**

नियमित कर्णधार हरमनप्रीत सिंग वैयक्तिक कारणांमुळे २० ते २५ फेब्रुवारी दरम्यान होबार्ट येथे होणाऱ्या एफआयएच प्रो लीग सामन्यांमध्ये खेळू शकणार नाही आणि मंगळवारी मिडफिल्डर हार्दिक सिंगला भारतीय पुरुष संघाचा कर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले.

भारत, स्पेन आणि यजमान ऑस्ट्रेलिया होबार्ट येथील तस्मानिया हॉकी सेंटर येथे स्पर्धेच्या आगामी टप्प्यात एकमेकांशी खेळतील. भारतीय संघाने राऊरकेला येथे संपलेल्या टप्प्यात त्यांचे चारही सामने गमावले, ज्यात अर्जेंटिनाविरुद्ध ०-८ असा अपमानजनक पराभवाचा समावेश आहे.

भारताचे मुख्य प्रशिक्षक क्रेग फुल्टन म्हणाले, राऊरकेलामधील आमची कामगिरी निराशाजनक होती आणि निकाल आमच्या मनासारखे नव्हते, परंतु आम्ही काही चांगले धडे शिकलो आहोत आणि काही लक्षणीय सुधारणा केल्या आहेत. नवीन कर्णधार हार्दिक हा दोन वेळा आलिम्पिक कांस्यपदक विजेता आहे. या संघात राऊरकेला स्टेज दरम्यान वरिष्ठ संघासाठी पहिले सामने खेळलेले अमनदीप लाक्रा आणि मनमीत सिंग सारखे तरुण खेळाडू देखील आहेत. हरमनप्रीत सिंग वैयक्तिक कारणांमुळे संघात असणार नाही, असे हॉकी इंडियाने एका निवेदनात म्हटले आहे.

फुल्टन म्हणाले, आमचे ध्येय होबार्टमध्ये चांगली कामगिरी करणे आणि विश्वचषक आणि आशियाई खेळांसाठी आमचा संघ अंतिम करणे आहे. ◂(वृत्तसंस्था)



**भारतीय संघ** : **गोलरक्षक** : सूरज करकेरा, मोहित होन्नेहल्ली शशिकुमार, **बचावपटू** : अमित रोहिदास, जर्मनप्रीत सिंग, जुगराज सिंग, संजय, सुमित, अमनदीप लाक्रा, यशदीप सिवाच, पूवन्ना चंदुरा बॉबी. **मिडफिल्डर** : राजिंदर सिंग, मनमीत सिंग, विवेक सागर प्रसाद, हार्दिक सिंग, मोइरांगथेम रबिचंद्र सिंग, विष्णू कांत सिंग, राज कुमार पाल. **फॉरवर्ड** : अभिषेक, शिलानंद लाक्रा, मनदीप सिंग, अरिजित सिंग हुंडल, आदित्य अर्जुन लालगे, अंगद बीर सिंग, मनिंदर सिंग. ■

# फिलिप्सच्या वादळी खेळीने न्यूझीलंड विजयी

### कॅनडाच्या युवराज सामराचे शतक व्यर्थ

◆ **चेन्नई, १७ फेब्रुवारी**

युवराज समरा टी-२० विश्वचषकात शतक करणारा सर्वांत तरुण फलंदाज ठरला, परंतु त्याची वादळी खेळी व्यर्थ ठरली. कारण ग्लेन फिलिप्सच्या तुफानी खेळीच्या जोरावर न्यूझीलंडने मंगळवारी येथे झालेल्या ग्रुप डी सामन्यात कॅनडाला २९ चेंडू आणि आठ गडी राखून पराभूत करून सुपर एटमध्ये आपले स्थान पक्के केले.

भारताच्या विश्वचषक विजेत्या अष्टपैलू खेळाडू युवराज सिंगच्या नावावर असलेल्या १९ वर्षीय समराने शेवटच्या षटकात बाद होण्यापूर्वी ६५ चेंडूत ११ चौकार आणि सहा षटकारांसह ११० धावा केल्या. त्याच्या खेळीमुळे प्रथम फलंदाजी करणाऱ्या कॅनडाने ४ बाद १७३ धावा केल्या.

न्यूझीलंडच्या ग्लेन फिलिप्सने ३६ चेंडूत नाबाद ७६ धावा केल्या. यामध्ये चार चौकार आणि सहा षटकार होते आणि रचिन रवींद्र (३९ चेंडूत नाबाद ५९) यांच्यासोबतची त्याची १४६ धावांची भागीदारी



सामनावीर ग्लेन फिलिप्स

यामुळे न्यूझीलंडने १५.१ षटकात २ बाद १७६ धावा केल्या आणि सामना जिंकला. न्यूझीलंडने चार सामन्यांतून सहा गुणांसह गटातील मोहीम संपवली. गट डी मध्ये ते दक्षिण आफ्रिकेनंतर दुसऱ्या स्थानावर आहेत. न्यूझीलंडची सुरुवात खराब झाली, चौथ्या षटकात त्यांचे दोन्ही सलामीवीर टिम सेफर्ट (६) आणि फिन ॲलन (२१) गमावले. ॲलनने डायलन हेलिगरच्या चेंडूवर एक चौकार आणि एक षटकार मारला, परंतु त्याच गोलंदाजाने पुढच्या षटकात त्याला बाद केले. पॉवरप्लेमध्ये न्यूझीलंडने दोन बाद ६० धावा केल्या.

सामनावीर म्हणून निवडलेल्या फिलिप्सने आक्रमक फलंदाजी केली आणि कॅनडाच्या अननुभवी आक्रमणाला उद्ध्वस्त करण्यात कोणतीही कसर सोडली नाही. त्याने फक्त २२ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले, त्याने डावाच्या ११ व्या षटकात अंश पटेलच्या गोलंदाजीवर दोन षटकार मारले आणि टी-२० विश्वचषकात न्यूझीलंडसाठी एक नवीन विक्रम प्रस्थापित केला. त्याने २००९ मध्ये आयर्लंडविरुद्ध आरोन रेडमंडचा विक्रम आणि चालू स्पर्धेत सेफर्टचा संयुक्त अरब अमिरातीविरुद्धचा विक्रम मोडला.

तत्पूर्वी युवराज सामरा स्पर्धेत अर्धशतक झळकावणारा सर्वांत तरुण खेळाडू ठरला आणि आता त्याने त्याच्या विक्रमात एक नवीन अध्याय जोडला आहे. या स्पर्धेत कॅनेडियन खेळाडूने ५० किंवा त्याहून अधिक धावा करण्याची ही तिसरी वेळ आहे. युवराजने कर्णधार दिलप्रीत बाजवा (३९ चेंडूत ३६ धावा) सोबत ११६ धावांची सलामी भागीदारी करत कॅनडाला चांगली सुरुवात करून दिली. टी-२० विश्वचषकात असोसिएट देशाच्या फलंदाजाने शतक झळकावण्याची ही पहिलीच वेळ होती. त्याच्या खेळीमुळे कॅनडाने स्पर्धेतील त्यांची दुसरी सर्वोच्च धावसंख्या गाठली.

न्यूझीलंडने त्यांच्या वेगवान गोलंदाजांवर अवलंबून राहिल्याने युवराजने त्यांना रोखले. किवीजकडून जेकब डफी, काइल जेमिसन, मॅट हेन्री आणि जेम्स नीशम यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

युवराजने फक्त ३६ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. नशीबही त्याच्या बाजूने होते. ९१ धावांवर असताना हेन्रीला डीप एक्स्ट्रा कव्हरवर त्याचा झेल घेता आला नाही. त्यानंतर तो १०७ धावांवर असताना त्याला विश्रांती देण्यात आली. ◂(वृत्तसंस्था)

# पावसामुळे सामना रद्द; ऑस्ट्रेलिया बाहेर

### झिम्बाब्वेचा सुपर आठमध्ये प्रवेश

◆ **पल्लेकल, १७ फेब्रुवारी**

आयर्लंडविरुद्धचा टी-२० विश्वचषक गट ब चा सामना पावसामुळे रद्द झाल्यानंतर झिम्बाब्वे सुपर आठमध्ये पोहोचला आहे, तर माजी विजेता ऑस्ट्रेलिया आणि आयर्लंड स्पर्धेतून बाहेर पडले आहेत.

दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण मिळाले आहे, ज्यामुळे झिम्बाब्वेला पाच गुण मिळाले आहेत. २६ फेब्रुवारी रोजी चेन्ई येथे होणाऱ्या पहिल्या सुपर आठ सामन्यात झिम्बाब्वेचा सामना आता भारताशी होईल. सुपर आठमध्ये पोहोचणारा झिम्बाब्वे हा सातवा संघ ठरला आहे. भारत, दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडीज यांनीही गट एकमधून सुपर एटमध्ये प्रवेश केला आहे. झिम्बाब्वे १९ फेब्रुवारी रोजी श्रीलंकेविरुद्ध आपला शेवटचा गट सामना खेळेल. श्रीलंका आधीच सहा गुणांसह सुपर आठमध्ये पात्र ठरला आहे. झिम्बाब्वे आणि श्रीलंकेकडून पराभूत झालेल्या ऑस्ट्रेलियाचे दोन गुण आहेत. झिम्बाब्वेने त्यांचे दोन्ही सामने गमावल्यानंतरच माजी विजेत्या संघाला सुपर आठमध्ये स्थान मिळवायचे होते परंतु पावसाने त्यांच्या योजना धुळीस मिळवल्या. ◂(वृत्तसंस्था)

# भारत 'अ' संघाकडून नेपाळचा पराभव

### उपांत्य फेरीत प्रवेश निश्चित

◆ **बँकॉक, १७ फेब्रुवारी**

वरिष्ठ संघाच्या गोलंदाज तनुजा कंवर आणि मिन्नू मणी यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे भारत अ संघाने मंगळवारी येथे नेपाळला सात गड्यांनी हरवून महिला आशिया कप रायझिंग स्टार्स क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत स्थान निश्चित केले.

डावखुरी फिरकी गोलंदाज तनुजाने १२ धावांत चार गडी बाद केले, तर मिन्नूने आठ धावांत तीन बळी घेतले. या दोन फिरकी गोलंदाजांच्या उत्कृष्ट गोलंदाजीमुळे भारताने नेपाळला १८ षटकांत फक्त ७८ धावांत गुंडाळले. दिनेश वृंदाच्या १८ चेंडूंत शानदार नाबाद ३९ धावांमुळे भारत अ संघाने फक्त ७.५ षटकांत तीन गडी गमावून ८२ धावा केल्या आणि दोन गुण मिळवले. भारतीय संघ आता चार गुणांसह गट अ मध्ये अव्वल स्थानावर आहे.

या गटातून उपांत्य फेरीत पोहोचणारा दुसरा संघ यूएई आणि पाकिस्तान अ यांच्यातील सामन्यानंतर निश्चित होईल.

यूएईचे चार गुण आहेत, परंतु जर पाकिस्तान जिंकला तर दोन्ही संघांचे प्रत्येकी चार गुण असतील, त्यानंतर नेट रन रेटवर कोणता संघ उपांत्य फेरीत पोहोचतो हे ठरवले जाईल. जर यूएई जिंकला तर ते सहा गुणांसह गटात अव्वल स्थानावर असेल आणि भारत दुसऱ्या स्थानावर जाईल.

भारताने सर्व विभागांमध्ये नेपाळवर वर्चस्व गाजवले. नेपाळच्या सलामीवीर बिंदू रावल (११) आणि समझ्ना खडका (२८) यांनी एक छोटेसे आव्हान उभे केले, परंतु त्या बाद झाल्यानंतर नेपाळचा डाव लवकर कोसळला. डावखुरी फिरकी गोलंदाज राधा यादवनेही १७ धावांत दोन बळी घेतले. ◂(वृत्तसंस्था)

# शतकवीर युवराज सामरा सर्वांत तरुण खेळाडू

◆ **चेन्नई, १७ फेब्रुवारी**

कॅनडाचा १९ वर्षीय भारतीय वंशाचा फलंदाज युवराज सामरा टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात शतक करणारा सर्वांत तरुण खेळाडू ठरला आहे. मंगळवारी येथे झालेल्या ग्रुप डी सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध ६५ चेंडूत सामराने कारकीर्दीतील सर्वोत्तम ११० धावा केल्या.

त्याचे क्रिकेटप्रेमी वडील बलजीत सामरा यांनी त्याचे नाव धडाकेबाज भारतीय फलंदाज युवराज सिंगच्या नावावर ठेवले. गेल्या वर्षी मार्चमध्ये पदार्पण करणाऱ्या सामराने त्याच्या १९ व्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात ही कामगिरी केली. सामराने त्याच्या वादळी खेळीदरम्यान ११ चौकार आणि सहा षटकार मारले. यामुळे कॅनडाने उच्च श्रेणीतील प्रतिस्पर्ध्याविरुद्ध १७३ धावांचा स्पर्धात्मक एकूण धावसंख्या उभारण्यास मदत केली. शेवटच्या षटकात जेकब डफीच्या चेंडूवर मोठा फटका मारताना तो बाद झाला. त्याची ही खेळी टी-२० विश्वचषकात असोसिएट संघातील फलंदाजाने केलेली सर्वोच्च वैयक्तिक



धावसंख्या आहे. यापूर्वी, टी-२० विश्वचषकात सर्वांत कमी वयात शतक ठोकण्याचा विक्रम पाकिस्तानच्या अहमद शहजादच्या नावावर होता, ज्याने २०१४ मध्ये २२ व्या वर्षी ही कामगिरी केली होती. ◂(वृत्तसंस्था)

### श्रीजेशचा हॉकी संघाच्या प्रशिक्षकपदासाठी अर्ज

◆ **नवी दिल्ली, १७ फेब्रुवारी**

गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये कार्यकाळ संपल्यानंतर दिग्गज गोलकीपर पीआर श्रीजेशने भारतीय ज्युनियर पुरुष हॉकी संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदासाठी पुन्हा अर्ज केला आहे. पुढील पंधरा दिवसांत या नियुक्तीबाबत निर्णय अपेक्षित आहे.

दोन वेळा ऑलिंपिक कांस्यपदक विजेता श्रीजेशला ऑगस्ट २०२४ पर्यंत ज्युनियर पुरुष संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्त करण्यात आले. त्याच्या मार्गदर्शनाखाली भारताने गेल्या डिसेंबरमध्ये चेन्नई येथे झालेल्या एफआयएच पुरुष हॉकी ज्युनियर विश्वचषकात कांस्यपदक जिंकले. ◂(वृत्तसंस्था)

## महत्वाचे...



### कुर्डुवाडीत शिवजयंतीनिमित्त ३५० जणांचे रक्तदान

**कुर्डुवाडी, दि. १७ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवानिमित्त सेन्ट्रल रेल्वे मजदूर संघ, कुर्डुवाडी च्यावतीने कुर्डुवाडी रेल्वेस्थानक येथे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबीरात ३५० रक्तदात्यांनी रक्तदान केले. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन रक्तदान शिबीराचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सी आरएमएस डिव्हिजनल सेक्रेटरी उल्हास बागेवाडी, संतोष कोलपकर (टीआय कुर्डुवाडी), एसएस ई सुरेश दानेकर, सुनील कुमार, विष्णू सुरवसे उपस्थित होते. सुमारे ३५० रक्तदात्यांनी रक्तदान शिबीरात रक्तदान करुन आपला सहभाग नोंदवला.यामध्ये महिला रक्तदात्यांचाही मोलाचा सहभाग होता. यावेळी दिवंगत रेल्वे कर्मचारी बबलू कांबळे,प्रशांत बागल,जमीर शेख, प्रशांत लंगोटे,बालाजी पालकर, सचिन उकरंडे, नागेश शिंदे, सुनील मोरे, श्रीकांत वाघमारे, अस्लम शेख यांना यावेळी श्रद्धांजली वाहाण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सागर रणदिवे,प्रशांत शिंगाडे,विठ्ठल चांगभले, आनंद महामुनी, धनंजय खटके, रियाज शेख, अक्षय गोरे, कृष्णा गोडसे, अमोल बागल, परवेज शेख, राहुल देशमुख, आकाश उकरंडे, अमोल होले, अमोल सुरवसे, कुलदीप अस्वरे, सादीक काझी, संतोष लोकरे, समाधान पवार, योगेश नकाते, संतोष काटकर, अभिषेक काळे, आकाश उकिरडे, वैभव जाधव, बापू पारखे, मदन शिंदे, अजित नलवडे, समीर शेख, उमेश हणवते, रोहित राऊत आदींनी परिश्रम घेतले.



### शिवजयंती डीजेमुक्त साजरी करा : आशिष कांबळे

**वेळापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती तसेच आगामी सण-उत्सवाच्या पार्श्वभूमीवर वेळापूर पोलीस स्टेशन येथे शांतता कमिटीचे पदाधिकारी, शिवजयंती उत्सव मंडळांचे पदाधिकारी व पोलिस पाटील यांची संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीस वेळापूर पोलीस ठाणे हद्दीतील मौजे खंडाळी, पिसेवाडी, निमगाव, तोंडले, बोंडले, मळोली, तांदुळवाडी व कोळेगाव येथील शिवजयंती उत्सव समितीचे सदस्य व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी आशिष कांबळे म्हणाले की, शिवजयंती डॉल्बी व डीजे मुक्त पद्धतीने साजरी करावी. तसेच आक्षेपार्ह देखावे अथवा बॅनर लावू नयेत, देखावे मर्यादित उंचीचे असावेत, मिरवणुका वेळेत सुरू करून वेळेतच समाप्त कराव्यात, जयंतीनंतर लावलेले झेंडे व बॅनर तात्काळ काढावेत, अशा सूचना दिल्या. सर्व मंडळांनी प्रशासनास सहकार्य करून शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने शिवजयंती साजरी करावी. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज आहे. नागरिकांनीही सहकार्य करावे, असे आवाहन प्रभारी अधिकारी आशिष कांबळे यांनी यावेळी केले. शिवजयंती उत्सव काळामध्ये मिरवणुकीमध्ये नियमांचे पालन न करता जर कोणी डि जे अथवा डॉल्बी लावण्याचा प्रयत्न केल्यास तो डी जे जप्त करून त्या मंडळावर कायदेशीर कारवाई केली जाईल. मंडळांनी मिरवणुकीमध्ये पारंपारिक वाद्याचा वापर करावा.

### पैशाच्या व्यवहारातून उंदीर मारण्याचे औषध प्राशन

**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

राहत्या घरी पैशाच्या व्यवहारातून उंदीर मारण्याचे औषध प्राशन केल्याचा धक्कादायक प्रकार शहरात मंगळवार दी. १७ फेब्रुवारी रोजी घडला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, लक्ष्मी संतोष डोळे वय ४० राहणार विजापूर नाका सोलापूर सध्या राहणार अवंती नगर जुना पुना नाका येथे दि. १७ फेब्रुवारी रोजी राहत्या घरी पैशाच्या व्यवहारातून उंदीर मारण्याचे औषध खाल्ल्याने त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालय सोलापूर येथे बहीण सुरेखा वाघमारे यांनी दाखल केले अशी नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे.

## निधन वृत्त...

### चंद्रसेन चौगुले



**वैराग, दि. १७ फेब्रुवारी-**

मानेगाव येथील रहिवासी आणि दादासाहेब चंद्रसेन चौगुले यांचे वडील चंद्रसेन खंडाप्पा चौगुले यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने मानेगाव परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. एक ऋषीतुल्या आणि अजातशत्रू व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातवंडे असा त्यांचा मोठा परिवार आहे.

### विमल जोशी-शहापूरकर



**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

मूळ शहापूर (ता.तुळजापूर) येथील व सध्या सोलापूर येथील जुनी मिल कंपाऊंडच्या उमा गृहनिर्माण सोसायटी येथील रहिवासी विमलबाई गणपतराव जोशी-शहापूरकर (वय ८१) यांचे शनिवारी सायंकाळी ६ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. रविवारी सकाळी ९ वा. येथील सोलापूर येथील जूना पूना नाका स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सूना, नातवंडे, नातसून, नातजावई असा परिवार आहे. शिवसेना नेते व महापालिकेचे कामगार नेते, देऋब्रा संस्थेचे कार्यकारिणी सदस्य, हुतात्मा स्मृती मंदिरचे माजी व्यवस्थापक प्रदिप जोशी व शेतकरी संघर्ष समितीचे नेते दिलिप जोशी यांच्या त्या मातोश्री होत.

# रात्रीचा पाणीपुरवठा सुरळीत करा, जुन्या ड्रेनेज लाईन बदला

**आमदार सुभाष देशमुख यांच्या प्रशासनाला सूचना**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

शहर व हद्दवाढ भागातील रात्रीचा पाणीपुरवठा तातडीने सुरळीत करावा तसेच ३० ते ३५ वर्षांपासून जुन्या झालेल्या ड्रेनेज लाईन व पिण्याच्या पाण्याच्या पाइपलाइन बदलण्याची कार्यवाही गतीने करावी,'' अशा स्पष्ट सूचना आमदार सुभाष देशमुख यांनी महापालिका प्रशासनाला दिल्या. विभागीय कार्यालय क्र. ५ येथे झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी शहरातील मूलभूत सुविधांबाबत अधिकाऱ्यांना धारेवर धरले.

बैठकीस उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, उपायुक्त आशिष लोकरे यांच्यासह संबंधित विभागप्रमुख उपस्थित होते. शहरातील आर.टी.ओ. रोड, माशाळ नगर, दाते नगर, टाकळीकर मंगळ कार्यालय रोड, निलम नगर, धोबळे नगर, जमादार वस्ती आदी भागांतील रस्त्यांवरील ड्रेनेज चेंबरची पातळी बिघडल्याने अपघात होत असल्याची बाब आमदारांनी निदर्शनास आणून दिली. संबंधित चेंबर समतल करून तातडीने दुरुस्ती करण्याचे आदेश देण्यात आले.



शहर व हद्दवाढ भागातील अनियमित पाणीपुरवठ्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत सकाळ व रात्रीच्या सत्रातील पुरवठा नियमित करण्याचे निर्देश देण्यात आले. मुख्य व अंतर्गत रस्त्यांची नियमित स्वच्छता, नवीन एलईडी लाईट बसविणे व देखभाल कामे पूर्ण करणे, नगरोत्थान योजनेअंतर्गत विविध भागांत ड्रेनेज लाईन टाकणे याबाबतही स्पष्ट सूचना देण्यात आल्या. निलम नगर (श्रमजीवी नगर) येथे १०० बेडचे महिला प्रसूतीगृह सुरू करण्यासाठी राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविणे, छत्रपती संभाजी महाराज तलाव विकसित करणे, पावसाळ्यात पाणी साचणाऱ्या भागांतील समस्या सोडविणे, हद्दवाढ भागात भाजीमंडई उभारणे व प्रतापनगर तांडा येथे स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून देणे या विषयांवरही त्यांनी प्रशासनाला निर्देश दिले.

**विभागीय क्रमांक ५चे कार्यालय जुळे सोलापुरात स्थलांतरित करावे**

आ. सुभाष देशमुख यांनी महापालिका प्रशासनाला विभागीय क्रमांक पाचचे कार्यालय जुळे सोलापूर येथे स्थलांतरित करण्याचे निर्देश दिले आहेत. सध्या हे कार्यालय इतर भागात कार्यरत असून, विभागीय क्रमांक पाचमध्ये दक्षिण सोलापूर मतदारसंघातील जुळे सोलापूर परिसरातील मोठा परिसर येतो. त्यामुळे संबंधित नागरिकांना प्रशासकीय कामांसाठी अधिक सोयीस्कर ठिकाणी कार्यालय असणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

# वाचनाने माणूस समृध्द बनतो : प्रा. श्रीहरी वेदपाठक

**सोलापूर विद्यापीठात कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे जयंतीनिमित्त उत्कृष्ट वाचकांचा सन्मान**







**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

सतत आणि चिंतनशील वाचनामुळे मनावरील ताण-तणाव कमी होतो, सकारात्मक दृष्टिकोन विकसित होतो आणि ज्ञानात सातत्याने भर पडते. वाचन ही केवळ सवय नसून व्यक्तिमत्त्व घडविणारी संस्कृती आहे. वाचनाने माणूस समृद्ध बनतो, असे प्रतिपादन ज्येष्ठ व्याख्याते प्रा. श्रीहरी वेदपाठक यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्रोत केंद्राच्यावतीने डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यान व उत्कृष्ट वाचक पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रा. वेदपाठक बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर होते. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, माजी आमदार धनाजी साठे, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी चे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. अनिल घनवट यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमास जयकुमार शितोळे, डॉ. ए. बी. शेख, प्रा. देवानंद चिलवंत, डॉ. समाधान पवार, डॉ. शशिकांत गायकवाड, डॉ. वीरभद्र दंडे आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. नानासाहेब गव्हाणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. पल्लवी सावंत यांनी मानले.

**या वाचकांचा झाला गौरव**

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी उत्कृष्ट वाचकांचा सन्मान केला जातो. यंदा विद्यार्थी गटातून सिद्धी येडम व सचिन इक्कलाकी, शिक्षक गटातून डॉ. तानाबाई पाटील आणि कर्मचारी गटातून सहायक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांना उत्कृष्ट वाचक पुरस्कार प्रदान करण्यात आला. रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, शाल आणि वृक्षरोप असे पुरस्काराचे स्वरूप होते.

## १२ वी परीक्षा केंद्रांना अचानक भेटी दिल्यानंतर सीईओंकडून शिक्षण विभागाचे कौतुक

**कॉपीमुक्त अभियान असेच राबविण्यात येणार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

जिल्ह्यात गेल्या आठवड्यापासून बारावीच्या परीक्षा चालू झाल्या आहेत. सर्व परीक्षा केंद्रांवर सीसी टीव्ही लावल्याने कोठेही कॉपी प्रकार आजपर्यंत आढळला नाही. यामुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी अचानक बार्शी तालुक्यातील १२वी परीक्षा केंद्रांना भेटी देऊन पाहणी केली आणि कॉपीमुक्त अभियान सक्सेस होत असल्याचे समाधान व्यक्त करून हे अभियान पूर्ण परीक्षा होईपर्यंत राबविणार असल्याचे सांगून शिक्षण विभागाच्या संबंधित यंत्रणेचेही त्यांनी कौतुक केले.

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळाच्या पुणे बोर्डातर्फे सध्या बारावीच्या परीक्षा सुरू आहेत. जिल्ह्यात कॉपीमुक्त अभियान राबविण्यात येत आहे. दक्षता समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी कुमार



आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, माध्यमिक शिक्षण अधिकारी सचिन जगताप यांच्यामार्फत कॉपीमुक्त अभियान राबविण्यासाठी जिल्ह्यातील सर्वच परीक्षा केंद्रावर सीसी टीव्ही कॅमेऱ्याची निगराणी आहे. मंगळवारी भौतिकशास्त्र विषयाचा पेपर होता. सीईओ कुलदीप जंगम यांनी बार्शी तालुक्यातील चार परीक्षा केंद्रांना अचानकपणे भेट दिली. परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही सुरू आहेत का? परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडत आहेत का? याची त्यांनी पाहणी केली. परीक्षा केंद्रात बसविण्यात आलेल्या सीसीटीव्हीमुळे सोलापूर जिल्ह्यात कॉपीमुक्त अभियान यशस्वी होत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

## चौघांनी मिळून लाथाबुक्क्यांनी केली मारहाण

**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**



राहत्या घराजवळ चौघांनी मिळून एकास दगडाने व लाथाबुक्याने मारहाण केल्याचा प्रकार दि.१७ फेब्रुवारी रोजी सोलापूर जिल्ह्यात घडला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, तानाजी लक्ष्मण काळे वय ३० राहणार वाडी कुरवली ता. पंढरपूर जि. सोलापूर यांना राहत्या घराजवळ रानातील बांध तोडण्याच्या कारणावरून संतोष काळे, नंदकुमार काळे व इतर दोन जणांनी मिळून दगडाने व लाथाबुक्याने मारहाण केल्याने त्यांना डोक्यास जखम व सर्वांगास मुकामार लागल्याने उपचारासाठी सरकारी दवाखाना पंढरपूर येथे दाखल करण्यात आले होते पुढील उपचारासाठी रेफरने शासकीय रुग्णालय सोलापूर येथे ते स्वतः दाखल झाले अशी नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे.

## आश्रम शाळेतील दोन विद्यार्थ्यांची इस्त्रोसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

जिल्ह्यात इतर मागास व बहुजन कल्याण विभागाच्या अंतर्गत ९७ आश्रम शाळा चालवले जात असून यामध्ये मंगळवेढा तालुक्यातील येड्राव व अक्कलकोट तालुक्यातील कोन्हाळी या आश्रम शाळेतील दोन विद्यार्थ्यांची इस्त्रो या अंतराळ संस्थेच्या अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे.

जिल्ह्यातील भटक्या विमुक्त प्रवर्गातील विद्यार्थी शिकत असलेल्या आश्रम शाळांमधील विद्यार्थ्यांची इस्त्रो या अंतराळ संशोधनात करत असलेल्या केंद्र सरकारच्या संस्थेसाठी निवड झाली आहे. येड्रावच्या आश्रम शाळेतील





इयत्ता बारावीच्या सायन्समध्ये शिकत असलेला ओंकेश माने व कोन्हाळीच्या आश्रम शाळेततील इयत्ता अकरावीच्या दिशा कामाठी अशा दोन विद्यार्थ्यांची इस्त्रोच्या अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे.

> इतर मागास व बहुजन कल्याण विभागामार्फत आश्रम शाळेच्या गुणवत्ता वाढीसाठी विविध स्पर्धा घेण्यात येतात. तसेच शाळांमध्येही अंतर्गत परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांना परीपूर्ण बनविण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. संस्था, मुख्याध्यापक व प्राचार्यांची वारंवार बैठका घेऊन विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी उपाययोजना करण्यात येते. त्यामुळेच आश्रमशाळांमधील दोन विद्यार्थ्यांची इस्त्रोच्या अभ्यास दौर्यासाठी निवड झाली आहे.
>
> **- गणेश सोनटक्के, सहाय्यक संचालक, इतर मागास व बहुजन कल्याण विभाग**

# राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष पाटील यांची पक्षातून हकालपट्टी करा

**पंढरपुरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची प्रदेशाध्यक्षांकडे मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १७ फेब्रुवारी-**

राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट) पक्षाचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष उमेश पाटील यांनी यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाशी जवळीकता साधून मोहोळ पुरते वर्चस्व सिद्ध करण्याच्या नादात जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचा सुपडा साफ झाला याला जिल्हाध्यक्ष उमेश पाटील हे जबाबदार असल्याने त्यांची पक्षातून हकालपट्टी करा, अशी मागणी पंढरपूर येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्याकडे केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या सोलापूर जिल्ह्यात पक्षाचे ध्येय धोरण सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवणे आणि पक्ष वाढीसाठी उमेश पाटील यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली होती.

त्यांच्या कार्यकाळात प्रत्येक तालुक्यात आढावा बैठकीच्या निमित्ताने फक्त त्यांनी आपली ओळख परेड केली. दरम्यान त्यांनी सोलापूर जिल्ह्यातील मतदाराचा डीएनए राष्ट्रवादीचा आहे. परंतु आता यांचा डीएनए शिवसेनेचा की भाजपचा हे बघावे लागेल उमेश पाटलांनी जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचा सुपडा साफ केला असा आरोप राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष दिगंबर सुडके यांनी पंढरपूर येथे माध्यमांशी बोलताना केला.

ते पुढे बोलताना म्हणाले की उमेश पाटील यांनी कोणत्याही तालुक्यामध्ये निवडणुकांसंदर्भात नियोजन केले नाही किंवा पक्ष वाढीसाठी बैठका घेतल्या नाहीत. पक्षासाठी कोणताही धोरणात्मक निर्णय घेतले गेले नाहीत. उमेश पाटील यांनी पदभार घेतल्यानंतर होते ते राष्ट्रवादीचे आमदार हे निवडून आले नाहीत उलट मोहोळ मधील राष्ट्रवादीचे आमदार यशवंत माने यांना पराभूत करण्याचा चंग बांधला त्या ठिकाणी त्यांना पराभूत करून स्वतःच्या तालुक्यातील राष्ट्रवादीस नेस्तानुबुत केले असा आरोप करत

नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये कोणत्याही तालुक्यात पक्षाच्या उमेदवाराबाबत चर्चा किंवा निवडणूक लढवण्यासंदर्भात बैठकांचे आयोजन केले गेले नाही. उलट नगरपरिषद निवडणुकीच्या वेळी कार्यकर्त्यांना ए. बी.फॉर्म न देणे, जिल्हा परिषदेला सख्खा भावाला शिवसेनेच्या धनुष्यबाणावरती उभे केले. त्याचबरोबर स्वतःचा दारुण पराभव झाला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीदरम्यान जिल्ह्यात प्रचार यंत्रणा सक्षमपणे प्रचार यंत्रणा राबवली गेली नाही. पक्ष स्थानिक नेत्यांच्या दारात बांधून आर्थिक स्वार्थ साधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा संपवण्याची भूमिका पार पाडल्याने जिल्ह्यातील एकाही नगरपालिकेत राष्ट्रवादीचे नगरसेवक निवडून येऊ शकले नाहीत. यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष शुभम शीरकर, शहर उपाध्यक्ष संजय म्हमाणे, कार्याध्यक्ष रशीद शेख, ओम कदम यांच्यासह पंढरपुरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## पाकणीतील शिक्षणक्रांतीचे शिल्पकार : स्व. कृष्णा शिंदे

उत्तर सोलापूर तालुक्यातील पाकणीसारख्या छोट्याशा खेड्यात जन्मलेले स्वर्गीय कृष्णा (दादा) गेनदेव शिंदे सर हे नाव आजही गावकऱ्यांच्या हृदयात श्रद्धा, अभिमान आणि कृतज्ञतेने उच्चारले जाते. शेतकरी कुटुंबात जन्म, गरिबीची चटके, आयुष्यातील हालअपेष्टा या सर्वांवर मात करून त्यांनी केवळ स्वतःचे जीवन घडवले नाही, तर संपूर्ण पिढ्यांचे भविष्य उजळवले. म्हणूनच ते पाकणीतील शिक्षणक्रांतीचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात.



दादांचे बालपण म्हणजे संघर्षाची शाळाच होती. शिक्षण घेत असताना कधी शेतावर मजुरी, तर कधी लहान मुलांना शिकवणी देऊन स्वतःच्या शिक्षणाचा खर्च उचलणे हे त्यांचे दैनंदिन वास्तव होते. परंतु या कठीण परिस्थितीतही त्यांनी शिक्षणाची ज्योत विझू दिली नाही. त्यांच्या मनात एकच ध्यास होता शिकायचे आणि इतरांनाही शिकवायचे. हीच धग पुढे त्यांच्या आयुष्याचे ध्येय ठरली. पुढे कर्मवीर जगदाळे मामा व कर्मवीर लोहकरे गुरुजी यांच्या सहवासाने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला दिशा मिळाली. एका शेतकरी कुटुंबातून आलेल्या प्रामाणिक, कष्टाळू आणि तळमळीच्या युवकात दडलेला शिक्षक त्यांनी ओळखला. आज दादांच्या स्मृतीदिन आहे. त्यांचा वारसा त्यांच्या सुपुत्र मा. सुबोध भैय्या शिंदे व सौ. सुनिताताई शिंदे समर्थपणे पुढे नेत आहेत. संस्थेतील मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी मोठ्या निष्ठेने शाळा चालवत आहेत. गावातील पालकांचेही सहकार्य या कार्याला सतत मिळत आहे. त्यामुळे दादांनी रुजवलेले शिक्षणाचे रोपटे आज विशाल वृक्ष बनले आहे-आणि त्याच्या प्रत्येक पानात दादांच्या कष्टांचा, त्यागाचा आणि प्रेमाचा सुगंध आहे. स्व. कृष्णा (दादा) गेनदेव शिंदे यांचा २५ वा स्मृतिदिन म्हणजे केवळ स्मरणाचा दिवस नाही; तो कृतज्ञतेचा, प्रेरणेचा आणि संकल्पाचा दिवस आहे. त्यांनी दाखवलेली वाट-ग्रामीण शिक्षणाची, सामाजिक समतेची आणि निस्वार्थ सेवाभावाची-हीच खरी त्यांना वाहिलेली श्रद्धांजली ठरेल. दादांना विनम्र अभिवादन. त्यांच्या कार्याचा प्रकाश पुढील पिढ्यांना मार्गदर्शक ठरो हीच भावपूर्ण प्रार्थना.

**- डॉ. नितीन आवताडे**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# अक्कलकोटच्या पाणीपुरवठ्यासाठी वर्ल्ड बँक पुरस्कृत निधीतून अर्थसहाय्य मिळवणार : नगराध्यक्ष कल्याणशेट्टी

- लोककल्याणकारी योजनांची अंमलबजावणी
- कामकाज गतीमान करण्यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता

**तभा वृत्तसेवा । नंदकुमार जगदाळे**
**अक्कलकोट, दि.१७ फेब्रुवारी-**

अक्कलकोट येथील सांगवी बंधारा येथून नवीन पाणीपुरवठा योजना राबविण्यास वर्ल्ड बँक पुरस्कृत निधीतून मंजुरी मिळण्याबाबत प्रयत्न चालू आहेत. अक्कलकोटच्या पाणीपुरवठ्यासाठी अर्थसहाय्य मिळवणार असल्याचे अक्कलकोटचे नगराध्यक्ष मीलन कल्याणशेट्टी यांनी दैनिक सोलापूर तरुण भारतशी बोलताना सांगितले.

विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी व प्रशासनाचे कामकाज गतीमान करण्याच्या अनुषंगाने आणखी मनुष्यबळ यांसह प्रशासकीय व तांत्रिक काम काजांसाठी नवीन पदांची निर्मिती करणे गरजेचे आहे. याबाबत आकृतीबंध प्रस्ताव नगरपरिषद प्रशासनाचे आयुक्त तथा संचालक यांच्याकडे सादर करण्यात येणार आहे.



याबाबत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामार्फत विशेष प्रयत्न करीत आहेत. सुरळीत पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने नगरपालिका प्रशासन गतिमान करण्यासाठी आपला प्रयत्न राहणार आहे. याकरिता नगरपालिकेची विशेष सभा घेण्यात येणार आहे.

तीर्थक्षेत्र अक्कलकोटी येणाऱ्या भाविकांची संख्या वाढत आहे. नगरपरिषद क्षेत्रात नागरीकरणात वाढ झालेली आहे. पायाभुत सुविधांवर पडत असलेला ताण, राज्य व केंद्र शासनाकडून सुरु असेलेल विविध प्रकल्प/उपक्रम, घनकचरा व्यवस्थापनाचे बदललेले निकष यामुळे कर्मचारी वर्ग कमी पडत आहे, असेही त्यांनी सांगितले.

### दाबनलिका झाली जीर्ण

सन १९३६ पासून सांगवी बंधारा येथून अक्कलकोटसाठी नगरपरिषदेचे पाणीपुरवठा योजना सुरु आहे. योजनेतून अशुध्द पाणी उपसा करण्यासाठी असलेली दाबनलिका अत्यंत जीर्ण झाली आहे. सदरील दाबनलिका बदलणे अत्यंत आवश्यक आहे. वर्ल्ड बँकेकडून पाणीपुरवठा योजनेसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

### ठळक मुद्दे याप्रमाणे

- सन २०११ नुसार लोकसंख्या ४०१०३, क्षेत्रफळ ४.४२ चौ.कि.मी.
- अक्कलकोट नगरपरिषदचे क वर्ग मधून ब वर्गमध्ये वर्गीकरण झाले.
- श्रीस्वामी समर्थांच्या दर्शनासाठी राज्य, परराज्यातून येताहेत भाविक.
- अक्कलकोट नगरपरिषद क्षेत्रात नागरीकरणात मोठ्या प्रमाणात वाढ.
- स्थानिक, भाविकांच्या तरंगती लोकसंख्येमुळे पायाभूत सुविधांवर ताण.
- नगरपरिषद क्षेत्रात नागरीकरणात वाढ झालेली आहे.
- नगरपालिकेची विशेष सभा घेण्यात येणार
- कामकाजांसाठी नवीन पदांची निर्मिती करणे गरजेचे
- सुरळीत पाणीपुरवठाच्या दृष्टीने नगरपालिका प्रशासन प्रयत्न राहणार

# गृहनिर्माण संस्थेचा देखभाल दुरुस्ती टाळता येणार नाही

## सभासद नसले तरी गृहनिर्माण सोसायटीचा खर्च बंधनकारक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१७ फेब्रुवारी -**

गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये मेंटेनन्स न भरणाऱ्या सदस्यांवर आता कडक कारवाईचा मार्ग मोकळा झाला आहे. इमारतीच्या देखभाल-दुरुस्तीचा खर्च देणे हे प्रत्येक रहिवाशाचे बंधनकारक कर्तव्य असल्याचे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. सदस्यत्व न घेतले तरी संबंधित सदनिकाधारकाला मेंटेनन्स देणे टाळता येणार नाही, अशी महत्त्वपूर्ण भूमिका न्यायालयाने घेतल्याची माहिती उपनिबंधक कार्यालयाने दिली.

शहरातील अनेक गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये काही सदस्य नियमित मेंटेनन्स भरतात, तर काही जण विविध कारणांनी थकबाकी ठेवतात. काहीजण तर सोसायटीचे अधिकृत सदस्यच होत नाहीत; मात्र त्या इमारतीतील सुविधा वापरतात. मी सभासद नाही, त्यामुळे मेंटेनन्स देणार नाही, असा युक्तिवाद अनेकदा केला जातो. मात्र, हा दावा कायद्याच्या चौकटीत ग्राह्य धरला जाणार नाही, असे स्पष्ट झाले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यानुसार थकीत रकमेच्या वसुलीसाठी पूर्वी कलम १०१ अंतर्गत नोटीस देण्याची तरतूद होती. आता सुधारित तरतुदीनुसार 'कलम १५४-ब' हे विशेष प्रावधान लागू करण्यात आले आहे. या कलमान्वये गृहनिर्माण सोसायटीला थकबाकी वसुलीसाठी थेट कारवाईचा अधिकार मिळतो. संबंधित सोसायटी शहर उपनिबंधकांकडे अर्ज करू शकते. शासन नियमानुसार स्टॅम्प शुल्क भरल्यानंतर सुनावणी घेऊन निबंधक सोसायटीला वसुलीचा दाखला देतात. ही वसुली जमीन महसूल थकबाकीप्रमाणे थेट वसूल करता येते.



शहर उपनिबंधक डॉ. प्रगती बागल यांनी सांगितले की, देखभाल-दुरुस्तीचा खर्च हा एकवेळचा नसून दर महिन्याचे सततचे कर्तव्य आहे. प्रत्येक महिन्याची थकबाकी ही स्वतंत्र चूक मानली जाते. जोपर्यंत थकबाकी अस्तित्वात आहे, तोपर्यंत कारवाईचा अधिकार कायम राहतो. विशेष म्हणजे या कलमात कोणतीही कालमर्यादा नमूद केलेली नाही. त्यामुळे वर्षानुवर्षे थकबाकी ठेवणाऱ्यांवरही कारवाई करता येणार आहे. उच्च न्यायालयाच्या निर्णयात आणखी एक महत्त्वाची बाब नमूद करण्यात आली आहे. सोसायटीची थकबाकी ही केवळ व्यक्तीशी संबंधित नसून ती संबंधित सदनिका किंवा गाळ्याशी संलग्न असते. म्हणजेच, सदनिकेचा लाभ जो घेतो, त्यानेच मेंटेनन्स भरायचा आहे. तो अधिकृत सभासद असो वा नसो, किंवा त्याच्याकडे नोंदणीकृत करार नसला तरी सुविधा वापरत असल्यास खर्च देणे बंधनकारक आहे.

तसेच 'मोफा' (महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट्स ॲक्ट) कायद्यानुसार प्रवर्तकाने सोसायटी स्थापन करणे आणि विक्री न झालेल्या सदनिकांसाठी सभासद होणे ही जबाबदारी आहे. त्यामुळे सुविधा उपभोगत असताना सदस्यत्व नसल्याचा आधार घेऊन जबाबदारी टाळता येणार नाही. या निर्णयामुळे नियमित मेंटेनन्स भरणाऱ्या सभासदांना मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र, ज्या गृहनिर्माण सोसायट्या अधिकृतपणे नोंदणीकृत नाहीत, त्यांना उपनिबंधकांकडे तक्रार करता येणार नाही, असेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. एकूणच, गृहनिर्माण सोसायटीतील पारदर्शकता आणि आर्थिक शिस्त राखण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार असून, मेंटेनन्स भरणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचा स्पष्ट आदेश न्यायालयाने दिला आहे.

# भाजपाने पद्माकर काळे यांना स्वीकृत सदस्य केल्यास स्वागतच

**▸▸नगरसेवक अमोल शिंदे यांची पत्रकार परिषदेत प्रतिक्रिया**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१७ फेब्रुवारी -**



भाजपाने महापालिकेत पद्माकर उर्फ नाना काळे यांना स्वीकृत सदस्य केले तर त्याचे स्वागतच आहे. तसे झाले तर पहिला सत्कार मीच करणार आहे, असे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख व नगरसेवक अमोल शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

नाना काळे यांना भाजपकडून स्वीकृत सदस्यपद देण्यात येणार असल्याची माहिती आहे, याबाबत आपले म्हणणे काय? असे पत्रकारांनी विचारले असता अमोल शिंदे म्हणाले की, भाजपने काळे यांना संधी दिली तर स्वागतच आहे. ते स्वीकृत सदस्य झाल्यास पहिला सत्कार आपण करणार आहोत. काळे यांना स्वीकृत सदस्य केल्यास मराठा समाजाला न्याय मिळणार आहे. निवडणुकीत भाजपने नाना काळे यांचा वापर करून घेतला. माणसांचा वापर करून घेण्यात कोठे परिवार पटाईत आहे. हे लक्षात घेता नाना काळे यांना स्वीकृत सदस्य मिळणार याबाबत २० फेब्रुवारीला चित्र स्पष्ट होईल, असे अमोल शिंदे म्हणाले.

दरम्यान, नाना काळे नगरसेवक झाल्यास प्रभाग क्रमांक सात मधील नगरसेवकांच्या संख्येत भर पडणार आहे. लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी तसेच विकास कामांसाठी त्याचा फायदा होईल, असेही अमोल शिंदे यांनी सांगितले.

# २२, २३ फेब्रुवारी रोजी जगातील मोठी कृषी परिषद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ फेब्रुवारी**



महाराष्ट्र शासनाने शेतीला उपग्रह व कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात नेण्यासाठी ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. येत्या २२ व २३ फेब्रुवारी रोजी मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर (बी. के.सी.) येथे या जागतिक परिषदेचे आयोजन होणार आहे.

या परिषदेत जागतिक बँक, आशियाई विकास बँक, संयुक्त राष्ट्र यांसारख्या नामांकित संस्थांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. शेतकरी, विद्यार्थी, संशोधक, स्टार्टअप्स आणि कृषी उद्योजकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे. ही परिषद आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शेतकऱ्यांचे भविष्य बदलणारा महाकुंभ ठरणार आहे.

# स्वीकृत सदस्यत्वासाठी आज महापालिकेत अर्ज स्वीकृती

## १० जागांसाठी जोरदार रस्सीखेच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ फेब्रुवारी-**

महापालिकेच्या नामनिर्देशित म्हणजेच १० स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीकरिता संबंधितांना आज बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी १.३० वाजेपर्यंत महापालिकेतील आयुक्त कार्यालयात अर्ज सादर करावे लागणार आहे. यासाठी प्रशासकीय स्तरावर आवश्यक ती तयारी करण्यात आली आहे. सोलापूर महापालिकेची नवीन टर्ममधील पहिली सर्वसाधारण सभा शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता बोलाविण्यात आली आहे.



या सभेमध्ये १० स्वीकृत सदस्य, स्थायी समितीचे १६ तर परिवहन समितीच्या १२ सदस्यांची नियुक्ती होणार आहे. नूतन महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या कै. यशवंतराव बळवंतराव सभागृह (कौन्सिल हॉल) येथे होणार आहे. महापालिकेचे नगरसचिव प्रवीण दंतकाळे यांनी या सभेचा अजेंडा प्रसिद्ध केला आहे. या अजेंड्यानुसार विविध नेमणुका होणार आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २० (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे आयुक्त यांच्या दि.९ फेब्रुवारीच्या टिपणीत नमूद केल्याप्रमाणे स्थायी समितीचे १६ सदस्य आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २५ (२) अन्वये परिवहन समितीच्या १२ सदस्यांची नेमणुका करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ नुसार सोलापूर महानगरपालिकेत १० नामनिर्देशित सदस्यांची आयुक्तांच्या दि.९ फेब्रुवारीच्या टिपणीत नमूदप्रमाणे नियुक्ती करण्याचा विषय सभेपुढे ठेवण्यात आला आहे.

स्वीकृत नगरसेवकाच्या उमेदवारी अर्जासोबत नियमांनुसार विविध कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. दरम्यान, प्रशासकीय प्रस्तावांबरोबर सभासद प्रस्तावदेखील सभा पटलावर आहेत. संख्याबळानुसार भाजपाला नऊ तर एमआयएमला एक स्वीकृत सदस्य नामनिर्देशित करता येणार आहे.

### एका पत्रकाराची लागणार वर्णी?

स्वीकृत सदस्यत्वासाठी भाजपातील अनेक नावांची चर्चा आहेत. यामध्ये भाजपा शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, माजी उपमहापौर पद्माकर काळे, माजी नगरसेवक प्रभाकर जामगुंडे, कुमुद अंकारम, केदार उंबरजे, यांच्यासह मनीष देशमुख, अविनाश महागावकर, सुधा अळ्ळीमोरे, संतोष सोमा, ॲड.प्रदीपसिंह रजपूत, मोहन डांगरे यांच्या नावाची जोरदार चर्चा आहे. दरम्यान, एका पत्रकाराची स्वीकृत नगरसेवकपदावर वर्णी लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचा आज दिमाखदार पाळणा सोहळा

- वीरपत्नी, वीरमाता, कन्या यांची असणार उपस्थिती
- जिजाऊंच्या वेशात सहभागी होण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्यावतीने दरवर्षीप्रमाणे साजरा करण्यात येणाऱ्या शिवाजी महाराज पाळणा सोहळ्याची तयारी पूर्ण झाली असून, यंदाही हा सोहळा मोठ्या दिमाखात पार पडणार आहे. बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी रात्री ११ वाजता पाळणा सोहळ्याला सुरुवात होणार असल्याची माहिती मध्यवर्ती महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.



यावर्षीच्या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे देशासाठी सर्वोच्च बलिदान देताना धारातीर्थी पडलेल्या भारतीय सैन्यामधील सोलापूर शहरातील शहीद जवानांच्या वीरपत्नी, वीरमाता आणि वीरकन्या यांच्या हस्ते पाळणा सोहळा संपन्न होणार आहे. त्याचबरोबर मध्यवर्ती महामंडळाच्या आजी-माजी ट्रस्टींच्या धर्मपत्नी तसेच शिवकन्यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडणार असल्याने कार्यक्रमाला विशेष भावनिक आणि प्रेरणादायी स्वरूप लाभणार आहे. शहरातील महिला, भगिनी मोठ्या उत्साहात पारंपरिक वेशभूषेत तसेच जिजाऊंच्या वेशात पाळणा सोहळ्यासाठी सहभागी होणार असून या सोहळ्यामुळे संपूर्ण परिसर शिवमय होणार आहे. महिलांच्या सुरक्षेचे विशेष नियोजन करण्यात आले असून, त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस प्रशासन, स्वयंसेवक तसेच मध्यवर्ती महामंडळाच्या कार्यकर्त्यांची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. शिवप्रेमी महिला भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पाळणा सोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन शिवजन्मोत्सव करण्यात आले आहे. शिवभक्तांसाठी हा सोहळा अविस्मरणीय ठरणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

### शिवभक्तांची लक्षवेधी उपस्थिती असणार

कार्यक्रम स्थळी मोठ्या प्रमाणात शिवभक्त उपस्थित राहण्याची शक्यता लक्षात घेऊन एलईडी स्क्रीनची व्यवस्था करण्यात आली आहे, जेणे करून सर्वांना सोहळा प्रत्यक्ष पाहता येईल. आकर्षक सजावट, पारंपरिक ढोल-ताशांचा नाद आणि शिवभक्तांच्या जयघोषात हा पाळणा सोहळा दिमाखदार वातावरणात पार पडणार आहे.

### यांची उपस्थिती असणार

माजी ट्रस्टी अध्यक्ष कै. मुरलीधर घाडगे यांच्या पत्नी माजी उपमहापौर सुषमाताई घाडगे, माजी ट्रस्टी सदस्य कै. अर्जुनराव सुरवसे यांच्या धर्मपत्नी यशोदाताई सुरवसे, कै. धर्मा भोसले यांच्या धर्मपत्नी सीताबाई भोसले, कै. विजय फुटाणे यांच्या धर्मपत्नी लता फुटाणे, ट्रस्टी सदस्य शिवाजीराव घाडगे यांच्या धर्मपत्नी सरोजनी घाडगे, ट्रस्टी सदस्य दिलीप कोल्हे यांच्या धर्मपत्नी उपमहापौर मंगला कोल्हे.

### या वीर पत्नींचा असणार सहभाग

श्रीमती देवकी रत्नाकर हडपद, रेखा शौर्याप्पा नावी, सुषमा दत्तात्रय माने, रत्नाबाई बाबुराव चांदोडे.

### या शिवकन्यांचा सहभाग

महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा उत्तीर्ण होऊन यश मिळवणाऱ्या सोलापुरातील शिवकन्या संजीवनी ज्योतीराम भोजने, सरोजिनी ज्योतीराम भोजने, अमृता ब्रह्मदेव ननवरे यांचा देखील सहभाग पाळणा सोहळ्यासाठी सहभाग असणार आहे.

**पाच रिक्त जागेच्या निवडणुकीसाठी**

# मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि.१७ फेब्रुवारी-**

३१ जानेवारी २०२६ पर्यंत रिक्त झालेल्या सदस्य, थेट सरपंच यांच्या निधन, राजीनामा किंवा इतर कारणामुळे रिक्त जागांच्या पोटनिवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर झाला आहे.



तालुक्यातील पाणीव, कोळेगाव, इस्लामपूर या ग्रामपंचायतीचे सदस्य मयत झाल्याने ही पदे रिक्त असून कोळेगाव व लोंढे मोहिते वाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच यांनी राजीनामा दिल्याने या सरपंच पदाच्या जागा रिक्त आहेत. या ५ जागांच्या पोटनिवडणुकीसाठी मतदार यादी करण्याचा कार्यक्रम जाहीर झाला असल्याची माहिती तहसीलदार सुरेश शेजुळ यांनी दिली. यावेळी निवडणूक विभागाचे दशरथ माळी उपस्थित होते



# तरुणाईने नात्यांकडे डोळसपणे पाहणे काळाची गरज : मधुरा सलवारु

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ फेब्रुवारी-**

आजच्या धावपळीच्या युगात आणि सोशल मीडियाच्या प्रभावाखाली वावरताना तरुणाईने आकर्षण, मैत्री आणि प्रेम यातील फरक ओळखून आयुष्याची दिशा निश्चित करणे आवश्यक आहे.

याच उद्देशाने व्हॅलेंटाईन डे चे औचित्य साधून गांधी नाथा रंगजी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज विशाखा समिती येथे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्या मधुरा सलवारू यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी होमिओपॅथी कॉलेजचे प्राचार्य डॉ. श्रीधर पाटील, डॉ. मनीषा अंधळगावकर, डॉ. वैशाली सर्वदे, डॉ. वैशाली सुरवसे, डॉ. रेवती कांबळे, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. गजेंद्र लाड यांचा विशेष सहभाग होता. यावेळी विद्यार्थी आणि शिक्षक वर्गासाठी 'दिल दोस्ती दुनियादारी' ही शॉर्टफिल्म दाखवण्यात आली.

# आदिवासी कोळी महादेव जमातीचा २३ फेब्रुवारीला मोर्चा

## शिवसेना उबाठाचे युवा सेना मंगळवेढा शहर प्रमुख अरविंद नाईकवाडी यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १७ फेब्रुवारी-**

आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे प्रणित आदिवासी कोळी महादेव डोंगर कोळी कोळी मल्हार टोकरे कोळी कोळी ढोर यांच्यावरील खरे खोटे असा भेदभाव करून जाणीवपूर्वक केल्या जाणाऱ्या दुजाभावाला वाचा फोडण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील सर्व कोळी महादेव जमात बांधवांनी आझाद मैदान मुंबई येथून २३ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता मोर्चा काढण्यात येणार आहे.



सोलापूर जिल्ह्यातील आदिवासी कोळी महादेव जमात बांधवांनी आपल्या हक्कासाठी अन्यायाला वाचा फोडण्यासाठी जाचक अटी रद्द झाल्या पाहिजे व १९५० पूर्वीच्या कोळी नोंदीवरून व १९५० च्या रहिवाशी पुराव्यावरून सुलभ पद्धतीने जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी आपल्या हक्कासाठी आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे प्रणित सामाजिक संघटना दत्ताभाऊ सुरवसे यांच्या नेतृत्वाखाली मुंबईच्या आझाद मैदानावर २३ फेब्रुवारीला मोर्चा निघणार आहे तरी सोलापूर जिल्ह्यातील सर्व जमात बांधवांनी मोठ्या संख्येने मोर्चामध्ये सहभागी व्हावे असे आव्हान शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे युवासेना मंगळवेढा शहर प्रमुख अरविंद नाईकवाडी यांनी केले आहे

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ग्रामपंचायत पोटनिवडणुकांसाठी मतदार यादी कार्यक्रम जाहीर

**धाराशिव, दि.१७ फेब्रुवारी -** तालुक्यातील जवळे दु., कौडगाव (बार्शी), गोपाळवाडी, केशेगाव, शेकापूर, गोरेवाडी, शिंगोली व कनगरा या ग्राम पंचायतींतील सदस्य, थेट सरपंच यांच्या निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर कारणांमुळे रिक्त झालेल्या जागांसाठी पोटनिवडणुका घेण्यात येणार असून त्यासाठी मतदार यादी कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांच्या निर्देशानुसार दि.३१ जानेवारी २०२६ पर्यंत रिक्त झालेल्या ग्रामपंचायत जागांसाठी पोटनिवडणुका होणार आहेत. या निवडणुकांसाठी दि.१ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी ग्राह्य धरण्यात येणार आहे. मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दि.१ जुलै २०२५, प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध : १६ फेब्रुवारी २०२६, हरकती व सूचना दाखल कालावधी : १६ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी २०२६, प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्ध : २४ फेब्रुवारी २०२६. प्रारूप मतदार यादी संबंधित ग्रामपंचायत कार्यालय, तलाठी सज्जा तसेच मंडळ अधिकारी कार्यालयाच्या फलकावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

संबंधित मतदारांनी आपले नाव यादीत तपासून आवश्यक हरकती किंवा सूचना विहित कालावधीत सादर कराव्यात, असे आवाहन तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### न.प. शाळेला शिक्षण सभापतींची भेट

**तुळजापूर, दि.१७ फेब्रुवारी -** येथील नगरपरिषद प्राथमिक शाळा क्रमांक २ या शाळेला न.प. शालेय शिक्षण सभापती नीता क्षिरसागर यांनी अचानक सदिच्छा भेट देऊन शाळेची तपासणी केली तसेच इ.१ ली ते इ.७ वी वर्गातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता पाहिली. तसेच शालेय कामकाजाची माहिती घेतलेफ शाळेमधील विविध उपक्रमांचे कौतुक करून विद्यार्थ्यांना विविध स्पर्धेसाठी पारितोषिके जाहीर केले. यावेळी दिनेश क्षिरसागर, मुख्याध्यापक गणेश रोचकरी, सहशिक्षक महेंद्र पाटील, बाळासाहेब जेटीथोर, महेंद्र कावरे, सुजानी गिराम, विद्यादेवी स्वामी उपस्थित होते.



### वाशी येथे शिवजयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर; ७५ रक्तदात्यांचा सहभाग

**वाशी, दि.१७ फेब्रुवारी -** सार्वजनिक शिवजयंती महोत्सव २०२६ निमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. संकलित रक्त हे धाराशिव येथील शासकीय रक्त केंद्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय धाराशिव यांच्या रक्तपेढीत जमा करण्यात आले. वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सकाळी १० वाजल्यापासून या शिबिरास प्रारंभ झाला. शिवप्रेमी नागरिकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. एकूण ७५ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीची जाणीव दाखवली. या उपक्रमासाठी शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. रक्तदान शिबिरामुळे गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असून शिवजयंती उत्सवाला सामाजिक उपक्रमाची जोड मिळाली आहे.



### श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारोप

**धाराशिव, दि.१७ फेब्रुवारी -** येथील आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्रीपतराव भोसले हायस्कूल मधील दहावीला असणाऱ्या विदयार्थ्यांना प्रशालेच्या वतीने निरोप देण्यात आला. प्रथम मान्यवरांच्या हस्ते गुरुवर्य के.टी. पाटील सरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत दहावीच्या विद्यार्थ्यांनी केले. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संस्थेचे सदस्य तथा वित्त व लेखा विभागाचे प्रशासकीय अधिकारी संतोष कुलकर्णी तर अध्यक्ष प्राचार्य नंदकुमार नन्नवरे, उपमुख्याध्यापक प्रमोद कदम, पर्यवेक्षक यशवंत इंगळे, राजेंद्र जाधव व बी.बी. गुंड, ज्येष्ठ शिक्षक धनंजय वीर यांची उपस्थिती होती. समारोहांच्या यशस्वी आयोजना करिता उपमुख्याध्यापक प्रमोद कदम व दहावीचे सर्व अध्यापक, गुणवत्ता सुधार समितीचे प्रमुख मनोज भुसे व पर्यवेक्षक यशवंत इंगळे, नाईक सुहास ताटे व त्यांचे सर्व सदस्य यांनी प्रयत्न केले तर सूत्रसंचालन सूर्यकांत पाटील व सर्वांचे आभार पर्यवेक्षक राजेंद्र जाधव यांनी मानले.

### डॉ. आंबेडकर जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी प्रवीण सूर्यवंशी

**धाराशिव, दि.१७ फेब्रुवारी -** धाराशिव येथे बहुजन योद्धा सामाजिक संघटनेच्या बोधिसत्व, विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी प्रवीण सूर्यवंशी तर कार्याध्यक्षपदी सुधीर रामेश्वर पवार यांची निवड करण्यात आली. समितीचे मार्गदर्शक धनंजय शिंगाडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ही निवड जाहीर करण्यात आली. यावर्षी २७ एप्रिल रोजी भव्य मिरवणूक काढण्याचे ठरविण्यात आले असून रक्तदान शिबिर, फळवाटप, वृक्षलागवड व दिव्यांगांना सायकल वाटप आदी समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. विविध राज्यांतील पारंपरिक वाद्य समूहांच्या सहभागामुळे यंदाची मिरवणूक विशेष आकर्षण ठरणार आहे.



### प्रतिबंधित गुटखा साठा जप्त

**धाराशिव, दि.१७ फेब्रुवारी -** वाशी पोलीस ठाण्याच्या पथकाने प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त करून एकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. आरोपी रविंद्र विठ्ठल खारगे (वय ५३, रा. मेन रोड ईट, ता. भूम) यांनी दि. १६ फेब्रुवारी रोजी आपल्या राहत्या घरात महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा, पान मसाला, सुगंधित सुपारी व इतर तंबाखूजन्य पदार्थ विक्रीसाठी साठवून ठेवल्याचे पोलीस पथकास आढळून आले. एकूण ४६ हजार ६०४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# उमरगा तालुक्यात ७३ लाखांचा १४६ किलो गांजा जप्त

तभा वृत्तसेवा

**धाराशिव, दि.१७ फेब्रुवारी -** अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, छत्रपती संभाजीनगर कृती विभागाने मोठी कारवाई करत तब्बल १४६ किलो गांजा (अंदाजे किंमत ७३ लाख रुपये) जप्त केला आहे. ही कारवाई उमरगा तालुक्यातील धाकटेवाडी शिवारात करण्यात आली.

अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, धाकटेवाडी येथील शेतजमिनीत मानवी मेंदूवर विपरीत परिणाम करणाऱ्या गांजा वनस्पतीची अवैधरित्या लागवड केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे १६ फेब्रुवारी रोजी शेत गट क्रमांक ३८/१६३/२ येथे छापा टाकण्यात आला.

छापा कारवाईदरम्यान संबंधित शेतजमिनीवर गांजाची अवैध लागवड करून त्याची देखभाल व रखवाली केली जात असल्याचे आढळून आले. या प्रकरणी पोलीस ठाणे उमरगा येथे अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपाली पाटील यांच्या फिर्यादीवरून Narcotic Drugs and Psychotropic Substances ct, १९८५ अंतर्गत कलम ८ (क), २० (अ) व ११ (क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गांजा लागवडीसाठी वापरण्यात आलेले क्षेत्र धाकटेवाडी शिवारातील भोगवटाधारकांच्या शेतगटात असून, लागवड करणारा इसम अद्याप अज्ञात असल्याचे पोलिसांनी सांगितले.

ही कारवाई अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सच्या पोलीस महानिरीक्षक शारदा राऊत, पोलीस अधीक्षक अजीत टिके व वरिष्ठ अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली डिवायएसपी साईनाथ ठोंबरे, पोलीस निरीक्षक गीता बागवडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपाली पाटील तसेच त्यांच्या पथकाने पार पाडली.



युवा वर्ग नशेच्या आहारी जाऊ नये यासाठी गांजा, ड्रग्ज व इतर अमली पदार्थांची लागवड, साठवण व विक्री करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई सुरू असून, नागरिकांनी अशा प्रकारांची माहिती पोलिसांना देण्याचे आवाहन अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सतर्फे करण्यात आले आहे.

## धाराशिवात गोवंशीय मांसासह जनावरे जप्त

तभा वृत्तसेवा

**धाराशिव, दि.१७ फेब्रुवारी -** शहरातील खिरणीमळा परिसरात गोवंशीय मांस व जनावरांच्या संदर्भात पोलिसांनी कारवाई करत सुमारे ७० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी फुरखान अखलाक कुरेशी (वय ३० वर्षे, रा. खिरणीमळा, धाराशिव) व अय्याज अखलाक कुरेशी (वय ३०, रा. खिरणीमळा, धाराशिव) यांना दि.१५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी सुमारे ७.१५ वाजता ताब्यात घेण्यात आले.

कारवाईदरम्यान पोलिसांना १२५ किलो गोवंशीय मांस, एक गाय, तीन कालवडी तसेच जनावरे कापण्यासाठी वापरण्यात येणारे लोखंडी सत्तूर असा एकूण अंदाजे ७० रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला.

या प्रकरणी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३२५ तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कलम ५ (क), ९ (अ) आणि प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११ (१) (फ), (ह), (आय) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास धाराशिव शहर पोलीस ठाणे करीत आहे.

## हरी-हर भेद अमंगल व निंदनीय : यशोदा जीवन प्रभुजी

### तुळजापूर येथे 'शिवमहिमा' प्रवचन संपन्न...

तभा वृत्तसेवा

**तुळजापूर, दि.१७ फेब्रुवारी -** हरी आणि हर यांच्यात भेद मानणे हे अमंगल व पूर्णपणे निंदनीय आहे, असे प्रतिपादन यशोदा जीवन प्रभुजी (इस्कॉन धाराशिव) यांनी केले.

नागणे प्लॉटिंग येथील श्री नितीन नागणे यांच्या वतीने आयोजित 'शिवमहिमा' या विषयावरील प्रवचनात ते बोलत होते.



यावेळी सुमारे १०० ते १५० भाविक उपस्थित होते. प्रवचनात प्रभुजी म्हणाले की, यशोदा माते ने भगवान श्रीकृष्णाला प्रेमाने 'नीलमणी' असे संबोधले. भगवान शिवजी सतत नीलमणीचे नामस्मरण करतात म्हणून त्यांना 'नीलकंठ' म्हणतात. भगवान शिवजी हे अखंड भगवंतांचे नामस्मरण करणारे, अत्यंत भोळे व भक्तवत्सल आहेत. थोड्याशा भक्तीनेही ते सहज प्रसन्न होतात म्हणून त्यांना 'भोलेनाथ' असे संबोधले जाते.

भगवान शिवजींचे वैराग्य, दानशूर वृत्ती आणि भक्तांप्रती असलेले प्रेम यांचे वर्णन करताना त्यांनी सांगितले की, शिवजी प्रसंगी रौद्र रूप धारण करतात, तर शेवटी महाकाल रूपही दर्शवितात. ते हिमालयाचे जावई असून पार्वती मातेसाठी तरंगता महाल उभारण्याची कथा यावेळी त्यांनी सांगितली.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित भाविकांना उपवास प्रसाद देण्यात आला आणि कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## महिला पतसंस्थेत ठेव रकमेची फसवणूक; १२ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

**धाराशिव, दि.१७ फेब्रुवारी -** बेंबळी पोलीस ठाण्यात श्री चतुःश्रृंगी महिला सहकारी पतसंस्था मर्या., बेंबळी येथील पदाधिकाऱ्यांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपींमध्ये मनिषा पवार (चेअरमन), अर्चना शिवलकर (व्हा. चेअरमन), जयश्री मगळे (सचिव), प्रतिभा गावडे (संचालक), श्रीदेवी दाणे, जयदीवी शाह, सुवर्णा कांबळे, अनिता कांबळे, सुषमा माळी (लोखंडे), मीना जावळे, सुरेखा ढोरमारे व धनंजय मुंगळे (सर्व रा. बेंबळी, ता. जि. धाराशिव) यांचा समावेश आहे. फिर्यादी प्रेमराज शिंदे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि.१ सप्टेंबर २०२० ते ७ नोव्हेंबर २०२२ दरम्यान पतसंस्थेत खाते उघडून ठेव रकमेचा व्यवहार करण्यात आला.

जास्त व्याजदराची हमी देऊन सप्टेंबर २०२० पासून व्याज देणे बंद केले तसेच फिर्यादी यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांच्या नावावर ठेवलेली ५ लाख ८५ हजार रुपयांची मुदत ठेव परत न करता फसवणूक केल्याचा आरोप आहे.

## खराटे यांना 'शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार'



तभा वृत्तसेवा

**कळंब, दि.१७ फेब्रुवारी -** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आढाळा येथे कार्यरत असलेले उपक्रमशील सहशिक्षक महादेव खराटे यांना संजीवनी फाउंडेशन यांच्या वतीने यावर्षीचा शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार दि.१४ फेब्रुवारी २०२६ रोजी सिन्नर येथे प्रदान करण्यात आला.

या समारंभास माजी मंत्री बच्चुभाऊ कडू, शिर्डी लोकसभेचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, प्रसिद्ध तमाशा कलावंत रघुवीर खेडकर, नाशिक जिल्हा परिषदेचे अध्यक्ष सानप, महाराष्ट्र राज्याचे मृदा सहसचिव हरिभाऊ गीते तसेच महिला आयोगाच्या सदस्या उत्कर्षाताई रूपवते आदी मान्यवर उपस्थित होते.

त्यांच्या हस्ते महादेव खराटे यांना सहकुटुंब पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, शैक्षणिक क्षेत्रातील उपक्रमशीलता तसेच शिवव्याख्याते म्हणून शाळा, महाविद्यालये व विविध स्तरांवर केलेल्या मार्गदर्शनाची दखल घेऊन त्यांना हा सन्मान देण्यात आला.

पुरस्कार स्वीकृतीप्रसंगी महादेव खराटे यांनी हा सन्मान प्रेरणादायी व अभिमानास्पद असल्याचे सांगितले. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात अधिक जोमाने कार्यरत राहण्याची प्रेरणा या पुरस्कारामुळे मिळेल, असे त्यांनी गौरवोद्गार काढले. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

## मुरुम येथे संत कक्कया महाराज जयंतीनिमित्त समाज मंदिर सभागृहाचे लोकार्पण



तभा वृत्तसेवा

**मुरुम, दि.१७ फेब्रुवारी -** मुरुम शहरात वीरशैव समाजाचे आराध्य दैवत असलेल्या संत कक्कया महाराज यांच्या जयंतीच्या पावन मुहूर्तावर शिंदे गल्लीतील समाज मंदिर सभागृहाचे लोकार्पण मोठ्या उत्साहात पार पडले. पंचायत समितीच्या सदस्या आकांक्षा चौगुले यांच्या हस्ते सोमवारी हा सोहळा संपन्न झाला.

या प्रसंगी सर्वप्रथम संत कक्कया महाराज यांच्या मूर्तीचे विधिवत पूजन आकांक्षा चौगुले यांच्या हस्ते करण्यात आले. ज्ञानराज चौगुले यांच्या आमदार निधीतून शिंदे गल्लीतील समाज मंदिर सभागृहाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून, या सभागृहामुळे समाजाच्या विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांना भक्कम आधार मिळणार आहे. कक्कया महाराज यांच्या जयंतीनिमित्त युवतीसेनेच्या मराठवाडा निरीक्षक तथा पंचायत समिती सदस्या आकांक्षा चौगुले मुरुम शहरात उपस्थित होत्या. कार्यक्रमात समाजबांधवांच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमामुळे शिंदे गल्लीत आनंद व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. या लोकार्पण सोहळ्यास संदीप चौगुले, भगत माळी, राजेंद्र कारभारी, झुंबर बनसोडे, किरण गायकवाड, प्रसाद मुदकन्ना, सचिन शिंदे, राजेंद्र कांबळे यांच्यासह जयंती उत्सव मंडळाचे अध्यक्ष, पदाधिकारी, नागरिक, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर आकांक्षा चौगुले यांनी किसान चौक येथील जोडलिंगेश्वर मंदिर येथे जाऊन महादेवाचे दर्शन घेतले व शहराच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली.

## सपकाळ यांच्या वक्तव्याचा निषेध



तभा वृत्तसेवा

**धाराशिव, दि.१७ फेब्रुवारी -** धाराशिव येथे सकल हिंदू समाज व शिवप्रेमींच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्याचा निषेध करण्यात आला. श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची तुलना टिपू सुलतान यांच्याशी केल्याचा आरोप करत त्यांच्या विरोधात कठोर कारवाईची मागणी करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर अशा वक्तव्यांमुळे समाजभावना दुखावल्या जाऊ शकतात व कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे संबंधितांवर तात्काळ व कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

या निवेदनावर ॲड. रवींद्र कदम, विक्रम साळुंखे, उपनगराध्यक्ष अक्षय ढवळे, नगरसेवक आकाश तावडे, अमोल राजे निंबाळकर, ॲड. अमोल लोहार, ॲड. कोरे, केतकी कुलकर्णी, शिवानी परदेशी यांच्यासह शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे पदाधिकारी आणि अनेक शिवप्रेमींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## बांधकाम सळई चोरी; अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

**धाराशिव, दि.१७ फेब्रुवारी -** बांधकामासाठी ठेवलेल्या सळई चोरीप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

फिर्यादी तौसिफ मसरत मशायख (वय ३८, रा. महाजन गल्ली, धाराशिव) यांच्या महाजन गल्ली येथील बांधकाम सुरू असलेल्या उघड्या घरातून १२ एमएम १० एमएम व १० एमएम ६ सळईचे अंदाजे १५० किलो वजनाचे तुकडे, किंमत सुमारे १२ हजार रुपये, दि.१४ फेब्रुवारी रोजी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची तक्रार आहे. दि.१६ फेब्रुवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून धाराशिव शहर पोलीसात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# तुळजाभवानी मंदिरात सावलीसाठी ग्रीन नेटचा मंडप

तभा वृत्तसेवा

**तुळजापूर, दि.१७ फेब्रुवारी -** हिवाळ्याची थंडी ओसरून आता उन्हाळ्याची चाहूल लागली आहे. दिवसेंदिवस सूर्याची तीव्रता वाढत असून दुपारच्या वेळेत उष्णतेचा अधिकच त्रास जाणवत आहे.

या पार्श्वभूमीवर श्री तुळजाभवानी देवींच्या दर्शनासाठी देशभरातून येणाऱ्या हजारो भाविकांना उन्हाचा त्रास होऊ नये, यासाठी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानकडून योग्य त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. मंदिर परिसरात प्रवेश मार्ग तसेच भाविकांच्या वावराच्या ठिकाणी ग्रीन नेट बसविण्यात आले आहेत.

या ग्रीन नेटमुळे थेट सूर्यकिरणांचा परिणाम कमी होऊन परिसरात सावली निर्माण होत आहे. त्यामुळे दर्शनासाठी रांगेत उभ्या असलेल्या भाविकांना उन्हाच्या कडाक्यापासून मोठा दिलासा मिळत आहे.

विशेषतः दुपारच्या वेळेत व गर्दीच्या दिवसांत भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने उन्हामुळे होणारा त्रास लक्षात घेऊन मंदिर संस्थानने ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे.



भाविकांना उन्हाच्या कडाक्यापासून मोठा दिलासा...

भाविकांच्या आरोग्याची आणि सोयीची काळजी घेणे हे मंदिर संस्थानचे कर्तव्य मानून अशा सुविधा वेळोवेळी राबविण्यात येत आहेत.

ग्रीन नेटच्या माध्यमातून केवळ उन्हापासून संरक्षणच नव्हे तर मंदिर परिसर अधिक शीतल व आरामदायी ठेवण्याचा प्रयत्नही करण्यात आला आहे.

यामुळे भाविक शांततेत व समाधानाने श्री तुळजाभवानी देवींचे दर्शन घेऊ शकत आहेत. श्री तुळजाभवानी देवींच्या भाविकांना उत्तमोत्तम सुविधा देण्यासाठी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान कटिबद्ध आहे असे मंदिर संस्थांच्या वतीने सांगण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत Solapur Tarun Bharat
https://epaper.dainiktarunbharat.com/



## संक्षिप्त...

### म. गांधी महाविद्यालयात संत सेवालाल महाराज जयंती साजरी



**अहमदपूर :** येथील विचार विकास मंडळ संचलित महात्मा गांधी महाविद्यालयामध्ये दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ रोजी संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. जे. पी. कुलकर्णी यांनी सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी स्टाफ सेक्रेटरी डॉ. ए. पी. कांबळे, पर्यवेक्षक प्रा. एस. के. गायकवाड, कार्यालयीन अधीक्षक श्री विशाल करंजे, श्री हणमंत पौळ तसेच महाविद्यालयातील इतर शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### सार्वजनिक शिवजयंती समितीची बैठक

**वलांडी :** छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती देवणी तालुका शिवजयंती समितीतर्फे साजरी करण्यासाठी सर्व शिवप्रेमींची बैठक सोमवारी येथील विवेक शैक्षणिक संकुलात समितीचे संस्थापक अध्यक्ष भगवान पाटील तळेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

विवेक शैक्षणिक संकुलात मान्यवरांच्या उपस्थितीत सकाळी झेंडावंदन करून राष्ट्र पुरुषांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात येणार आहे. यानंतर शहरातील मुख्य रस्त्यावरून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेसह राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमेची विविध वेशभूषित विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम सादर करीत लेझीम पथक यांच्यासह मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीचा समारोप येथील विवेक शैक्षणिक संकुलात महाप्रसादाने करण्यात येणार आहे. बैठकीस अण्णाराव पाटील, सदाशिव पाटील, संभाजी पाटील, सोमनाथ लुल्ले, अभंग निटुरे, श्रीरंग माने, मनोहर पटणे, अशोक पाटील, बाबुराव इंगोले, तानाजी पाटील, सुनील हंचनाळे, पांडुरंग पटवारी, प्रा. गोपिनाथ सगर, प्रा. अनिल इंगोले, रमेश कोतवाल, प्रा. रेवण मळभगे, रोहित बंडगर, प्राचार्य नंदकुमार पटवारी, उपप्राचार्य बस्वराज पाटील आदी उपस्थित होते.

### दुःखाच्या निवृत्तीने सुखाची प्राप्ती : महंत बोराडे शास्त्री

**किनगाव :** अज्ञानाची निवृत्ती झाल्यास ज्ञान प्राप्त तर पापाची निवृत्ती झाल्यास पुण्य प्राप्त होते. पंढरीच्या विठ्ठलाच्या मुख दर्शनाने अज्ञान व महापापे निवृत्त होतात आणि सुखाची प्राप्ती होते. आत्मा हाच खरा देव आहे आणि आत्मा विरूद्ध असणाऱ्या 'अनात्म' गोष्टींचा संग सोडल्यास समाधान प्राप्त होते, असे मत महंत महादेव महाराज बोराडे शास्त्री यांनी काल्याच्या किर्तनातून सोमवारी व्यक्त केले.

महाशिवरात्री व माघ मासच्या पवित्र पर्वकाळावर अहमदपूर तालुक्यातील मोहगाव (खा) शिवारात असलेल्या बेलेश्वर मंदिरातील अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता प्रसंगी सोमवारी काल्याचे कीर्तनाते ते बोलत होते. यावेळी महंत मधुकरबुवा मोहगावकर, भागवताचार्य गणेश महाराज गोळेगावकर, विणेकरी उत्तम महाराज देवरकुंडे, मृदंगाचार्य खुशाल महाराज अंतरवेलीकर, गायक उद्धव महाराज शिवपूरकर, गायक मनोज महाराज, गायक दत्तराय महाराज उमरगेकर, माणिक महाराज मोहगावकर, नरहरी महाराज खोडवे, नामदेव महाराज सिरसाठ, जि. प. सदस्य आश्विन नागराळे, जि. प. सदस्या प्रतीक्षा भागवत गुट्टे, पं.स. सदस्य सुधीर गोरटे, भागवत गुट्टे, डॉ. श्रीरंग तुडमे आदींची उपस्थिती होती. यावेळी पंडित सिरसाठ, हनुमंत सिरसाठ, नामदेव सिरसाठ या भाविकाच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाविक उपस्थित होते.

### उदयगिरीच्या तीन विद्यार्थ्यांना प्लेसमेंट तर अकरा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

**उदगीर :** किरण अकॅडमी अॅपटीट्यूड ट्रेनिंग अँड प्लेसमेंट, पुणे व संगणकशास्त्र विभाग महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १६ फेब्रुवारी २०१६ रोजी ऑनलाईन ट्रेनिंग अँड प्लेसमेंटचे आयोजन करण्यात आले, त्यात बीसीएटीव्हाय आणि बीएस्सीटीवाय च्या ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. अकॅडमी तर्फे जनरल अॅपटीट्यूड टेस्ट, ग्रुप डिस्कशन व पर्सनल इंटरव्ह्यू घेण्यात आले, त्यातून तीन विद्यार्थिनी कु. केंद्रे राजनंदिनी, कु. मुंडे वैष्णवी आणि कु. स्वामी सुषमा सुशील यांची ट्रेनिंग व प्लेसमेंट साठी निवड झाली. अकरा विद्यार्थ्यांची स्कॉलरशिप साठी निवड करण्यात आली. यशस्वी विद्यार्थ्यांची प्लेसमेंट मध्ये निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर, उपाध्यक्ष अॅड. प्रकाश तोंडारे, बसवराज पाटील मलकापूरकर, सचिव डॉ. रामप्रसाद लखोटिया, सहसचिव मल्लिकार्जुन चिल्लरगे, प्रशांत पेन्सलवार, कोषाध्यक्ष महादेव नौबदे तसेच सर्व संस्था सदस्य, प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, उपप्राचार्य डॉ. एस. एन. हल्लाळे, संगणक शास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. एस. व्ही. आवाळे, प्रा. राहुल बिरादार तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.







# पंचायत समिती लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांचे काळी फित आंदोलन

**२३ फेब्रुवारी पासून बेमुदत लेखणी बंद करणार**

तभा वृत्तसेवा

**अहमदपूर, दि. १७ फेब्रुवारी :** शासकीय-निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेच्या वतीने विविध प्रलंबित मागण्यांसाठी आज पासून काळ्या फिती लावत पंचायत समिती लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांनी आंदोलन सुरू केले आहे.

अहमदपूर तालुका शाखेच्या वतीने पुकारण्यात आलेल्या या आंदोलनामुळे तालुक्यातील प्रशासकीय कामकाजावर परिणाम होत आहे. १६ ते २० फेब्रुवारी आंदोलन असून संघटनेच्या निर्णयानुसार कर्मचारी २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत कार्यालयात उपस्थित राहतील, मात्र काळी फित लावून आपल्या मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधून घेण्या साठी हा पहिला टप्पा आहे याचा परिणाम झाल्यास २३ फेब्रुवारी २०२६ पासून सर्व लिपिक संवर्गातील कर्मचारी 'बेमुदत कामबंद' आंदोलन करणार आहेत. या काळात संपूर्ण कामकाज ठप्प ठेवण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

खालील मागण्या साठी कर्मचारी संघटनेण आंदोलनाचे हत्यार हाती घेतले आहे.

वेतन त्रुटी: चौथ्या वेतन आयोगापासूनची वेतन त्रुटी दूर करून सुधारित वेतनश्रेणी लागू करणे.

पदनाम बदल: लिपिक संवर्गाच्या पदनामात बदल करणे व पदोन्नतीची साखळी कमी करणे.

जुनी पेन्शन: सर्वांना जशास तशी जुनी पेन्शन योजना लागू करणे.

अनुकंपा नियुक्ती: १ नोव्हेंबर २००५ पूर्वीच्या अनुकंपा प्रतीक्षा-सूचीवरील उमेदवारांना जुनी पेन्शन लागू करणे.

समावेशनास विरोध: जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचे मृद व जलसंधारण विभागात समावेशन न करणे.





या आंदोलनाचे नेतृत्व तालुकाध्यक्ष प्रविण भोसले, संघटक अमित कळसकर, तालुका उपाध्यक्ष संगमेश्वर नागरगोजे, सचिव शहाजी पवार, सहसचिव संध्या होडरने आणि खजिनदार सचिन गुंडरे करत आहेत. तसेच सह-कोषाध्यक्ष शिरीष फुलारी, प्रसिद्धी प्रमुख राजकुमार तिर्थकर, महिला प्रतिनिधी दिपमाला डोखळे हे देखील सक्रिय आहेत.या आंदोलनास जिल्हा सहकार्याध्यक्ष शुभांगी शिंदे आणि जिल्हा महिला प्रतिनिधी वर्षा भगत यांचे विशेष मार्गदर्शन लाभले आहे. मनिषा मिरजकर, प्रल्हाद कानले, संजय आकुलवाड, शिवाजी लाखाडे, संभाजी डोके, सुनील डोळस स्वामी, किरण दांडेगावकर, लक्ष्मीकांत उजळंबकर, सतीश कांबळे, मुजिप शेख, बाळू वाहुळे, सुरवसे, राहुलकुमार पपशवार, प्रकाश कांबळे, संतोष कांबळे, तनवीर कादरी, बबीता भिंगोलीकर, बालाजी जाधव, गुलाब सोळंके, सुलाबाई वर्ती व इतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

# पोलीस प्रशासनाने टवाळखोर तरुणांवर कारवाई करावी

**भाजप नगरसेविकांची मागणी; बैठकीत शहर सुरक्षाबाबत चर्चा**

तभा वृत्तसेवा

**निलंगा, दि. १७ फेब्रुवारी :** नगराध्यक्ष संजयराज हलगरकर यांच्या पुढाकाराने पोलीस प्रशासन व नगर पालिकेतील भाजपच्या महिला पदाधिकारी, नगरसेवक यांची संयुक्त बैठक संपन्न झाली. या समन्वय बैठकीत



शहरातील रस्त्यांवरील अपुरा प्रकाश, ट्युशन क्लासेस, बसस्थानक, कॅफे अशा ठिकाणी टवाळखोर मुलांचा वाढत असलेल्या वावरामुळे मुली, महिलांत भीती पसरत आहे. विशेषतः शाळा, आणि बसस्थानक परिसरात ही महाविद्यालय मुले उभे राहून छेड काढत असतात. त्यामुळे त्यांना पायबंद घालावा, अशी मागणी पालिकेच्या महिला सभापतींनी केली.

या बैठकीला निलंगा उपविभागीय पोलिस अधिकारी विशाल ढुमे, नगराध्यक्ष संजय हलगरकर, पोलिस उपनिरीक्षक अनुसया माने, सपोनि सदानंद वाघमारे, पोलिस हवालदार एस.एस. चव्हाण, एम.एस. भुतनपल्ले आदी उपस्थित होते.

नगर पालिकेच्या बांधकाम सभापती पूजा मोहोळकर यांनी पोलिस उपाधीक्षक विशाल ढुमे यांना महिला, मुलींच्या संरक्षणासाठी निवेदन दिले.

**पोलिस उपअधीक्षक विशाल ढुमे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत निलंग्यात पोलीस गस्त वाढविण्याची मागणी**

शहरात ठिकाणी नियमाचे उल्लंघन करून कॅफे सुरू आहेत. तिथे बऱ्याचवेळा महाविद्यालयीन युवक युवतींची गर्दी असते. अशा ठिकाणांमुळे परिसरातील वातावरणावर परिणाम होत आहे. त्यामुळे शहरात गस्त वाढवावी. अशा ठिकाणी पोलिस बंदोबस्त द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

**निलंगा शहरातील मुख्य चौकातील सीसीटीव्ही कॅमेरे सुरु करावेत**

रस्त्यानजिक चया अतिक्रमणांमुळे पादचाऱ्यांना चालणे कठीण झाले आहे. गदींचा फायदा घेऊन छेडछाड, मोबाईल चोरीच्या घटना घडत आहेत. शाळा, महाविद्यालय आणि मुख्य चौकात दामिनी पथकाची गस्त वाढवण्यात यावी. संशयास्पद कॅफेवर धाडी टाकून कडक कारवाई करावी. रस्ते पादचाऱ्यांसाठी खुले करावेत. रात्रीच्या वेळी गस्त वाढवण्यात यावी. शहरातील छत्रपती शिवाजी चौकातील रात्रीचा ट्रॅव्हल्सचा पॉईंट शहराबाहेर स्थलांतरित करावा. सर्वच चौक व रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यासाठी मदत करावी. शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे दुरुस्त करावे, अशा मागण्या करण्यात आल्या. यावेळी उपनगराध्यक्षा आशाताई फुलारी, बांधकाम सभापती पूजाताई मोहोळकर, स्वच्छता व दिवाबत्ती सभापती सुधाताई वाघमारे, महिला व बालकल्याण सभापती मनीषा देशपांडे, पाणीपुरवठा सभापती सोनाली हाडोळे-पाटील आदींची उपस्थिती होती.

# किनगाव पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक

तभा वृत्तसेवा

**किनगाव , दि. १७ फेब्रुवारी :** छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव, होळी सण, धुलीवंदन,रमजान ईद सण येत्या काही दिवसांत पार पडणार असल्याने सण उत्सव शांततेत पार पडावेत यासाठी शांतता समितीची बैठक उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी सकाळी साडेअकरा वाजता पार पडली.या बैठकीत छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव व रमजान ईद आणि होळी धुलीवंदन उत्सव साजरा करताना घ्यावयाची काळजी व शांततापूर्ण वातावरणात उत्सव साजरा करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. प्रशासनाचे सर्व नियम पाळून डिजेमुक्त मिरवणूक काढावी,कुठलेही अश्लील गाणे वाजवू नये, पारंपरिक वाद्य ढोल ताशा इत्यादी पारंपरिक वाद्य लावून मिरवणूक काढावी, विना परवानगी मिरवणूक कुणीही काढू नये, परवानगी घेऊनच मिरवणूक काढावी, सण उत्सव कालावधीत काही चुकीच्या अफवा पसरविल्या जातात त्या अफवांवर विश्वास ठेवू नये, माहिती खरी की खोटी याची खात्री करावी, प्रशासनाचे नियम पाळून सण उत्सव उत्साहाने आनंदाने साजरे करावेत असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी रायबोले यांनी केले.यावेळी प्रभारी सरपंच विठ्ठलराव बोडके, माजी सभापती किशोर मुंडे, माजी जिल्हा परिषद सदस्य त्र्यंबक गुट्टे, पंचायत समितीच्या सदस्या सुरेखाताई मुंडे,अशोक मुंडे, पोलीस निरीक्षक माणिक डोके, उपनिरीक्षक तोंडारे व पोलीस पाटील,नागरिक, सरपंच व पत्रकार,पोलीस कर्मचारी आदीं जणांची उपस्थिती होती..

# किनगाव सिमेंट रस्त्याचे निकृष्ट कामे वाढले; २० लाखांच्या रस्त्याचा दोन महिन्यातच धुरुळा

**संबंधित गुत्तेदाराला मंत्र्याचे अभय असल्याची येथील जनते मध्ये चर्चा**

तभा वृत्तसेवा

**किनगाव , दि. १७ फेब्रुवारी :** अहमदपूर तालुक्यातील किनगाव येथील भगवंत नगर मधील सिमेंट काँक्रिट रस्ता निकृष्ट दर्जाचा करण्यात आला.याबाबत उपअभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद उपविभाग अहमदपूर यांनी नोटीस बजावून सहा महिने उलटले तरी रस्त्याची दुरुस्ती झाली नाही. रस्ता तय्यार करताना संबंधित अधिकाऱ्यांनी डोळे मिटले होते का असा सवाल उपस्थित केला जात आहे.



याबाबत सविस्तर माहिती अशी की येथील भगवंत नगर येथील सिमेंट रस्त्याचे काम गेल्यावर्षी जानेवारी महिन्यात मंत्री महोदय यांच्या हस्ते उद्घाटन करून सुरू झाले. रस्त्याचा दोन महिन्यांतच धुरळा झाला.संबंधित गुत्तेदार यांनी काम निकृष्ट केले असल्याचा सूर उमटला. त्यानंतर छावा संघटनेचे राजीव मोहगावकर यांनी दि. ४ /७ / २०२५ रोजी निकृष्ट दर्जाच्या सिमेंट काँक्रिट रस्त्याची चौकशी करून संबंधीत दोषींवर फौजदारी स्वरूपाची कारवाई करावी अशा आशयाचे पत्र उपविभागीय अभियंता जि.प. बांधकाम विभाग अहमदपूर यांना दिले होते त्या अनुषंगाने उप अभियंता बांधकाम जि.प उपविभाग अहमदपूर यांनी संबंधीतांना नोटीस बजावली होती त्यात त्यांनी विषयांकित योजने अंतर्गत आपल्या गावच्या भंगवत नगरमध्ये सिमेंट कॉक्रिट रस्त्याचे काम आपल्या मार्फत पुर्ण करण्यात आलेले आहे सदर कामावरील आपल्या हलगर्जी पणामुळे रस्त्यावरील बिअरिंगचा स्थर निघून गेलेला आहे सदर कामाचा दोष विवरण कालावधी २ वर्षाचा असून सदर काम दुरुस्त करणे ही आपली जबाबदारी आहे अन्यथा प्रशासकीय कारवाई करण्यात येईल अशी नोटीस देण्यात आली . मात्र नोटीस देऊन सहा महिने उलटून गेले तरी रस्ता दूरुस्ती झाली नाही. संबंधित गुत्तेदार हे वेळकाढून दिवस पुढे ढकलत असल्याची ओरड ग्रामस्थात आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रकरणी लक्ष घालून या रस्त्याचा तात्काळ प्रश्न सोडवावा अशी मागणी केली जात आहे. अशा काम करणाऱ्या गुत्तेदारांना ब्लॅकलिस्ट करून पुढील कामे न देण्याची मागणी नागरिक करीत आहेत. येणाऱ्या काही दिवसात या रस्त्याचा प्रश्न मार्गी न लागल्यास ग्रामस्थ आंदोलन करण्याच्या तयारीत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

# सत्तरधरवाडी फेस्टिवल थाटात संपन्न





तभा वृत्तसेवा

**औसा, दि. १७ फेब्रुवारी :** औसा तालुक्यातील सत्तर धरवाडी येथे सत्तरधर वाडी फेस्टिवल चे हे पहिलेच वर्ष असून सुद्धा नियोजन चोख करण्यात आले होते.

विद्यार्थी संघ आणि शाळेचे मुख्याध्यापक माननीय आनंद पुंड सर यांच्या कल्पनेतून या फेस्टीवल चे आयोजन केले होते.

छोट्याशा गावामध्ये असा फेस्टीवल होणे हे साधे सुधे नव्हते. या साठी शाळेचे मुख्याध्यापक आनंद पुंड सर यांनी पुढाकार तर घेतलाच शिवाय डान्स कोरियोग्राफर' डॉ श्रद्धा आनंद पुंड ने अति उत्तम काम दाखविले हे विशेष.

या फेस्टिवल चे वैशिष्ट्ये म्हणजे राज्य पातळीवर उत्कृष्ट नृत्याचे प्रथम पारितोषिक पटकाविणारे दिलीप आ डे यांनी सुद्धा सत्तधर वाडीकारांसाठी नृत्य सादर केले.

गावकरी सुद्धा मागे न राहता त्यांनी डान्स कोरियोग्राफर डॉ. श्रद्धा आनंद पुंड आणि आशा राठोड यांचा सत्कार केला.

या फेस्टिव ला आवर्जुन उपस्थित असलेले औसा शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन महादेव खिचडे ' दयानंद बिरादार सर ' डोके सर यांनी या फेस्टिवल चे कौतुक केले.

या फेस्टिवल साठी शिवराज पाटील हनमंत खुटकर विष्णू चव्हाण लातूर पोलीस महादेव ढगेसर पंढरी बेकडे दिनकर कवडे. ग्रामसेवक सुरेश आ डे धनुभाऊ आडे किरण राठोड शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जेटालाल दिलीप राठोड, नाना राठोड, सत्यनारायण राठोड, सेवादास राठोड, अच्युत गायकवाड,खंडू गायकवाड विश्वजीत गायकवाड, योगेश कवळे,बबलू गायकवाड डॉ. श्रद्धा आनंद पुंड, सौ. कांचन पुंड, केदार पुंड, मंदार पुंड . महेश कांबळे यांची उपस्थिती होती तसेच यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले मुख्याध्यापक आनंद पुंड यांनी उत्कृष्ट संचालन करून प्रेक्षकांची मने जिंकली.

गावकऱ्यांनी तसेच शाळेने कलाकारांना भरपूर दाद देत कौतुक करून त्यांच्यावर बक्षिसाची लयलूट केली.

# देव क्लासेसमध्ये बक्षीस व कार्यगौरव पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

तभा वृत्तसेवा

**निलंगा, दि. १७ फेब्रुवारी :** देव क्लासेस आयोजित निलंगा टॅलेंट हंट परीक्षा २०२६ या उपक्रमाचे बक्षीस वितरण तसेच निलंगा शहरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना कार्यगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. हा कार्यक्रम निलंगा येथे उत्साहात पार पडला.

दिनांक १ फेब्रुवारी रोजी घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत शहरातील सर्व शाळांमधील सुमारे १५०० विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी ८०० हून अधिक विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली, अशी माहिती देव क्लासेसचे





संचालक प्रमोट देव यांनी दिली.

बक्षीस वितरण सोहळा संजयराज हलगरकर(नगरपरिषद अध्यक्ष), भाजपा युवा नेते दत्ता भैय्या मोहलकर तसेच लाल बहादूर शाळेचे शिक्षक अतुल शिंदे सर यांच्या हस्ते पार पडला.

कार्यगौरव पुरस्कारांतर्गत महाराष्ट्र विद्यालय चे मुख्याध्यापक मोहन नटवे(शिक्षण), अनिल स्टेशनरी चे संचालक अनिल विभुते(उद्योग), पंढरीनाथ जाधव माजी मुख्याध्यापक शिवाजी विद्यालय (सामाजिक), शिवकुमार बिरादार (उद्योग, दुबई येथे कार्यरत), तसेच तरुण उद्योजक सागर कमलाकर पाटील यांना पुरस्कार देण्यात आले.

हा पुरस्कार कार्यक्रम प्रमुख पाहुणे व वक्ते सचिन जी तायडे आणि फिजिक्स विषय तज्ञ शिक्षक मोहसीन शेख संभाजीनगर यांच्या हस्ते पार पडला.

ही परीक्षा तीन गटात घेण्यात आली होती. गट अ मधून पोदार स्कुलची इयत्ता ४ थी विद्यार्थिनी श्रवरी ढोले हिने प्रथम क्रमांक मिळविला. गट ब मध्ये ऐश्वर्या असुडे (इयत्ता ७ वी, महाराष्ट्र विद्यालय) हिने प्रथम क्रमांक पटकावला. गट क मध्ये अशोक बाहेती स्कूल ची इयत्ता ९ वी विद्यार्थिनी नंदिनी बिरादार हिने प्रथम क्रमांक मिळविला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देव क्लासेसचे संचालक बिरादार सर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रमोद देव यांनी मानले.

## वाशी हद्दीत अवैध वाहतुकीवर कारवाई; २.०२ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ फेब्रुवारी -**
वाशी पोलीस ठाणे हद्दीत अवैध वाहतूक प्रकरणी पोलिसांनी कारवाई करत २,०२,००० किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी रोहन रमेश शिंदे (वय ३८, रा. रविंद्र हायस्कूलच्या पाठीमागे, लक्ष्मीनगर, भुम ता. भुम जि. धाराशिव) यांना दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी सुमारे ९.५० वाजण्याच्या सुमारास वाशी फाटा येथे अॅपे पियाजिओ रिक्षा (क्र. एमएच २५ एके १०५०) वाहनासह ताब्यात घेण्यात आले.




या कारवाईदरम्यान संबंधित वाहनासह एकूण २,०२,००० किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

या प्रकरणी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कलम ५ (क) व ९ (ब) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास वाशी पोलीस ठाणे करीत आहे.

# नळदुर्ग येथे श्रीक्षेत्र रामतीर्थात तिरुपतीच्या धर्तीवर भव्य राममंदिर उभारणार



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१७ फेब्रुवारी -**
नळदुर्ग येथील श्रीक्षेत्र रामतीर्थ येथे तिरुपती येथील श्री बालाजी मंदिराच्या धर्तीवर भव्य राममंदिर उभारण्याचा संकल्प देवस्थानचे महंत श्री विष्णु प्रसाद शर्मा महाराज यांनी केला आहे. महाशिवरात्रीच्या शुभमुहूर्तावर त्यांनी या भव्य मंदिराच्या संकल्पचित्राचे विधिवत पूजन केले. येत्या दोन ते तीन वर्षांत हे मंदिर उभारले जाण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

श्रीक्षेत्र रामतीर्थ हे प्रभू श्रीराम चंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेले तीर्थक्षेत्र मानले जाते. वनवास काळात रावणाने सीतामातेचे अपहरण केल्यानंतर सीतेच्या शोधार्थ निघालेल्या प्रभू श्रीरामांनी येथे दोन दिवस मुक्काम केल्याची आख्यायिका आहे.

रावणावर विजय मिळवल्यानंतरही ते येथे कुटुंबासह थांबले होते, अशी मान्यता आहे. आजही येथे लक्ष्मण कुंड, सीता नहाणी यांसारख्या ऐतिहासिक खुणा पाहावयास मिळतात. या संदर्भाचा उल्लेख आनंद रामायण या ग्रंथात आढळतो. या तीर्थक्षेत्राची सुरुवातीपासून देखभाल दिवंगत श्री रघुवीर प्रसाद जोशी महाराज यांनी मोठ्या धैर्याने केली. अनेक संकटांना तोंड देत त्यांनी या क्षेत्राचे जतन केले.


त्यांच्या अखेरच्या क्षणी त्यांनी देवस्थानाची जबाबदारी हैदराबाद येथील निकटवर्तीय आणि सध्याचे महंत श्री विष्णु प्रसाद शर्मा महाराज यांच्याकडे सोपवली. दिवंगत जोशी महाराजांनी आपल्या हस्ताक्षरात लिहिलेल्या वहीत येथे तिरुपतीच्या बालाजी मंदिराच्या धर्तीवर भव्य राममंदिर उभे राहील आणि भविष्यात या तीर्थक्षेत्राला तितकेच महत्त्व प्राप्त होईल, असा उल्लेख केला होता.

त्यांच्या त्या संकल्पाला मूर्त रूप देण्यासाठी महंत विष्णु प्रसाद शर्मा महाराज प्रयत्नशील आहेत.

या प्रकल्पासाठी पहिल्या टप्प्यात ५ कोटी आणि दुसऱ्या टप्प्यात ५ कोटी रुपये, असा एकूण १० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. परिसरात भव्य राममंदिर, हनुमान मंदिर तसेच महादेव मंदिर उभारले जाणार आहे. मंदिर उभारणीसाठी तामिळनाडू येथील कुशल कारागीर येणार असून मंदिराची आकर्षक रचना (डिझाइन) तयार करण्यात आली आहे.

लवकरच प्रत्यक्ष बांधकामास प्रारंभ होणार असल्याचे महंतांनी सांगितले. गुरूंच्या आशीर्वादामुळे मंदिर उभारणीच्या कार्यात कोणतीही अडचण येणार नाही, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या भव्य मंदिर उभारणीनंतर ऐतिहासिक नळदुर्ग शहराच्या विकासाला नवी चालना मिळेल आणि देशातील प्रमुख तीर्थक्षेत्रांच्या यादीत नळदुर्गचे नाव समाविष्ट होईल, असा विश्वास व्यक्त होत आहे.



## तांदुळवाडी येथे महिला मेळावा उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१७ फेब्रुवारी -**
तांदुळवाडी येथील जि. प. प्रशाला येथे महिला मेळाव्याचे आयोजन उत्साहात करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुण्या सुषमा उंदरे, सारिका चौधरी तसेच शालेय व्यवस्थापन समितीच्या 'सखी सावित्री' समितीच्या कार्यकर्त्यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यानंतर महिलांचा पारंपरिक हळदी-कुंकू समारंभ पार पडला. कार्यक्रमाचे संयोजन व सूत्रसंचालन विद्या भिसे यांनी केले. जाणीव संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ लगाडे यांनी एकल महिला, विधवा, परित्यक्ता व अभया महिलांच्या प्रश्नांवर मार्गदर्शन केले. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासह सामाजिक बदलाचे महत्त्व अधोरेखित करताना अन्याय सहन करू नका आणि अन्याय करू नका असा संदेश त्यांनी दिला.

त्यानंतर जयश्री गाढवे यांनी आपले विचार मांडले. तसेच सुषमा उंदरे व ग्राफो सदस्य संध्याराणी चौधरी यांनीही महिलांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात संगीत खुर्ची व उखाणे स्पर्धा घेण्यात आल्या. शाळेच्या वतीने मुख्याध्यापक रमेश दुनघव यांच्या हस्ते विजेत्यांना स्टील भांडी देऊन बक्षीस वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सौदागर जगदाळे व बालाजी येळवे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## एनव्हीपी शुगर प्रा.लि.चा १ लाख मे.टन गाळपाचा टप्पा पूर्ण; ऊसबिल जमा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ फेब्रुवारी -**
तालुक्यातील जागजी शिवारातील एनव्हीपी शुगर प्रा.लि. या साखर कारखान्याने द्वितीय गळीत हंगामात आजवर १ लाख मे.टन गाळपाचा टप्पा यशस्वीपणे पूर्ण केला आहे. तसेच ऊसबिल वेळेत शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येत असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी दिली.

यावर्षी कार्यक्षेत्रात झालेल्या अतिवृष्टी व पूरस्थितीमुळे गळीत हंगामाच्या सुरुवातीपासून अनेक अडचणी निर्माण झाल्या होत्या. ऊसफडात वाहने नेणे व ऊस तोडणी करणे अत्यंत कठीण परिस्थितीत पार पडले. मात्र कुशल नियोजन, व्यवस्थापन आणि सर्व घटकांच्या सहकार्यामुळे कारखान्याने अडचणींवर मात करत गाळप हंगाम सुरळीतपणे सुरू ठेवला.



चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी सांगितले की, कारखान्याच्या व्यवस्थापनातील सर्व खातेप्रमुख, कर्मचारी, ऊस उत्पादक, सभासद, ऊस तोडणी व वाहतूक ठेकेदार, तोडणी यंत्र ठेकेदार, मजूर आणि सहकाऱ्यांच्या अहोरात्र परिश्रमामुळे १ लाख मे.टन गाळपाचा टप्पा गाठणे शक्य झाले. त्यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. १ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत ऊस पुरवठा केलेल्या शेतकऱ्यांचे बिल २७०० रुपये प्रतिटन दराने दि.१६ फेब्रुवारी रोजी संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आले आहे.

ज्या शेतकऱ्यांनी उस्मानाबाद जनता सहकारी बँकेचे खाते दिले आहे त्यांनी बँकेत जाऊन आपले बिल घ्यावे. तसेच ज्यांनी खाते दिले नाही अशा शेतकऱ्यांनी पवनराजे लोकसमृद्धी मल्टिस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि., धाराशिव येथे जाऊन आपले बिल घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त ऊस कारखान्यास देऊन सहकार्य करावे, असेही आवाहन चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी केले आहे.

## तुळजाभवानी रेल्वे संघर्ष समितीच्या योद्धांना महात्मा फुले महाराष्ट्र रत्न पुरस्कार

**सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या रेल्वेमार्गासाठी संघर्ष समितीला पंचवीस वर्षानंतर यश...**




**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१७ फेब्रुवारी -**
अनाथ सेवक सामाजिक कल्याण संस्था अहिल्यानगर या संस्थेच्या वतीने सोलापूर तुळजापूर धाराशिव या रेल्वे मार्गासाठी पंचवीस वर्ष संघर्ष केलेल्या तुळजाभवानी रेल्वे संघर्ष समिती संघर्ष योद्धांना महात्मा फुले महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

अहिल्यानगर येथे हॉटेल गोल्ड रोज अहिल्यानगर येथे सायली फाउंडेशन (आळंदी) पुणे सामाजिक संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष सायली धनाबाई, दीपक दीक्षित, समाजसेवक संस्थेचे अध्यक्ष तुषार बोरुडे यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले.

संघर्ष समितीचे अध्यक्ष बबनराव गावडे, विकास तांबे, रत्नाकर खोले, अशोक साळुंखे, अंबादास पोपळे, मोहन भोसले, कोंडीबा प्रताप, अनिल हंगरेकर, खय्युम शेख, राहुल मलकुनाईक गवळी, गोविंद दिवटे, तानाजी पाटील, अनमोल साळुंखे, दयानंद पांचाळ, सतीश पवार, या सर्वांना महात्मा फुले महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सर्व सहभागींच्या नावांतून तुळजाभवानी रेल्वे संघर्ष समितीचे सदस्य सतीश पवार यांच्या नावे निघालेली चिठ्ठी तुळजाभवानी रेल्वे संघर्ष समितीच्या वतीने अनाथ सेवक सामाजिक कल्याण संस्था अहिल्यानगर यांना अनाथ व निराधार हँडीकॅप गरीब मुलांसाठी अकरा हजार रुपये रोख रक्कम देणगी स्वरूपात देण्यात आली.

## माने यांचा सेवापूर्तीनिमित्त गौरव ग्रंथ प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ फेब्रुवारी -**
जिल्हा परिषद प्रशाला कोंड येथे रमेश माने यांच्या सेवापूर्ती निमित्ताने जीवनावरील विवेकयात्री या डॉ. सतिश सातपुते यांनी संपादित केलेल्या गौरव ग्रंथाचे प्रकाशन शिक्षक आ. विक्रम काळे यांच्या हस्ते करण्यात आले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणेच्या माजी सहसंचालक डॉ. शोभा खंदारे या होत्या.

प्राचार्य डॉ. दयानंद जटनुरे, प्राचार्य बळीराम चौरे, दिलीप जमादार, उमेश नरवडे, सरपंच सुनील शेट्टे, उपसरपंच युवराज जाधव, प्रा. अंकुश नाडे, नितिन मेमाणे हे उपस्थित होते. याप्रसंगी रोहिणी माळी, रामकिशन सुरवसे, छत्रपती इंगोले, गौरवमूर्ती रमेश माने यांनी ही आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सतीश सातपुते, सूत्रसंचालन तुकाराम पलमटे व रामकिशन सुरवसे यांनी केले तर आभार मारुती कदम यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कांतीलाल जावळे, नागेश लोहारे, गिरीश माने, डॉ. रितेश माने, निशिकांत मिरकले आणि अंगद भोसले यांच्यासह आदिंनी परिश्रम घेतले.

## धाराशिवात दुचाकी लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ फेब्रुवारी -**
शहरातील आठवडा बाजार परिसरातून दुचाकी चोरीची घटना घडली असून याप्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रजोत कमलाकर बनसोडे (वय ४० वर्षे, रा. भीमनगर, धाराशिव ता. जि. धाराशिव) यांची अंदाजे ६०,००० रुपये किंमतीची टी.व्ही.एस. ज्युपीटर मोटरसायकल (क्र. एमएच १३ डीजे ६८९८) ही दि.१८ फब्रुवारी रोजी दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास आठवडा बाजार येथील हॉटेलसमोरून अज्ञात व्यक्तीने चोरून नेली.

या प्रकरणी फिर्यादी प्रजोत बनसोडे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरून धाराशिव शहर पोलीस ठाणे येथे भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## कुंभारी येथे बाल आनंद मेळावा; ६० स्टॉल्समधून सुमारे २५ हजारांची उलाढाल

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.१७ फेब्रुवारी -**
तुळजापूर तालुक्यातील कुंभारी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शनिवार, दि.१४ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

मेळाव्याचे उद्घाटन नांदुरी केंद्राचे केंद्रप्रमुख संजय वाले, सरपंच वर्षाराणी संतोष वडणे तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल जाधव यांच्या हस्ते झाले. विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच व्यवहारिक ज्ञान मिळावे तसेच उद्याचे यशस्वी व्यापारी व उद्योजक घडावेत या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

मेळाव्यात एकूण ६० स्टॉल उभारण्यात आले होते. यामध्ये फळे, विविध खाऊ पदार्थ, भाजीपाला, स्टेशनरी आदी वस्तूंचे स्टॉल विद्यार्थ्यांनी मांडले होते. गावातील नागरिक व महिलांनी मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या उपक्रमातून सुमारे २५ हजारांची उलाढाल झाली.



मेळावा यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक इर्शाद शेख, सहशिक्षक दंडनाईक, सुरवसे, गावित तसेच सहशिक्षिका जाधव यांनी परिश्रम घेतले.

## मार्डी उपकेंद्राची एनक्यूएएससाठी ऑनलाईन तपासणी



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१७ फेब्रुवारी -**
लोहारा तालुक्यातील कानेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत असलेल्या मार्डी उपकेंद्राची राष्ट्रीय आरोग्य गुणवत्ता आवश्यक मानांकन (एनक्यूएएस) प्रमाणपत्रासाठी राष्ट्रीय पातळीवरील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ऑनलाईन पद्धतीने पडताळणी केली.

या प्रक्रियेत डॉ. पंकज शर्मा व डॉ. मोहसिन जुजारा यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे आरोग्य सेवांबाबत सविस्तर माहिती घेतली. आरोग्य विभागाचे रेकॉर्ड, सेवा नोंदी, औषध साठा, उपकेंद्र परिसरातील स्वच्छता तसेच अभिलेखांची तपासणी ऑनलाईन पद्धतीने करण्यात आली. विविध आरोग्य विषयक निकषांची छाननी करून सेवा गुणवत्तेचा आढावा घेण्यात आला.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक आरोग्य केंद्र कानेगाव अंतर्गत मार्डी उपकेंद्राची एनक्यूएएस तपासणी पार पडली. यावेळी तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. जगदीश बनसोडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. धीरज सोमवंशी, डॉ. प्रियंका बंदीछोडे, औषध निर्माण अधिकारी भाग्यश्री माळी, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. संतोष गंभीरे, डॉ. दिपाली शिंदे, तसेच कर्मचारी किशोर डोईजोडे, महेश साळुंखे, महादेव चांदणे, सुमन जमादार, संतोष कागे, शंकर जवादे, आप्पासाहेब जगताप, धनंजय कांबळे, दत्ता येळणे, आरोग्य सेविका मनीषा सुपेकर, वंदना सोनटक्के, रुक्मिणी पवार, शीतल पांचाळ, सोनल श्रीगिरे, श्रीअनिता रोडगे, अनिता कदम, शकीला गवंडी, आशा स्वयंसेविका व स्वच्छता परिचर उपस्थित होते.

एनक्यूएएस मानांकनासाठी ग्रामपंचायत कार्यालय मार्डी, सरपंच व ग्रामस्थ यांनी सहकार्य केले. या तपासणीमुळे ग्रामीण भागातील आरोग्य सेवांची गुणवत्ता अधिक सक्षम व परिणामकारक होण्यास मदत होणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## रेडिओ किसान दिनानिमित्त ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी एआय प्रकल्पाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ फेब्रुवारी -**
शेतीमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व्हावा या उद्देशाने रेडिओ किसान दिनानिमित्त केशेगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्याच्या वतीने बेंबळी (ता.जि. धाराशिव) येथे शाश्वत ऊस उत्पादन वाढीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता(ख) प्रकल्पचा शुभारंभ रविवार १५ फेब्रुवारी रोजी धाराशिव जिल्ह्याचे निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडावकर यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष अरविंद गोरे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट पुणे येथील वैज्ञानिक अधिकारी डॉ. समाधान सुरवसे आणि बारामती येथील एग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट येथील कृत्रिम बुद्धिमत्ता प्रकल्प समन्वयक तुषार जाधव, तर प्रमुख उपस्थिती म्हणून धाराशिव जिल्ह्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजकुमार मोरे, आकाशवाणी धाराशिव केंद्राचे प्रसारण अधिकारी किशोर पवार, तसेच व्हॉ. चेअरमन भुसारे, संचालक चित्राव गोरे, निलेश पाटील, कार्यकारी संचालक एस.पी. डाके आदी मान्यवर आणि बेंबळी सर्कल मधील अडीचशे शेतकरी सभासद उपस्थित होते.





देशभरातील ९६ आकाशवाणी केंद्र १५ फेब्रुवारी हा दिवस रेडिओ किसान दिन म्हणून साजरा करतात. या दिनाचे औचित्य साधून आकाशवाणी धाराशिव केंद्र आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्याच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी सभासदांसाठी ऊस उत्पादन वाढीसाठी ए.आय. तंत्रज्ञानाचा वापर आपल्या शेतीत कसा होऊ शकतो, या संदर्भात माहिती देण्यासाठी विशेष कार्यशाळा घेण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून शाश्वत ऊस उत्पादन वाढीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला. त्यानंतर उपस्थित सर्व प्रमुख मान्यवरांचे स्वागत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्याच्या वतीने कार्यकारी संचालक एस.पी. डाके, शेती अधिकारी श्याम शिनगारे, राजर्षी शाहू ट्रस्टचे जयंत शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकाशवाणीचे निवेदक आशिष लगाडे यांनी केले.

तर आकाशवाणी केंद्राच्या वतीने ध्यानिमुद्रण संजय पाटोळे, संतोष पोतदार, पृथ्वीराज देशमुख आणि गणेश सुरवसे यांनी केले.

कार्यक्रमास आकाशवाणीच्या निवेदिका अनघा पुराणिक, स्नेहा तेपाळे, अश्विनी पाटेकर, साधना पोतदार यांच्यासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्याचे शेतकरी सभासद आणि बेंबळी परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातूर जिल्ह्यात ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी अधिसूचना जारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ फेब्रुवारी :** ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम २००० नुसार जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी ध्वनीक्षेपक व ध्वनिवर्धक यंत्रांच्या वापराबाबत अधिसूचना जारी केली आहे. श्रोतगृहे, सभागृहे, सामूहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागांव्यतिरिक्त इतर ठिकाणी वर्षभरात १५ दिवस ध्वनीची विहित मर्यादा राखून सकाळी ६ वाजेपासून रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक/ध्वनिवर्धक वापरण्याची सूट देण्यात आली आहे.

यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचा १ दिवस, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा १ दिवस, श्रीगणेश उत्सव काळात पाचवा गौरी विसर्जन, सातवा, अनंत चतुर्दशीचा आदला दिवस व अनंत चतुर्दशी असे एकूण ४ दिवस, नवरात्र उत्सव काळात अष्टमी व नवमी असे २ दिवस, दिवाळीमध्ये लक्ष्मीपूजन व दिवाळी पाडवा असे २ दिवस, ईद-ए-मिलादचा १ दिवस, ख्रिसमसचा १ दिवस आणि ३१ डिसेंबररोजी १ दिवस असे १३ दिवस आणि उर्वरित २ दिवस ध्वनी प्राधिकरण तथा पोलीस अधीक्षक लातूर यांच्या शिफारसीनुसार जिल्ह्यातील महत्त्वाच्या कार्यक्रमांसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीने सूट देण्यात येणार आहे.




## विविध वृत्त...

### सैनिक कल्याण विभागात ७२ लिपिक-टंकलेखक पदांसाठी १४ मार्चला ऑनलाईन परीक्षा

**लातूर :** सैनिक कल्याण विभाग आणि त्याअंतर्गत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांतर्गत गट-क संवर्गातील लिपिक-टंकलेखक पदांच्या एकूण ७२ रिक्त जागांसाठी टीसीएस-आयओएनमार्फत ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे. ही परीक्षा १४ मार्च २०२६ रोजी दुपारी १ ते ३ या वेळेत घेतली जाईल. या पदांसाठी अर्ज केलेल्या लातूर जिल्ह्यातील सर्व उमेदवारांनी वरील नमूद वेळेत परीक्षेसाठी उपस्थित राहून परीक्षा द्यावी, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (निवृत्त) यांनी केले आहे.

### गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेसाठी विधी अधिकारी नेमणुकीसाठी अर्ज मागवले

**लातूर :** शासनाच्या गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना (खंडित कालावधी) व सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत न्यायालयीन प्रकरणांच्या कामकाजासाठी विधीज्ञ तथा विधी अधिकारी नेमण्यात येणार आहे.



यासाठी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच किंवा राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगात वकिलीचा किमान १० वर्षांचा अनुभव आवश्यक आहे.

महाराष्ट्र/गोवा बार कौन्सिलच्या दरपत्रकानुसार जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंचमधील प्रति केससाठी १० हजार रुपये आणि राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगातील प्रति केससाठी ५० हजार रुपये मानधन दिले जाईल. तरी इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज वक्षवरश्रर्रीीीशवळषारळश्र.ले या ई-मेल आयडीवर २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पाठवावेत, असे लातूर विभागीय कृषी सहसंचालक, लातूर विभाग लातूर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

### मेस्को लातूर अंतर्गत सुरक्षा रक्षकांच्या अनेक रिक्त जागा; माजी सैनिक, पाल्य, पत्नी व विधवांनी २७ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करावेत

**लातूर :** माजी सैनिक सहाय्यक योजना अंतर्गत मेस्कोच्या लातूर क्षेत्रीय कार्यालय येथे बीड आणि नांदेड जिल्ह्यांतील विविध ठिकाणी सुरक्षा रक्षक पदांच्या रिक्त जागा उपलब्ध आहेत. या पदांसाठी माजी सैनिक, माजी सैनिकांचे पाल्य, माजी सैनिकांच्या पत्नी तसेच माजी सैनिकांच्या विधवा यांना प्राधान्याने संधी देण्यात येत आहे. इच्छुक पात्र उमेदवारांनी आपले अर्ज, सर्व आवश्यक मूळ कागदपत्रांसह २७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत मेस्को क्षेत्रीय कार्यालय, लातूर येथे स्वतः जाऊन कागदपत्रे जमा करून नाव नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (निवृत्त) यांनी केले आहे.

### 'एमएसआरटीसी'च्या बस प्रवासासाठी एनसीएमसी कार्ड योजना सुरू

**लातूर :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एमएसआरटीसी) ने प्रवाशांना सुलभ, पारदर्शक आणि डिजिटल सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी 'रुपे ऑन द गो, एनसीएमसी इनेबल्ड' कार्ड योजना राज्यभरात कार्यान्वित करण्यास सुरुवात केली आहे. या कार्डद्वारे सवलतधारक (विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, महिला इ.), विनासवलत प्रवासी आणि सामान्य प्रवासी यांना एकाच कार्डमध्ये प्रवास पास, ऑनलाइन वॉलेट आणि ऑफलाइन वॉलेट उपलब्ध होणार आहे.

हे कार्ड वैयक्तिक स्वरूपाचे असून त्यावर व्यक्तीचे नाव आणि फोटोसह माहिती अंकित असेल. हे कार्ड अहस्तांतरणीय असून सवलतीच्या तिकीटासाठी अनिवार्य राहणार आहे. कार्डची नोंदणी आणि वितरण एमएसआरटीसीच्या २५१ आगारातील अधिकृत एजंट, ३३५ वाहतूक नियंत्रण कक्ष तसेच एनएसडीएल पेमेंट बँकेद्वारे नियुक्त होणाऱ्या ३००० पेक्षा अधिक अधिकृत एजंट यांच्यामार्फत होईल. आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून नोंदणी पूर्ण झाल्यानंतर साधारण ३० दिवसांत कार्ड वितरित केले जाईल. कार्ड मिळाल्यानंतर पीओएस यंत्राद्वारे सक्रियकरण करावे लागेल. सवलतधारक प्रवाशांना (विद्यार्थी, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, अमृत ज्येष्ठ नागरिक इ.) या कार्डचा लाभ मिळेल. प्रवासादरम्यान घेतलेले तिकीट सांभाळणे ही प्रवाशांची जबाबदारी राहील. राज्य परिवहन महामंडळाने या डिजिटल योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन लातूर विभाग नियंत्रक यांनी केले आहे.

# भूकंपामुळे इमारत कोसळली; जखमींना तातडीने मदत मिळाली !

- ✻ आपत्ती व्यवस्थापनाच्या रंगीत तालमीत शोध व बचाव मोहिमेचे प्रात्यक्षिक
- ✻ पोलीस, अग्निशमन दल, रुग्णवाहिका तातडीने घटनास्थळी दाखल
- ✻ राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद पथकाने आठ जणांचा जीव वाचविला

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ फेब्रुवारी :** जिल्हा क्रीडा संकुल परिसरात आज सकाळी साडेअकरा वाजता मोठा आवाज झाला. भूकंपाच्या धक्क्याने येथील इमारत कोसळल्याने परिसरात एकच गोंधळ उडाला. तात्काळ पोलीस नियंत्रण कक्षाला या घटनेची माहिती देण्यात आली. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीवरून स्थानिक अग्निशमन पथक, आपदा मित्रांचे शोध व बचाव पथक तसेच रुग्णवाहिका आणि आरोग्य पथक त्वरित घटनास्थळी दाखल झाले. हा प्रसंग जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भूकंप विषयक आपत्ती व्यवस्थापनाच्या रंगीत तालमीचा होता.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या अध्यक्ष वर्षा ठाकूर-घुगे, औसा-रेणापूर उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, औसा तहसीलदार घनश्याम अडसूळ, पुणे येथील एनडीआरएफचे सहाय्यक कमांडंट गौरव जांकटे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. साकेब उस्मानी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

भूकंपामुळे दुमजली इमारत कोसळल्याची माहिती मिळताच पोलीस नियंत्रण लातूर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाला आणि आरोग्य विभागालाही तात्काळ सूचित करण्यात आले. पोलीस पथक, अग्निशमन वाहन, होमगार्ड, रुग्णवाहिका व वैद्यकीय पथक, आपदा मित्र हे काही मिनिटांत घटनास्थळी पोहोचले. 'इन्सीडंट रेस्पॉन्स सिस्टम' (आयआरएस) नुसार इन्सीडंट कमांडर, ऑपरेशनल चीफ, लायझन ऑफिसर, इमर्जन्सी ऑपरेशन सेंटर प्रभारी, जनसंपर्क अधिकारी यांनी त्वरित जबाबदाऱ्या पार पाडल्या. घटनास्थळी वैद्यकीय पथक तैनात करण्यात आले आणि इमर्जन्सी ऑपरेशन सेंटर कार्यान्वित झाले.

पोलिसांनी परिसरातील नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविले. पोलीस, आपदा मित्र आणि अग्निशमन दलाने जखमींचा शोध घेऊन त्यांना वैद्यकीय पथकाकडे पाठवण्यास सुरुवात केली. इमारतीत लागलेली आग अग्निशमन पथकाने नियंत्रणात आणली. इमारतीखाली काही जण अडकले असण्याची शक्यता लक्षात घेऊन इन्सीडंट कमांडरांनी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाशी (एनडीआरएफ) संपर्क साधला आणि शोध व बचाव पथक मागवले.

एनडीआरएफ पथक दाखल होण्यापूर्वी स्थानिक पथकांनी चार जखमींना उपचारासाठी रवाना केले. अजयकुमार यादव यांच्या नेतृत्वाखालील एनडीआरएफ पथकाने घटनास्थळी पोहोचून इन्सीडंट कमांडर घनश्याम अडसूळ यांच्याकडून परिस्थिती जाणून घेतली. इमारतीत आणखी आठ जण अडकले असल्याचे समजताच त्यांनी शोध कार्य सुरू केले. मातीच्या ढिगाऱ्याखाली अडकलेल्या पाच जणांची सुटका करून त्यांना तातडीने वैद्यकीय उपचारासाठी पाठवण्यात आले. इतर व्यक्तीचा ठावठिकाणा समजत नसल्याने एनडीआरएफच्या प्रशिक्षित श्र्वान पथकाची मदत घेण्यात आली. श्र्वानाने ढिगाऱ्याखाली अडकलेल्या एका व्यक्तीचे ठिकाण शोधून दिले. विविध साधनांचा वापर करून बेशुद्धावस्थेतील गंभीर जखमीला बाहेर काढण्यात आले आणि त्यालाही रुग्णवाहिकेतून उपचारासाठी पाठवले.



भूकंपग्रस्त इमारतीच्या लगत असलेल्या एका बसमध्ये एक व्यक्ती अडकल्याची माहिती मिळताच ऑपरेशनल चीफने एनडीआरएफ पथकाला सूचना दिल्या. कटिंग टीम आणि व्हीएलएस उपकरणांच्या सहाय्याने त्या व्यक्तीची सुखरूप सुटका करण्यात आली. श्र्वान पथकाच्या मदतीने तपासणी करून इमारतीत आणखी कोणी अडकले नसल्याची खात्री पटल्यानंतर इन्सीडंट कमांडरांनी शोध व बचाव मोहीम थांबवल्याची घोषणा केली.

भूकंपासारख्या आपत्तीच्या वेळी सर्व शासकीय यंत्रणांमध्ये समन्वय साधणे, त्यांची क्षमता वाढवणे यासाठी ही रंगीत तालिम आयोजित करण्यात आली होती.

### स्थानिक बचाव पथकांसाठी लवकरच प्रशिक्षणाचे आयोजन : जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

काही महिन्यांपूर्वी जिल्ह्यात आलेल्या पूर परिस्थितीत स्थानिक शोध व बचाव पथकांनी उत्तम कामगिरी केली होती. भूकंपासारख्या आपत्तीच्या वेळी नागरिकांना तातडीने मदत मिळावी यासाठी स्थानिक पथकांना एनडीआरएफच्या सहकार्याने लवकरच प्रशिक्षण आयोजित केले जाईल, असे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितले. तसेच या रंगीत तालमीत सर्व विभागांनी चांगली कामगिरी केल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी विविध पथके आणि साहित्य दालनांना भेट देऊन पाहणी केली.

सर्व यंत्रणांनी आपली जबाबदारी चोखपणे बजावली आणि जखमींना तातडीने वैद्यकीय मदत उपलब्ध करून दिली. याप्रसंगी तहसीलदार घनश्याम अडसूळ यांनी इन्सीडंट कमांडर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. साकेब उस्मानी यांनी डेप्युटी इन्सिडेंट कमांडर म्हणून जबाबदारी पार पाडली. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ लातूर उपकेंद्राचे डॉ. प्रमोद पाटील, एम. ए. खान, महानगर गॅसचे सेफ्टी ऑफिसर अक्षय कुचेकर यांनी निरीक्षक म्हणून काम पाहिले.

## लातुरात छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आज सांस्कृतिक कार्यक्रम




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ फेब्रुवारी :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राज्य शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि लातूर जिल्हा प्रशासनाच्यावतीने १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. लातूर येथील बार्शी रोडवरील दयानंद

**सर्वांना विनामुल्य प्रवेश; कार्यक्रमाला जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे**

सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमाला जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन लातूर जिल्हा प्रशासनाने केले आहे.

यावेळी 'आम्ही जिजाऊच्या लेकी' या कार्यक्रमांतर्गत शिवचरित्र, शाहिरी पोवाडे, स्फुर्तीगीते व लोकगीतांचे सादरीकरण केले जाणार आहे. या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांची गौरवगाथा, त्यांचा पराक्रम व प्रेरणादायी जीवन नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या माध्यमातून होणार आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन लातूर जिल्हा प्रशासनाने केले आहे.

### संस्कारक्षम पिढी घडवणे काळाची गरज : तांदळे



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ फेब्रुवारी :** मुलांना केवळ अक्षर ओळख करून देणे पुरेसे नसून; त्यांना संस्कारक्षम बनवणे, श्रमाची सवय लावणे, आरोग्याची जाणीव करून देणे आणि पर्यावरण संवर्धनाची शिकवण देणे ही आजच्या काळाची गरज आहे, असे प्रतिपादन लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांनी

साने गुरुजी आयआयटी फाउंडेशन व साने गुरुजी बालविकास केंद्र यांच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन प्रसंगी केले.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लातूर उपविभागीय कार्यालयातील नायब तहसीलदार सुधीर दादा देशमुख, माझं घर या अनाथ प्रकल्पाचे संस्थापक शरद झरे उपस्थित होते. या प्रसंगी नायब तहसीलदार सुधीर दादा देशमुख व शरद झरे यांनी उपस्थित पालक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी व्यासपीठावर संस्था सचिव सुरेखा माने, प्रकाश माने, प्रशासकीय अधिकारी जी. टी. माने, उषा आडे आणि नागोराव कांबळे, आयआयटी फाउंडेशनच्या प्राचार्या यू. एस. देशमुख तसेच बालविकास केंद्राच्या प्रमुख वर्षा भगत उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संस्था सचिव कालिदास माने यांनी उपस्थित पाहुण्यांना संस्थेचा आढावा देत संस्थेते घेतल्या जाणाऱ्या विविध उपक्रमाची तोंडओळख करून दिली. कार्यक्रमाचे संचलन शिवकांता मुर्गे व मीनाक्षी यादव यांनी केले, तर आभार प्राचार्य यू. एस. देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी साने गुरुजी शैक्षणिक संकुलातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## महाकाल प्रतिष्ठान व रामलिंगेश्वर देवस्थानच्या संयुक्त विद्यमाने खंडेरायाचा हळदी व विवाह सोहळा उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ फेब्रुवारी :** महाकाल प्रतिष्ठान, लातूर यांच्या वतीने व रामलिंगेश्वर देवस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१४ फेब्रुवारी रोजी श्री खंडेरायाचा हळदी सोहळा तर १५ फेब्रुवारी रोजी भव्य विवाह सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. दोन दिवस चाललेल्या या धार्मिक सोहळ्याने लातूर शहरात भक्तीमय आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले होते.

गावभागात अति श्रद्धेने पूजले जाणारे बाबा महाकाल हे नगर भ्रमणासाठी वर्षातून केवळ महाशिवरात्रीच्या दिवशीच बाहेर आणले जातात. या दिवशी निघणाऱ्या पालखी सोहळ्याचे गावभागातील नागरिक मोठ्या भक्तिभावाने स्वागत करतात. जणू महाकाल महाराज आपल्या प्रजेच्या हालचाली जाणून घेण्यासाठी आले आहेत, अशा भावनेने नागरिक पालखीचे स्वागत करत दिवाळीप्रमाणे उत्सव साजरा करतात. घराघरांत रांगोळ्या, फुलांची उधळण, दीपप्रज्वलन आणि जयघोषांनी संपूर्ण परिसर दुमदुमून जातो.

यंदाच्या वर्षीही लातूरकरांसाठी ही पर्वणी विशेष उत्साहात साजरी करण्यात आली. पालखी मार्गक्रमण सोहळ्याची सुरुवात लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमास अधिक प्रतिष्ठा लाभली. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करत धार्मिक व सांस्कृतिक परंपरा जपण्यासाठी अशा सोहळ्यांचे महत्त्व अधोरेखित केले.

हळदी व विवाह सोहळ्याचा जिवंत देखावा पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. पारंपरिक वेशभूषा, डमरू-ताशांचा गजर, वेदमंत्रांचे उच्चारण, फुलांची आकर्षक सजावट आणि भक्तिमय वातावरण यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. खंडेरायाच्या विवाह सोहळ्यातील प्रत्येक विधी अत्यंत पारंपरिक पद्धतीने सादर करण्यात आला, ज्यामुळे उपस्थित भाविकांना जणू प्रत्यक्ष दैवी विवाह सोहळ्याचा अनुभव मिळाला.

या सोहळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे युवक वर्गाचा मोठ्या प्रमाणावर सहभाग. महाकाल प्रतिष्ठानच्या माध्यमातून युवकांमध्ये सनातन धर्माचे या युगातील महत्त्व पटवून देण्यावर विशेष भर देण्यात येतो. आधुनिक युगातील वेगवान जीवनशैलीत तरुण पिढीने आपल्या संस्कृतीशी जोडलेले राहणे, धार्मिक परंपरांचा अभिमान बाळगणे आणि समाजहितासाठी कार्य करणे किती आवश्यक आहे, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.



भक्तिमार्गातून निर्व्यसनी व संस्कारी जीवन कसे जगता येईल, यावरही विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. व्यसनमुक्ती, शिस्तबद्ध दिनचर्या, वडीलधाऱ्यांचा आदर, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रप्रेम या मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश देण्यात आला. धार्मिक कार्यक्रम हे केवळ उत्सव नसून समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे, हे या उपक्रमातून अधोरेखित झाले.

महाकाल प्रतिष्ठानच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, भविष्यातही अशा धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून युवकांना योग्य दिशा देण्याचा संकल्प संस्थेने व्यक्त केला आहे. लातूरकरांसाठी हा सोहळा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून, संस्कृती, श्रद्धा आणि सामाजिक एकात्मतेचा उत्सव ठरला.

## एमआयटी लातूर येथे श्री गणेश, श्री महालक्ष्मी, श्री हनुमान मंदिरांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना, कलशारोहण आणि विश्वमैदान लोकार्पण सोहळ्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ फेब्रुवारी :** माईर एमआयटी शिक्षण संस्था समूह, लातूर यांच्या वतीने दि. २० ते २२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत विश्र्वमैदाण परिसरात भव्य अशा श्री गणेश, श्री महालक्ष्मी, श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिरांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळा आणि एक लाख स्क्वेअर फूट क्षेत्रफळाच्या 'विश्वमैदान' क्रीडा संकुलाचा लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

येथील एमआयटी शिक्षण संकुलातील विश्वमैदान परिसरात नव्याने साकारण्यात आलेल्या श्री गणेश, श्री महालक्ष्मी आणि श्री हनुमान मंदिरांच्या मूर्तींची विधिवत 'प्राणप्रतिष्ठापना' करण्यात येणार असून यानिमित्त तीन दिवस धार्मिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक कार्यक्रमांची मेजवानी भाविकांसाठी आयोजित करण्यात आली आहे.

माईर एमआयटी शिक्षण संस्था समुहाचे संस्थापक




विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, माईर एमआयटीचे विश्वस्त श्री. तुळशीराम दा. कराड, प्रगतशील शेतकरी श्री काशिराम दा. कराड यांच्या प्रेरणा आणि आशिर्वादाने होत असलेल्या या सोहळ्यासाठी ह.भ.प. अर्जुन महाराज लाड, ह.भ.प. विद्यानंद महाराज गातेगाव, ह.भ.प. नारायण महाराज उत्तरेश्वर पिंप्री, ह.भ.प. विठ्ठल महाराज फड, शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील, ममता हॉस्पिटलचे अध्यक्ष डॉ. मधुकर कुलकर्णी, सहअध्यक्षा डॉ. माया कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.या कार्यक्रमाची सुरुवात दि. २० फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता विणापूजन व मिरवणुकीने करण्यात येणार आहे. त्यानंतर दिवसभर श्री गणेश पूजन, पुण्याहवाचन, देवता स्थापना, जलाधिवास, नवग्रह स्थापना, हवन, शय्याधिवास आदी विधी पार पडतील. सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ व ६ ते ८ या वेळेत ह.भ.प. केशव महाराज घुले यांच्या किर्तनाचा कार्यक्रम होईल. त्याचबरोबर दि. २१ फेब्रुवारी रोजी प्रासाद वास्तु, कुटीर होम, मुख्य देवता हवन, स्नपनविधी आदी धार्मिक विधी होणार आहेत. सायंकाळी ४.३० ते ६ या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रम होईल. त्यानंतर ६ ते ८ या वेळेत ह.भ.प. वामन महाराज जाधव यांचे किर्तन होईल.

तर दि. २२ फेब्रुवारी रोजी प्रातःपूजन, मूर्ती स्थापना, कलशारोहण, उत्तरांग हवन व बलिदान विधी संपन्न होतील. सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. नारायण महाराज उत्तरेश्र्वर पिंप्री यांचे किर्तन होणार आहे. त्यानंतर सकाळी ११ ते ११.३० या वेळेत महापूर्णाहुती, महानैवेद्य दुपारी १२ वाजता, महाआरती १२.३० ते १ आणि महाप्रसाद १ ते ३ या वेळेत होणार आहे.

यज्ञप्रमुख आचार्य म्हणून वे.शा. संपन्न श्री रामकृष्ण कुलकर्णी गुरुजी मार्गदर्शन करणार आहेत. तसेच या सोहळ्यासाठी अनेक कीर्तनकार, भजनकार, टाळकरी व कलाकार यांची उपस्थिती लाभणार आहे.'शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे, तर शरीर, मन आणि आत्म्याचा सर्वांगीण विकास' या ध्येयाने प्रेरित होऊन आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यास सर्व भाविक-भक्तांनी व नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन माईर एमआयटी शिक्षण संस्था समुहाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, कार्यकारी संचालक आ. रमेशअप्पा कराड यांनी केले आहे.